प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ३ जुलै,२००९ रोजी ४ नगरपरिषदा व ५३ गावे यांची मिळून झालेली आहे. दिनांक १४ जून, २०११ रोजी महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाची स्थापना झालेली आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेची २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ६ सामान्य रुग्णालय व ३ माता-बाल संगोपन केंद्रे, ०१ माणिकपुर हायटेक पॉलिक्लिनिक, ५ दवाखाने कार्यान्वित आहेत. सर्व सामान्य रुग्णालय व माता बाल संगोपन केंद्रे यांच्यामार्फत नागरीकांना Sugar F/PP & RBS, Cholesterol, Triglycerides, HDL, SGOT, SGPT, Total Protein, Albumin, T & D Bilirubin, Creatinine, Urea, Uric Acid, Calcium, Hemoglobin, Platelate, WBC, RBC या आरोग्य विषयक तपासण्या केल्या जातात. तथापि महानगरपालिकेच्या रुग्णालयात सिटी स्कॅन मशिन, एम.आर.आय मशिन व डायग्नोस्टीक साठी आवश्यक असणारे/ लागणारे मशिन व यंत्रणा महानगरपालिकेकडे उपलब्ध नाही. त्यामुळे महानगरपालिकेच्या विविध विभागात सेवा घेणाऱ्या रुग्णांना तातडीच्या प्रसंगी एम.आर.आय., सिटी स्कॅन व डायग्नोस्टीक तपासणी मुंबई येथे वा शहरातील अन्य खाजगी अत्याधुनिक डायग्नोस्टीक सेंटरमध्ये पाठवून संबंधित रुग्णांना सदर तपासण्या/चाचण्या करुन घ्याव्या लागतात. याकरिता जास्तीचा खर्च करावा लागतो. यामुळे महानगरपालिका रुग्णालयात येणाऱ्या गरीब व गरजु रुग्णांना याकामी अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो.

यासाठी महानगरपालिकेच्या रुग्णालयात एम.आर.आय, सिटी स्कॅन व डायग्नोस्टीक साठी आवश्यक असणारे मशिन व इतर आवश्यक सर्व यंत्रणा या बाबी मोठया प्रमाणावर खर्चिक असल्यामुळे याकामी अनुभवी संस्थाकडुन अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) द्वारे दर मागवून सुविधा उपलब्ध करुन दिल्यास गरीब व गरजु रुग्णांना याचा मोठया प्रमाणावर फायदा होणार असल्याने याकामी दर मागविणे योग्य होईल. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) सिटी स्कॅन

अ.क्र	तपासणीचे नाव	दर (सर्व करांसहित)
१	3 D CT Knee Joint	
२	3 Way Cock	
३	3 D Chest	
४	3 D Elbow	
५	3 D Face	
६	3 D Reconstruction	
७	Abdomen Angio	
८	Abdomen Pelvis Angiography	
९	Abdomen Pelvis Plain	
१०	Abdomen Pelvis Plain Contrast	
११	Abdomen Pelvis with IVP	
१२	Aortgram	
१३	Axilla with Contrast	
१४	Biopsy Sample	
१५	Both 3 D CT Elbow	
१६	Brain Angio	
१७	Brain Plain	
१८	Brain Plain Contrast	
१९	Brain Veno	
२०	Brochoscopy	
२१	CECT Chest with Sterno Clavicular Joint	
२२	Cervical Spine	
२३	Cervical Spine Flexion Extension	
२४	Chest Abdomen Pelvis Plain Contrast	
२५	Chest and Upper Abdomen	
२६	Chest Contrast with Angio	
२७	Chest Plain	
२८	Chest Plain Contrast	
२९	CT Chest and Mediastinum	
३०	CT Chest with Contrast	
३१	CT Cuts	
३२	Cysternography PNS	
३३	Dorsal Spine	
३४	Dorosolumber Spine with 3D Recon	
३५	Ear Screening	
३६	Enterography	

२) एम.आर.आय

अ.क्र	तपासणीचे नाव	दर (सर्व करांसहित)
१	Fetal	
२	Fistulogram Plain	
३	Fistulogram with Contrast	
४	Foot Left	
५	Foot Right	
६	Forearm	
७	Hand Left	
८	Hand Right	
९	Hip Joint	
१०	Hip Joint Screening	
११	Knee Left	
१२	Knee Right	
१३	L S Spine	
१४	L S Spine Screening	
१५	Leg Left	
१६	Leg Right	
१७	Liver	
१८	Liver Triphasic Contrast Study	
१९	MRCP with CT Cuts	
२०	MRI Both Breast with Contrast	
२१	Neck	
२२	Neck Plain Contrast	
२३	Orbit Plain	
२४	Orbit Screening	
२५	PBH	
२६	PBH Screening	
२७	Pelvis Plain	
२८	Pelvis Plain Contrast	
२९	Pelvis Screening	
३०	Penis	
३१	PNS Plain	
३२	Prostate	
३३	Renal Angio with Contrast	
३४	S C Joint	
३५	S I Joint	
३६	S I Joint Screening	
३७	SACRO Cocygeal	
३८	Sacrum Coccyx	
३९	Scrotum	
४०	Sella Plain and Contrast	

४१	Shoulder Left	
४२	Shoulder Right	
४३	Skull Base	
४४	Spectrocopy Perfusion	

३. डायग्नोस्टीक तपासणी (महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपलब्ध नसलेल्या)

अ.क्र	तपासणीचे नाव	दर (सर्व करांसहित)
१	Amylase	
२	Ascitic Fluid	
३	ADA	
४	Anemia Profile	
५	Ca 125	
६	Ca 15.3	
७	Ca 19.9	
८	Calcium Ionized	
९	CSF	
१०	Cancer marker (F)	
११	Cancer marker (M)	
१२	Cardiac profile	
१३	Cardiac Risk profile	
१४	CD- 4 /CDS- 5	
१५	Chikunguniya	
१६	Coagulation profile	
१७	Coombs Test Direct	
१८	Coombs Test Indirect	
१९	CRP	
२०	CPK MB	
२१	Culture & Sensitivity Blood	
२२	Culture & Sensitivity Pus/Urine etc.	
२३	Dual marker	
२४	D Dimer	
२५	DCT	
२६	Estradiol	
२७	Electrolytes	
२८	Ferritin	
२९	FNAC Slide	
३०	FNAC Procedure	
३१	FSH	
३२	FSH- LH- Prolactin	
३३	FSH- LH- Prolactin- Testosterone	
३४	FSH- LH- Prolactin- TSH	
३५	FT3- FT4-TSH	

३६	G6PD Qualitative	
३७	G6PD Quantitative	
३८	GTT	
३९	HAV	
४०	HbA1c	
४१	Histopathology	
४२	Homocysteine	
४३	HSV 1 & 2	
४४	HCG Value	
४५	Iron Studies	
४६	IL 6	
४७	ICT	
४८	LDH	
४९	Malaria Antigen	
५०	MT	
५१	OT Swab	
५२	Pap Smear	
५३	PTT	
५४	Progesterone	
५५	Prolactin	
५६	Prothrombin	
५७	PSA Total	
५८	PSA Free	
५९	Plural	
६०	PT INR	
६१	RA Quantitative	
६२	Retic count	
६३	Semen Routine	
६४	Serum Folic Acid	
६५	Serum Ammonia	
६६	Serum Cholinesterase Level	
६७	Stool RM	
६८	T3 T4 TSH	
६९	Testosterone	
७०	Thyroid Antibodies	
७१	TORCH 8	
७२	Trop T	
७३	TSH	
७४	T PHA	
७५	Urine Routine Micro	
७६	Urine Toxicology Screening	
७७	Vitamin B12	

७८	Vitamin D3	
७९	Vitamin D25	
८०	Quadruple Marker	

तरी यानुसार सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन वित्तीय वर्षाकरिता उपरोक्त नमुद तक्त्यातील तपासण्यांचे दर वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नोंदणीकृत अत्याधुनिक डायग्नोस्टीक सेंटर यांचेकडून अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) द्वारे मागविणे योग्य होईल. याकामी येणारा खर्च "ऑपरेशन, सोनोग्राफी व एक्स-रे-चार्जेस व इतर मानधन" या लेखाशिर्षाखालील नमुद तरतुदीमधून भागविता येणे शक्य होणार आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, माता बाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, माणिकपुर हायटेक पॉलिक्लिनिक येथे येणाऱ्या रुग्णांसाठी सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या तीन वित्तीय वर्षाकरिता उपरोक्त नमुद तक्त्यातील एम.आर.आय., सिटी स्कॅन व डायग्नोस्टीक तपासणीकरिता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नोंदणीकृत अत्याधुनिक डायग्नोस्टीक सेंटर यांचेकडून अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) द्वारे दर मागविणेस व याकामी सन २०२२-२३ ते सन २०२४-२५ या त्रैवार्षिक आर्थिक वर्षाकरिता प्रत्येक वर्षी रु.१ कोटी प्रमाणे एकूण रु.३,००,००,०००/- इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

06/06

(अनिलकुमार पवार)
प्रशासक तथा आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पूर्व) जि. पालघर पिन नं. ४०१३०५

प्रशासकीय ठराव क्र. ३७६ **विभाग :- दिव्यांग कल्याण**

दिनांक :- ०७/ ०६ /२०२२

प्रस्तावाचा विषय :- :- दिव्यांग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID) देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विशेष मोहिम राबविणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना **दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६** मधील कलम ५६, ५७ व ५८ अन्वये दिव्यांगत्व प्रमाणपत्र वितरित करणे बंधनकारक आहे. केंद्रशासनामार्फत सदरचे वैश्विक ओळखपत्र (UDID) हे संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात येत असून यात गतिमानता येणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार दिव्यांग व्यक्तींना दिव्यांगत्व प्रमाणपत्रे व ओळखपत्र (UDID) वितरीत करण्याच्या अनुषंगाने दि. १२.१२.२०२१ ते १२.०३.२०२१ या कालावधीत विशेष मोहिम राबविणेबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. सदर मोहिमेच्या अनुषंगाने कार्यक्रमाचा आराखडा देखील शासन निर्णयातील प्रपत्र क नुसार आखून देण्यात आलेला आहे. त्यानुसार अनु.क्र. १ ते ११ मुद्यात खर्चाचे विवरणपत्र खालील प्रमाणे प्राप्त झाले आहे.

अ.क्र.	विषय	खर्चाचे विवरणपत्र	प्रति व्यक्ती अंदाजीत खर्च (रुपये मध्ये)
१	खाजगी तज्ञ व्यक्तींचे मानधन	मानसशास्त्रज्ञ, मनोचिकित्सक, फिजीओ/ओक्यूपेसनल थेरेपिस्टए ऑडियोलॉजिस्टए ऑर्थो/प्रोस्थोसिस	२७५/- (अंदाजे खर्च रु.प्रती व्यक्ती अनु.१ ते ११ करीता)
२	आशाताई, समाजसेविका यांचे प्रशिक्षण मानधन	प्रशिक्षण, दिव्यांग व्यक्ती शोध, कार्यक्रम स्थळी उपस्थिती इत्यादी	
३	कुशल, अकुशल मनुष्यबळ	डाटा इंट्री ऑपरेटर, संगणक संचालक, मदतनीस	
४	तांत्रिक साहित्य आणि साधने	प्रिंटर, स्कॅनर, झेराक्स मशीन इत्यादी	
५	डिझाईन आणि छपाई साहित्य	विविध प्रकारचे फॉर्मेट साहित्य, बॅनर्स माहिती पत्रक, डिझाईन आणि छपाई	
६	उपस्थित तज्ञ व्यक्ती, डॉक्टर्स, स्व्यंसेवक यांना पिण्याचे पाणी, अल्पोपहार भोजन इत्यादी.	सर्व शिबीर स्थळी उपस्थित तज्ञ व्यक्ती, डॉक्टर्स, स्वयंसेवक यांना पिण्याचे पाणी, अल्पोपहार, भोजन इत्यादी.	
७	फोटो आणि विडीओ	उपक्रमाचे फोटो, विडीओ चित्रीकरण,ऑडिटींग अणि मिक्सिंग इत्यादी	
८	वाहन व्यवस्था	सर्व शिबीर स्थळी उपस्थित राहण्यासाठी तज्ञ व्यक्ती, डॉक्टर्स, स्वयंसेवक यांचे करिता वाहन व्यवस्था	
९	दिव्यांग व्यक्तीचे प्रमाणपत्र आणि विविध प्रकारच्या योजनांची घरपोच सेवा	तयार झालेले दिव्यांग प्रमाणपत्र आणि योजना माहिती पत्रक टपालाद्वारे घरपोच सेवा	
१०	कार्यक्रम ठिकाणी व्यवस्थापन आणि इतर अनुषंगिक खर्च	तपासणी शिबीर स्थळी लाभार्थी व्यक्तीकरीता आवश्यक व्यवस्था, लाभार्थी अल्पोपहार, बिछायत आणि इतर अनुषंगिक खर्च व आवश्यक स्टेशनरी	
११	कार्यक्रम व्यवस्थापन खर्च	एकूण खर्चाच्या ५ टक्के एवढा खर्च हा संपुर्ण व्यवस्थापन खर्च.	

उक्त संदर्भ १ व २ चे अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींना ऑनलाईन संगणकीय प्रणालीद्वारे दिव्यांगत्व प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID) देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विशेष मोहिम राबविणेकामी महानगरपालिकेच्या ५ मुख्य रुग्णालयात महा ई-सेवा केंद्र यांस

जागा उपलब्ध करुन देऊन दिव्यांगांना UDID कार्ड महा ई सेवा केंद्रामार्फत देणेकामीचे कार्यालयीन टिपण्णीस दि. १७/०५/२०२२ रोजी मा. आयुक्त सो यांनी मंजूरी दिलेली आहे.

मा. उपायुक्त, दिव्यांग कल्याण विभाग यांनी दि. १७/०५/२०२२ जा.क्र.वविशम/दि.क.वि./०४/२०२२-२३ रोजी प्र. वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांस दिव्यांगांना UDID कार्ड देणे बाबत वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत विशेष मोहिम राबविणे बाबतचे पत्र देण्यांत आलेले होते. त्याअनुषंगाने वैद्यकिय आरोग्य विभागाने दि. १८/०५/२०२२ जा.क्र.:वविशम/वै.आ.वि./२८६/२०२२ रोजी मा.उपायुक्त दिव्यांग कल्याण विभाग यांस दिलेल्या पत्राद्वारे सदर मोहिम राबविणेसाठी दि.३० जून २०२२ पर्यंत महानगरपालिकेची अनुक्रमे १) सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई (प.) २) विजय नगर – तुळींज रुग्णालय, नालासोपारा पूर्व. ३) श्री जिवदानी देवी रुग्णालय, चंदनासार, विरार पूर्व ४) कौल सिटी रुग्णालय, वसई (प.) ५) सोपारा सामान्य रुग्णालय, नालासोपारा (प.) हि पाच रुग्णालये (जागा) उपलब्ध करुन देण्यात येत आहेत असे कळविले आहे.

तथापी, संदर्भ क्र. ५ अन्वये अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा यांनी दिव्यांगाचे UDID कार्ड बनविण्याचे काम त्यांचे संस्थेस मिळणेबाबत महानगरपालिका कार्यालयाकडे दि. २३/०५/२०२२ रोजी (आवक क्र. २१/२०२२) पत्रव्यवहार केला आहे. अर्जदारांनी सदर पत्रासोबत दि. २५/११/२०२१ रोजीच्या सादर केलेल्या अर्जाची छायांकीतप्रत(झेरॉक्स) सोबत जोडलेली आहे. त्यानूसार अर्जात नमूद केल्याप्रमाणे UDID कार्ड शिबीरासाठी लागणारे ऑपरेटर व संगणक त्यांच्याच संस्थेचे असणार असून शिबिरासाठी लागणारी जागा व शिबिराविषयी जनजागृती महानगरपालिका कार्यालयाने करावी असे अपेक्षित असल्याचे अर्जदार यांनी नमूद केले आहे.

तसेच, सदर संस्थेने दि. २३/०५/२०२२ रोजी (आवक क्र. २२/२०२२) मागणी अर्ज सादर केलेला असून मा. आयुक्त सो. यांचे दालनात दि. २३/०५/२०२२ रोजी झालेल्या चर्चेनूसार UDID कार्ड मोहिमेतंर्गत जनजागृतीसाठी खर्च, स्टेशनरी खर्च, ग्रामिण रुग्णालय विरार (प.) येथे संपर्क साधून दिव्यांगांना दिव्यांगत्व प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी पाठपुरावा व शिबिराचे आयोजन तसेच समाजकल्याण विभाग पालघर यांचेशी समन्वय साधून प्रत्येक दिव्यांगांना UDID कार्ड मिळवून देण्यास कार्य करणे. इत्यादीसाठी तयारी दर्शविली आहे व त्यासाठी होणारा खर्च प्रती दिव्यांग व्यक्ती रु. १५०/- असून सदरचा संपूर्ण खर्च संस्थेस मिळाल्यास काम करणे सोपे होईल. तरी सदरचे काम संस्थेस मिळावे अशी विनंती अर्जान्वये केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य् विभागाच्या दि. ०२/१२/२०२१ शासन निर्णय क्र. : दिव्यांग/२०-२१/प्र.क्र.४५/दि.क्र.२ अन्वये शासन निर्णयानुसार उक्त कामासाठी प्रती व्यक्ती रक्कम रु.२७५/- इतका अंदाजित खर्च नमूद करण्यात आला आहे. सन २०१७ च्या दिव्यांग व्यक्तींच्या विशेष नाव नोंदणी मोहिमेतंर्गत एकूण ३९९५ इतक्या दिव्यांग व्यक्तींची नोंद आहे. नोंद केलेल्या एकूण ३९९५ दिव्यांग व्यक्तींना शासन निर्णयानूसार प्रती व्यक्ती रक्कम रु. २७५/- प्रमाणे खर्च केल्यास रक्कम रु. ११,७८,५२५/- इतका खर्च प्रत्यक्षपणे होणे अपेक्षित आहे. परंतु सदर कामासाठी (दिव्यांगाचे UDID कार्ड बनविण्याचे काम) अपंग कल्याणकारी संस्था अर्नाळा हयांनी प्रती दिव्यांग व्यक्ती रक्कम रु. १५०/- इतक्या रक्कमेची मागणी अर्जानुसार केलेली आहे. सन २०१७ च्या दिव्यांग व्यक्तींच्या विशेष नाव नोंदणी मोहिमेतंर्गत एकूण ३९९५ दिव्यांग व्यक्तींना अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा हयांनी केलेल्या मागणीनुसार प्रती दिव्यांग व्यक्तीमागे रक्कम रु. १५०/- याप्रमाणे खर्च केल्यास केवळ रक्कम रु. ५,९९,२५०/- इतका खर्च प्रत्यक्षपणे होणे अपेक्षित आहे. सदरचे नमुद काम अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा हया संस्थेस दिल्यास महानगरपालिकेची रक्कम रु. ५,७९,२७५/- इतकी बचत होणार आहे. सदरचे काम पूर्ण केल्यानंतर संस्थेने अहवाल सादर करताना अहवालात (खर्चाचे विवरणपत्र) नमुद केलेल्या दिव्यांग व्यक्तींच्या संख्येनुसार व मंजूर दरानुसार देयकाची रक्कम अदा करण्यात येईल.

मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. ११/०४/२०२२ रोजीच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये सदर मोहिमेस दि. ३० जून २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरचे काम दि. ३०/०६/२०२२ पर्यंत करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत कमी कालावधी असल्यामुळे दरपत्रक मागवून सदरचे काम पूर्ण करणे शक्य नाही. तरी तातडीची बाब

म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५(२)(२) यांत तरतूद केल्याप्रमाणे निविदा न मागवता महानगरपालिकेस लागणारी कोणतीही बाब विशेष अधिकाराखाली खरेदी करण्याची तरतूद आहे.

तरी दिव्यांग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID) देण्यासाठी महानगरपालिकेमार्फत अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा हया संस्थेमार्फत विशेष मोहिम राबविणेकामी (३९९५ दिव्यांगाचे UDID कार्ड बनविण्याचे काम) प्रशासकीय मंजूरी व त्याकामी होणाऱ्या रक्कम रु. ५,९९,२५०/- इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळण्याकामी मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID) देण्यासाठी अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा हया संस्थेमार्फत विशेष मोहिम राबविण्यात यावी यासाठी प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. दिव्यांग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID)देण्याकरिता प्रति दिव्यांग व्यक्ती रु. १५०/- याप्रमाणे नोंद केलेल्या ३९९५ दिव्यांगांचे UDID कार्ड बनविणे कामी रक्कम रु. ५,९९,२५०/- इतक्या खर्चास वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे. परंतु अपंग कल्याणकारी संस्था अर्नाळा यांनी दिव्यांग व्यक्तींना संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र व वैश्विक ओळखपत्र (UDID) दिल्याबाबतचा अहवाल वसई विरार शहर महानगरपालिकेस सादर करावा. सादर केलेल्या अहवाला नुसार प्रति दिव्यांग व्यक्ती रु. १५०/- या प्रमाणे अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा यांस देयक अदा करण्यात येईल. त्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

07/06/22

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर, पिन नं 401 305
दूरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107
ई-मेल -vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ३७५ विभाग : आस्थापना (मु.)

दिनांक : ०७/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदावर कार्यरत असलेले श्री. हर्षल पाटील यांना पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी नव्याने नियुक्ती देणेबाबत

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३ अन्वये दि. १६/०१/२०१६ रोजी कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) या पदासाठी मुलाखती घेऊन दि. ११/०२/२०१६ पासून सहा महिन्यांचे कालावधीसाठी श्री. हर्षल पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

मा. महासभा, ठराव क्र. ४, दि. १९/०८/२०१६ अन्वये त्यांची सेवा खंडीत करून दि. २०/०८/२०१६ रोजी पुन्हा नियुक्ती करण्यात आली. तद्नंतर पुन्हा मा. महासभा, ठराव क्र. १५, दि. ६/०३/२०१७ अन्वये त्यांची सेवा खंडीत करून त्यांची दि. १७/०२/२०१७ पासून पुनर्नियुक्ती करण्यात आली. तसेच मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. १९१, दि. ३१/०७/२०१८ अन्वये श्री. पाटील यांना पुन:श्च नव्याने नियुक्ती देण्यात आली होती. तसेच संदर्भ ४ नुसार मा. स्थायी समिती सभा, ठराव क्र. २९९, दि. २३/१०/२०१८ रोजी पुन्हा नव्याने नियुक्ती देण्यात आलेली आहे. व संदर्भ ५ नुसार नव्याने नियुक्ती देण्यात आलेली आहे.

श्री. हर्षल पाटील यांची दि. २५/१०/२०१९ रोजी नव्याने दिलेल्या ६ महिन्याचा कालावधी संपलेला आहे. दि. २६/१०/२०१९ ते दि. २५/०४/२०२० पर्यंत त्यांनी काम केले असल्याने संदर्भ क्र. ७ नुसार त्यांना अदा करण्यात आलेल्या मानधनास कार्योत्तर मान्यता देऊन व दि. २७/०४/२०२० पासुन ते दि. २६/१०/२०२० पर्यंत सहा महिन्या करिता नव्याने नियुक्ती देण्यात आलेली होती.

दि. २५/१०/२०२० पासून श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची नव्याने नियुक्तीची ६ महिन्याची मुदत संपलेली होती. संदर्भ क्र. ९ नुसार श्री. पाटील यांनी पुन:श्च नव्याने नियुक्ती देणेकामी मागणी केल्यानुसार व संगणक विभागातील कामाची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने ठोक वेतनावर अस्थायी स्वरूपात दि. २७/१०/२०२० रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन प्रशासकीय ठराव क्र. ३३३, दि. ६/०१/२०२१ नुसार दि. २८/१०/२०२० पासुन ते दि. २७/०४/२०२१ पर्यंत पुन:श्च नव्याने नियुक्ती देण्यात आलेली होती.

श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची दि. २७/०४/२०२१ रोजी सहा महिन्याची नव्याने नियुक्ती संपणार असल्याने श्री. पाटील यांनी संदर्भ क्र. १२ च्या विनंतीनुसार पुढील सहा

महिन्याची नव्याने नियुक्ती मिळणेस विनंती केली होती. त्यानुसार त्यांना मा. आयुक्त सो. यांचे आदेश जावक क्र. वविशम/आस्था/२७८/२०२१, दि. १४/०५/२०२१ अन्वये पुढील सहा महिन्यांची नव्याने नियुक्ती देण्यात आलेली होती.

श्री. हर्षल पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांना देण्यात आलेली ६ महिन्याच्या कालावधीकरीताची दिलेली नव्याने नियुक्ती दि.२८/१०/२०२१ रोजी संपुष्टात येत असून, त्यांनी पुनश्च: नव्याने नियुक्ती मिळणेकामी दि. २७/०९/२०२१ रोजी विनंती केली होती. प्रशासकीय ठराव क्र.७२१ दिनांक २९/१०/२०२१ अन्वये श्री. हर्षल पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांना एका दिवसाचा खंड देऊन दिनांक १/११/२०२१ ते ३०/४/२०२२ पर्यंत सहा महिन्यासाठी ठोक वेतनावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ५३(३) अन्वये नेमणूक करुन सदरकामी होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली होती.

श्री. हर्षल पाटील यांना देण्यात आलेली मुदत दिनांक ३०/४/२०२२ रोजी संपुष्टात येत असून त्यांनी पुन:श्च नव्याने नियुक्ती मिळणेकामी विनंती अर्ज केला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञ (I. T.) विभागात कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) संगणक विभागातील कामाची निकड पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३ (३) अन्वये या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत - यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणूकांच्या बाबतीत असा अधिकारी कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या, त्या अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल.

आयुक्तास मा. स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीवाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार आहे. तथापि सद्या प्रशासकीय कालावधी असल्याने नव्याने नियुक्ती देण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

तरी श्री. हर्षल पाटील कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांनी मागणी केल्यानुसार तसेच संगणक विभागातील कामाची निकड पाहता सदर पदास सहा महिन्यांचा दिनांक ०२/०५/२०२२ ते ३१/१०/२०२२ या कालावधीपर्यंत कंत्राटी पध्दतीने त्यांना यापुर्वी देत असलेल्या रक्कम रू.५०,०००/- प्रति महिना ठोक वेतनावर अस्थायी स्वरूपात दि. ०१/०५/२०२२ रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन (दि. ०१/०५/२०२१ रोजी सुट्टीचा दिवस (महाराष्ट्र दिन)) पुन:श्च नव्याने नियुक्ती देणेकामी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. पुढील सहा महिन्यांचा कालावधीसाठी ठोक वेतनावर पुन:श्च नव्याने नियुक्ती देणेकामी

सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावावर विचार विनीमय करून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

ठराव/ निर्णय :-

माहिती तंत्रज्ञान विभागातील ठोक वेतनावरील श्री. हर्षल रघूनाथ पाटील, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) यांची मुदत दि. ३०/०४/२०२२ रोजी संपली आहे. श्री. हर्षल पाटील यांचा कामाचा अनुभव बघता व संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता रक्कम रू.५०,०००/- प्रति महिना ठोक वेतनावर अस्थायी स्वरूपात दि. ०१/०५/२०२२ रोजीचा एक दिवसाचा खंड देऊन (दि. ०१/०५/२०२१ रोजी सुट्टीचा दिवस (महाराष्ट्र दिन)) पुन:श्च नव्याने नियुक्ती देणेकामी सहा महिन्याच्या कालावधीकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ५३ (३) अन्वये नेमणूक करण्यास तसेच सदर कालावधीच्या ठोक वेतनावरील होणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

सदरचा खर्च महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स) या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

06/06/22

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ३७८ — विभाग : बांधकाम विभाग

दिनांक :०७/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२४ मध्ये जनकपुरधाम येथे ६ सीटचे शौचालय बांधणेकामी मा.अति आयुक्त हयांची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.१०,२८,१९८/-

प्रस्तावाचा मजुकर :- प्रभाग समिती सी कार्यक्षेत्रातील प्र.क्र.२४ मध्ये जनकपुरधाम येथील शौचालयाची पाहणी केली असता सदरचे शौचालय हे जीर्ण अवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर शौचालयाच्या भिंती तसेच सेप्टीक टँकचा स्लॅब पूर्णपणे खराब झाला असून सदरचा स्लॅब हा नादुरुस्त अवस्थेत आहे. त्यामुळे सदर सेप्टीक टॅंकवर बांधण्यात आलेले शौचालय हे धोकादायक अवस्थेत असून ते कोसळ्लेले आहे. शौचालय धोकादायक स्वरुपात असून जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर अस्तित्वातील शौचालय निष्कषित करुन त्याची पुर्नबांधणी करणे उचित वाटते.

त्यानुसार सदर गटाराची दरसुची २०२१-२२ नुसार रक्कम रु.१०,२८,१९८/- इतक्या किंमतींचे अंदाजपत्रक तयार करुन सादर करीत आहे.

कामाचे स्वरुप :- ६ सीटचे शौचालय
सेप्टीक टँक
रॅम्प व टाईल्स

अंतर्गत कामे :-

यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :-

जागेची मालकी :- वसई-विरार शहर महानगरपालिका

विकास आराखडयातील आरक्षण :- --

अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- शौचालय व मुताऱी व्यवस्था
ब) मुळ तरतूद :- ४,००,००,०००/-
क) शिल्लक :- ३,६४,१६,१६८/-
ड) तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. ०१ पृष्ठ क्र. ५०
अ.क्र. ३

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२४ मध्ये जनकपुरधाम येथे ६ सीटचे शौचालय बांधणे या कामाची आवश्यकता लक्षात घेता चालू दरसूची सन २१-२२ नुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१०,२८,१९८/- किंमतीच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त सो. हयांचेकडील दि.२६/०६/२०२१ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म / आ.का/४८/२१ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

अति आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. 379

विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :- 07/06/2022

<u>प्रस्तावाचां विषय</u> :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील सर्व्हे नं. 325/13 जॉन-XXIII शाळेच्या मागे, विरार (प) या महानगरपालिकेच्या आरक्षित जागेतील नविन सार्वजनिक दिवाबत्ती पोल उभारणी करणेंचे काम यशवंत नगर येथील सर्व्हे नं. 376 स्थलांतरीत करुन करणेबाबत....

<u>प्रस्तावाचा मजकुर</u> :- वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सार्वजनिक रस्त्यावर, उदयान, तलाव, मैदान, स्मशानभुमी यासोबतच विभागीय कार्यालये, समाज मंदिर, बहुद्देशिय इमारत, रुग्णालय व आरोग्य केंद्र इ. ठिकाणांची दिवाबत्ती व्यवस्था महानगरपालिकेमार्फत करणेंत येते व त्यांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती विद्युत विभागामार्फत करणेंत येते.

महानगरपालिकेच्या सर्व्हे नं.325/13 जॉन-XXIII शाळेच्या मागे, विरार (प) या महानगरपालिकेच्या आरक्षित जागेत, रस्त्याच्या कडेला वर्षोनुवर्षे उभी असलेली बेवारस वाहने स्थलांतरित करावयाचे असल्याने त्याठिकाणी सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणेंकरिता मा.सहा.आयुक्त सो. यांनी सुचित केले होते.

त्यानुसार, सदर ठिकाणी पाहणी करुन सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणेचे प्रस्ताव घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. प्राप्त लघुत्तम दराचे निविदाधारक मे.नितीन इलेक्ट्रीकल्स, ठाणे यांना दि.09/09/2021 रोजीचे जा.क्र.वविशम/प्रसए/विवि/122/21-22 अन्वये कामाचा कायदिश देणेंत आला. परंतु, सर्व्हे नं.325/13 जॉन-XXIII शाळेच्या मागे, विरार (प) या ठिकाणी वाहनांची ने-आण करणेकरिता रस्ता उपलब्ध नसल्याने सदर ठिकाणी बेवारस वाहने ठेवण्यात येत नाही.

दि.09 मे 2022 रोजी मा.आयुक्त तथा प्रशासन यांच्या अध्यक्षेखाली झालेल्या आढावा बैठकीत महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बेवारस वाहने विरार (प), यशवंत नगर येथील सर्व्हे नं.376 या जागी ठेवणेंकरिता निर्देश दिले व सदर ठिकाणी आवश्यकतेनुसार तातडीने प्रकाश व्यवस्था करण्याची सुचना दिली आहे.

त्याअनुषंगाने, विरार (प), यशवंत नगर येथील सर्व्हे नं.376 परिसरात पाहणी केली असता, सर्व्हे नं.325/13 जॉन-XXIII शाळेच्या मागे, विरार (प) या परिसरामध्ये दिवाबत्ती व्यवस्था करणेंकरिता घेण्यात आलेले विषयातील विद्युतीय साहित्यांचा तपशिल समान आहे.

तथापी, यशवंत नगर येथील सर्व्हे नं. 376 या आरक्षित जागेत नव्याने दिवाबत्ती व्यवस्था करणेंकामी ई-निविदा प्रक्रिया राबवुन निविदा मागविण्यास वेळ व मनुष्यबळ खर्ची होऊन काम करुन घेण्यास विलंब होईल. तसेच, सर्व्हे नं.325/13 जॉन-XXIII शाळेच्या मागे विरार (प) येथील मंजूर असलेला प्रस्ताव विरार (प) यशवंत नगर येथील सर्व्हे नं. 376 या महानगरपालिकेच्या आरक्षित जागेत स्थलांतर केल्यामुळे मंजुर तपशिल व कामाव्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त खर्च होणार नाही.

सबब वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील सर्व्हे नं. 325/13 जॉन-XXIII शाळेच्या मागे, विरार (प) या महानगरपालिकेच्या आरक्षित जागेतील नविन सार्वजनिक दिवाबत्ती पोल उभारणी करणेंचे काम यशवंत नगर येथील सर्व्हे नं. 376 येथे स्थलांतरीत करुन करणेकामी मंजूरीस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) कार्यक्षेत्रातील सर्व्हे नं. 325/13 जॉन-XXIII शाळेच्या मागे, विरार (प) या महानगरपालिकेच्या आरक्षित जागेतील नविन सार्वजनिक दिवाबत्ती पोल उभारणी करणेंचे काम यशवंत नगर येथील सर्व्हे नं. 376 येथे स्थलांतरीत करुन करणे कामास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८०

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील किणीपाडा ते काठेपाडा रोडवर नविन पोल व एल.ई.डी. फिटींग लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **अंदाजपत्राकिय रक्कम** :- रु.४,७४,७३६/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती(ए) विरार(प) कार्यक्षेत्रात विद्युत विभागामार्फत महिला,बालक व नागरिकांच्या सुविधेसाठी नविन स्ट्रीटलाईट पोल उभारुन त्यावर दिवे लावून दिवाबत्ती व्यवस्था करण्यात येत असते. सदर परिसरात स्ट्रीटलाईट व्यवस्था नसल्याने दि.१९/०५/२०२२ आवक क्र. १६७८ नुसार नविन स्ट्रीटलाईट व्यवस्था करणे कामी पत्र प्राप्त झाले. त्यानुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

३) **जागेची मालकी** :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) **कामाचे स्वरुप** :- ६ मी. जी.आय. पोल - १८ नग, एल.ई.डी. स्ट्रीटलाईट फिटींग -१८ नग , आर्मड केबल ४x६ sq.mm-६६६ मी, सिंगल ब्राकेट- १८ नग, अर्थिंग -२० नग, टायमर बॉक्स - १ नग

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था/टायमर व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील किणीपाडा ते काठेपाडा रोडवर नविन पोल व एल.ई.डी. फिटींग लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रक्कम ४,७४,७३६/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८७ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/९/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), हद्दीतील सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता पोलची रंगरंगोटी व नादुरुस्त एफ.आर.पी.बॉक्स बदली करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु.४,९४,६१४/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प) कार्यक्षेत्रात महानगरपालिकेतर्फे सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था करणेत आली असुन मुख्य रस्त्यावर व अंतर्गत रस्त्यावर विद्युत पोल उभारणी करण्यात आली आहे.सदरचे पोल ऊन व पाऊसामुळे कालांतराने गंजत असल्याने पोलची रंगरंगोटी केल्यास पोल सडण्याची प्रक्रिया कमी होते.याकरिता सदरचे सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेमधील गंजलेले पोल व रंग गेलेले पोल पुनश्च रंगरंगोटी करणे तसेच नादुरुस्त व तुटलेले एफ.आर.पी.बॉक्स तातडीने बदलणे आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे दिवाबत्तीची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) कामाचे स्वरुप :- पोलची रंगरंगोटी - ३६८ नग, एफ.आर.पी.बॉक्स - २६० नग

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), हद्दीतील सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता पोलची रंगरंगोटी व नादुरुस्त एफ.आर.पी.बॉक्स बदली करणेकामी येणाऱ्या रक्कम ४,९४,६१४/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८२ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), हद्दीतील सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता सडलेले,पडलेले पोल नव्याने उभारणी करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **अंदाजपत्राकिय रक्कम** :- रु.४,९५,७२१/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प) विभागात बालकांच्या व नागरिकांच्या सुविधेसाठी नविन स्ट्रीटलाईट पोल उभारुन त्यावर दिवे लावून दिवाबत्ती व्यवस्था करण्यात येत असते. सदर परिसरात असणारे पोल हे भूतपूर्व नगरपरिषद काळापासून असल्याने जमिनीपासून व मध्यभागी गंजल्याने रस्त्यावर तथा वाहनांवर पडून मोठा अपघात घडू नये.याकरिता सदरचे पोल तातडीने बदलणे आवश्यक असल्याने सोबत जोडलेल्या अंदाजपत्रका-प्रमाणे दिवाबत्तीची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

३) **जागेची मालकी** :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) **कामाचे स्वरुप** :- ८ मी. पोल - १६ नग, ६ मी. जी.आय. पोल - १२ नग, HPSV फिटींग - २८ नग, ब्राकेट - २८ नग

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), हद्दीतील सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता सडलेले,पडलेले पोल नव्याने उभारणी करणे कामी येणाऱ्या रक्कम ४,९५,७२१/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८३

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/६ /२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), हद्दीतील सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता नादुरुस्त भुमिगत केबल बदली करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु. ४,९८,१८०/- (सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प),विभागात नागरिकांच्या सुविधेसाठी स्ट्रिटलाईट पोल उभारुन दिवाबत्ती व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु विद्युत केबलवर अतिरिक्त भार वाढल्याने तसेच शार्ट सर्किटमुळे केबल नादुरुस्त होत असते. त्यामुळे परिसरातील स्ट्रिटलाईट बंद राहु नये त्याकरिता नादुरुस्त केबल तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे असल्याने सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय केबल बदली करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) कामाचे स्वरुप :- एफ.आर.पी.बॉक्स – २६ नग,आर्मड केबल ४x२५ sq.mm-९३६ मी,DWC पाईप -८३२ मी,जी.आय.पाईप - १० मीटर

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), हद्दीतील सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता नादुरुस्त भुमिगत केबल बदली करणे कामी येणाऱ्या रक्कम ४,९८,१८०/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८४ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/९/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील नादुरूस्त एल.ई डी. दिवे दुरूस्त करून कार्यान्वीत करणेकामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु. ४,९८,८७०/- (सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील नादुरूस्त एल. ई.डी.दिवे दुरूस्त करून कार्यान्वीत करणेकामी विविध ठिकाणी दिवाबत्तीची सोय नसल्यामुळे सदर ठिकाणी नागरीकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होते.असल्यामुळे सदर ठिकाणी दिवाबत्ती व्यवस्था करणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच वेळोवेळी म. रा.वि.मंडळ मार्फत कमी /जास्त विजेचादाब येत असल्याने एल. ई.डी. नादुरूस्त होत असल्याने नादुरूस्त एल. ई.डी.दुरूस्त करणे गरजेचे आहे.त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाचे स्वरुप	अंदाजपत्रकीय रक्कम
१	वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील नादुरूस्त एल.ई डी. दिवे दुरूस्त करून कार्यान्वीत करणे.	४५ वॅट एल. ई. डी. ड्रायव्हर- १०० नग, ७५ वॅट एल. ई. डी. ड्रायव्हर- २२० नग, १०० वॅट एल. ई. डी. ड्रायव्हर- ५० नग	४,९८,८७०/-

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील नादुरूस्त एल.ई डी. दिवे दुरूस्त करून कार्यान्वीत करणे कामी येणाऱ्या रक्कम ४,९८,८७०/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८५

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७ / ६ /२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील मलनि:स्सारण केंद्रामध्ये (STP) येथे एल.ई.डी. फिटींग लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु. ४,९१,५७६/- (सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात बोळींज येथे ३० द.ल.ली. क्षमतेचे मलनि:स्सारण केंद्र (STP) असून सदर योजनेची देखभाल दुरुस्ती यापुर्वी या योजनाच्या ठेकेदारामार्फत करण्यात येत होती. परंतु,सदर योजनेची देखभाल दुरुस्ती महानगरपालिकेमार्फत दि.०३/०९/२०२० रोजीचे जा.क्र.वविशम/पा.पु/२२६/२०२० अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी आदेशित केले आहे.

सदर मलनि:स्सारण केंद्र (STP) २४ x ७ कार्यान्वित असतो.परंतु मलनि:स्सारण केंद्रामध्ये असणा-या स्ट्रीटलाईट फिटींग /ब्लोवर रुम/MBBR टँक/फाईन स्क्रीन/STDU/Alum टँक तसेच प्रशासकीय इमारत आवारात इ.करिता लावण्यात आलेल्या फिटींग पूर्णपणे बंद असल्याने रात्रीच्या वेळी कर्मचा-यांना काम करतेवेळी अडचण निर्माण होत असते, मलनि:स्सारण केंद्राच्या आवारात ठेवण्यात आलेल्या गाड्या व साहित्यांची चोरी होऊ नये तसेच अंधारात सरपडणारे विषारी प्राणी पायाखाली येवुन कोणत्याही प्रकारची हानी होवु नये याकरिता सदर ठिकाणी कर्मचा-याच्या सुविधेसाठी व सुरक्षिततेच्या दृष्टीने नविन फिटींग लावुन दिवाबत्ती व्यवस्था करणे गरजेचे असल्याने सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) कामाचे स्वरुप :- एल.ई.डी. स्ट्रीटलाईट फिटींग - २२ नग,एल.ई.डी. हाय-बे फिटींग- १८ नग गेट फिटींग - ४ नग,पाईप टाईप अर्थिंग- ९ नग,जी.आय.स्ट्रीप – १६ किलो.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील मलनि:स्सारण केंद्रामध्ये (STP) येथे एल.ई.डी. फिटींग लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रक्कम ४,९१,५७६/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८६

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील मलनि:स्सारण केंद्रामध्ये (STP) असलेल्या PLC रुम व कॉम्फरन्स रुममध्ये वातानुकुलित यंत्रणा बसविणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु. ४,९८,०८६/- (सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प) कार्यक्षेत्रातील मलनि:स्सारण केंद्रामध्ये (STP) असलेल्या PLC रुम व कॉम्फरन्स रुममध्ये असणा-या वातानुकुलित यंत्रणा नादुरुस्त असल्याने मा.शहर अभियंता यांनी १५/०३/२०२२ रोजी वातानुकुलित यंत्रणा दुरुस्ती अथवा नव्याने बसविणेकरिता आदेशित केले आहे.त्यानुसार सदर ठिकाणी पाहणी केली असता वातानुकुलित यंत्रणा जून्या झाल्याने दूरूस्ती काम करणे शक्य होत नसल्याने उष्णतामानमुळे SCADA व PLC रुममधील संगणक यंत्रणा उष्णतामानमुळे बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच सदरील वातानुकुलित यंत्रणा नव्याने लावणे गरजेचे आहे.

३) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) कामाचे स्वरुप :- १.५ टन वातानुकुलित यंत्रणा - ६ नग,कॉपर पाईप - ७८ मिटर, पी.व्ही.सी. पाईप - ७८ मिटर, स्टॉबिलायझर - ६ नग

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील मलनि:स्सारण केंद्रामध्ये (STP) असलेल्या PLC रुम व कॉम्फरन्स रुममध्ये वातानुकुलित यंत्रणा बसविणे कामी येणाऱ्या रक्कम ४,९८,०८६/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८७ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-७/६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), बोळींज विभागीय कार्यालयातील चौथ्या मजल्यावर विद्युतीकरण करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु.३,३०,९२६/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प) बोळींज विभागीय कार्यालयातील दुसरा मजला येथे सार्वजनिक बांधकाम विभाग,लेखा विभाग, पाणीपुरवठा विभाग,उदयान विभाग तसेच निवडणुक विभाग इ. विभागांचे काम करण्यात येते. परंतु सदरचा पूर्ण मजला हा निवडणुक विभागाकरिता वापरण्याचे प्रस्तावित असल्याने तेथील मजल्यावरील सार्वजनिक बांधकाम विभाग,लेखा विभाग, पाणीपुरवठा विभाग तसेच उदयान विभाग हे चौथ्या मजल्यावर स्थलांतर करण्याचे प्रयोजन असल्याने त्याठिकाणी विद्युत वायरिंग,डिस्ट्रीबुशन बोर्ड,फॅन,लाईटींग व्यवस्था तसेच संगणकाकरिता सॉकेट पॉईंट काम करुन घेणे करणे गरजेचे आहे.

३) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) कामाचे स्वरुप :- पोईंट- ६७ नग, सॉकेट स्विच पोईंट - ४९ नग,६A स्विच -४४ नग, १६A स्विच - ५ नग, ६A सॉकेट - ४४ नग, १६A सॉकेट - ५ नग,१८ मोडयुलर स्विच बॉक्स - ८ नग, १२ मोडयुलर स्विच बॉक्स - ४ नग, २ x १.५ स्के.एम.एम.वायर - २२६ मिटर,२ x २.५ स्के.एम.एम.वायर - २२४ मिटर,सिलिंग फॅन - १२ नग,एल.ई.डी.फिटींग-४० नग, ४x१६ स्के.एम.एम.केबल - ५४ मी., ४x२५ स्के.एम.एम.केबल -५४मी.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), बोळींज विभागीय कार्यालयातील चौथ्या मजल्यावर विद्युतीकरण करणे कामी येणाऱ्या रक्कम ३,३०,९२६/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८८ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील वटार वरळी रोडवर नविन पोल व एल.ई.डी. फिटींग लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु.४,९३,६९६/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प) कार्यक्षेत्रात विद्युत विभागामार्फत महिला,बालक व नागरिकांच्या सुविधेसाठी नविन स्ट्रीटलाईट पोल उभारुन त्यावर दिवे लावून दिवाबत्ती व्यवस्था करण्यात येत असते. दि.१७/०३/२०२२ आवक क्र. १२६१६ नुसार नविन स्ट्रीटलाईट व्यवस्था करणे कामी पत्र प्राप्त झाले. त्यानुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता परिसरात असलेली दिवाबत्ती व्यवस्था म.रा.वि.वि.कंपनीच्या उच्चदाब पोलवर असल्याने विद्युत प्रवर्तन (Induction) मुळे प्रत्यक्षात देखभाल दुरुस्तीचे काम करण्यास कर्मचा-यास अपघात होऊन जिवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.तसेच,विद्युत प्रवर्तन (Induction) या तांत्रिक कारणामुळे सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेतील दिवे वारंवार बंद पडण्याचे प्रकार घडत असतात.दिवे बंद झाल्यास देखभाल दुरुस्तीचे कामास महानगरपालिकेस वांरवार उच्चदाब वाहिनी बंद करुन द्यावी लागते.याकरिता सदर परिसरात महानगरपालिकेचे पोल उभे करुन स्ट्रीटलाईट व्यवस्था केल्यास ग्रामस्थांना रात्रीच्या वेळी/पहाटे नोकरीला किंवा शेतकरी वर्ग असल्याने भाजी विक्री करण्यास जाण्यास अडचण निर्माण होणार नाही. तरी,सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) कामाचे स्वरुप :- ६ मी. जी.आय. पोल - १४ नग, एल.ई.डी. स्ट्रीटलाईट फिटींग -२१ नग , आर्मड केबल ४x६ sq.mm-७६० मी, सिंगल ब्राकेट- १४ नग, अर्थिंग -२३ नग,पाईप पोस्ट - ७नग, टायमर बॉक्स - १ नग

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "विकास निधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था/टायमर व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कार्यक्षेत्रातील वटार वरळी रोडवर नविन पोल व एल.ई.डी. फिटींग लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रक्कम ४,९३,६९६/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३८९

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ९ / ६ /२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल विराटनगर रवि अपार्टमेंट,आगाशी रोड,गोकुळ टाऊनशिप,विरार गार्डन रोड तसेच बोळींज नाका येथील हायमास्टला एल.ई.डी. फ्लड फिटींग लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु. ४,९८,८९८/- (सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प) विभागात बालकांच्या व नागरिकांच्या सुविधेसाठी नविन स्ट्रीटलाईट पोल व चौकात हायमास्ट उभारुन त्यावर दिवे लावून दिवाबत्ती व्यवस्था करण्यात येत असते. भुतपूर्व काळात सदर नमूद हायमास्टवर ४०० वॅट क्षमतेचे MH फ्लड दिवे लावुन व्यवस्था करण्यात आली आहे. परंतू सदरच्या MH फ्लड दिवे बंद झाल्यास महानगरपालिकेस लागणारे वाहन तसेच मॅनपॉवरच्या अभावी दुरुस्तीकरिता लागणारा वेळ यामुळे माजी सदस्य नाराजी व्यक्त करत असतात. तरी सदर ठिकाणी १५० वॅट क्षमतेचे एल.ई.डी.दिवे लावल्यास महानगरपालिकेचा वीजदेयकात आर्थिक फायदा होईल तसेच नव्याने लावण्यात येणा-या एल.ई.डी. फ्लड फिटींगचे दोषदायित्व कालावधी ३ वर्षाचा असल्याने दोषदायित्व कालावधीत फिटींग नादुरुस्त झाल्यास मंजूर निविदाधारकाकडून त्याची दुरुस्ती करण्यात येईल. तरी,सोबत जोडलेल्या अंदाजपत्रका-प्रमाणे एल.ई.डी. फ्लड फिटींग लावणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) कामाचे स्वरुप :- १५० वॅट एल.ई.डी. फ्लड फिटींग - २८ नग ,आर्मड केबल ४x६ स्के.एम.एम. केबल - ५७ मीटर, जी.आय स्ट्रीप -६ नग

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प), मधिल विराटनगर रवि अपार्टमेंट,आगाशी रोड,गोकुळ टाऊनशिप,विरार गार्डन रोड तसेच बोळींज नाका येथील हायमास्टला एल.ई.डी. फ्लड फिटींग लावुन दिवाबत्तीची व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रक्कम ४,९८,८९८/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३९०

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कै.मनुभाई शहा निदान केंद्र, विराटनगर आतील विद्युतीकरण करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **अंदाजपत्राकिय रक्कम** :- रु.३,७६,८०२/- (सन २०२१-२२ चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ए) विरार (प) कै.मनुभाई शहा निदान केंद्र, विराटनगर येथे नगरपरिषद काळात वायरिंग करण्यात आली असुन सदरची वायरिंगवर अतिरिक्त डीप फ्रीज,संगणक,प्रिंटर, फॅन झाल्याने विद्युत वायरिंग ताण वाढल्याने नादुरुस्त होऊन सातत्याने शार्ट सर्किट होत असते तरी सदरची नव्याने विद्युत वायरिंग,डिस्ट्रीबुशन बोर्ड, लोमकळणा-या वायर्स,नादुरुस्त स्विच आणि सॉकेट बदली करुन घेणे करणे गरजेचे आहे.

३) **जागेची मालकी** :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) **कामाचे स्वरुप** :- पोईंट- ६२ नग, सॉकेट स्विच पोईंट - ३४ नग,६A स्विच -२२ नग, १६A स्विच – १२ नग, ६A सॉकेट - २२ नग, १६A सॉकेट - १२ नग, १८ मोडयुलर स्विच बॉक्स - ६ नग, १२ मोडयुलर स्विच बॉक्स - ४ नग,२ x १.५ स्के.एम.एम.वायर - १९८ मिटर,२ x २.५ स्के.एम.एम. वायर - १०८ मिटर,वातानुकुलित यंत्रणा – २ नग,सिलिंग फॅन - १२ एल.ई.डी.फिटींग -४ नग, एल.ई.डी.ट्युबलाईट -३४ नग, ४x१६ स्के.एम.एम.केबल-३२ मी., ४x२५ स्के.एम.एम.केबल-३२मी.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम १५,००,००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यतेस्तव सादर

प्रस्तावाचा ठराव :- प्रभाग समिती (ए) विरार (प), कै.मनुभाई शहा निदान केंद्र, विराटनगर आतील विद्युतीकरण करणे कामी येणाऱ्या रक्कम ३,७६,८०२/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ३९१ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- ७/६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती (ए) बोळींज कार्यालयातील सभापती दालन,सहाय्यक आयुक्त दालन, लेखापाल दालन,उप-अभियंता दालन,अधिक्षक दालनाकरिता वातानुकुलित यंत्रणा बसविणे कामी येणा-या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्राकिय रक्कम :- रु. ४,८२,०७९/- (सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना दि. ०३ जुलै, २००९ रोजी झाली असून त्यामध्ये नगरपरिषदा व ५५ महसूली गावांचा समावेश असून येथील कार्यक्षेत्रात ६ रुग्णालये, २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, ३ माताबाल संगोपन केंद्रे व ४ दवाखाने कार्यरत आहेत. या सर्व विभागाचे कामकाज वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालये, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने येथे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी तसेच आजुबाजुच्या ग्रामीण परिसरातून रुग्ण दैनंदिन तपासणीकरिता येतात. सदर तपासणी करिता औषधे व साहित्यांची आवश्यकता असते. आवश्यकतेनुसार संबंधित सर्व केंद्रांना औषधे, सर्जिकल साहित्य व उपकरणे उपलब्ध करुन देण्यात येतात. रुग्णालयात दाखल झालेले रुग्णांना उपचारा दरम्यान सर्जिकल साहित्याची आवश्यकता असते. परंतु काही सर्जिकल साहित्य ई-निविदा यादीमध्ये समाविष्ट नसल्याने उपलब्ध करुन घेणे गैरसोयीचे होत आहे. सद्यस्थितीत सर्जिकल साहित्य खरेदी करणेची निकडीची बाब लक्षात घेता महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.०७ मे,२०२१ च्या शासन निर्णयानुसार व महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील ३.२.३ नुसार यांच्याकडून प्राप्त शासन निर्णयानुसार दरपत्रक मागवून खरेदी करणे योग्य होईल. याकामी रु.१०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सर्जिकल साहित्याचा तपशिल

अ.क्र	सर्जिकल साहित्याचे नाव	तपशिल	मागणी
१	Infant feeding tube no.6	Disposable	१०००
२	Infant Feeding tube no. 5	Disposable	१०००
३	Infant Feeding tube no. 7	Disposable	१०००
४	ET tube no. 2,2.5,3,3.5 mm	Portex sterile 20mm siliconised oral/nasal Ref-100/11/020	५००
५	Baby wipes	Soft touch	५००
६	Micro Polysyte Duo	(clear) polymed extension line as accessory of infusion (small bore)	५००
७	Venti tubing for NICU	Fisher & Paykel Article code rt265 Neonatal circuit +MR 290 Chamber (box 10) Dual heated	२०

८	Ecg Lead	disposable	१०००
९	Iv Extension	10 cm- disposables	३००
१०	Iv Extension	50 cm- disposables	३००
११	Iv Extension	100 cm- disposables	३००
१२	Iv Extension	150 cm- disposables	३००
१३	Iv Extension	200 cm- disposables	५००
१४	T piece adult triple lumen	disposable	१००
१५	CVP Line Triple Lumen	Disposable 5.5FR/22G(P)/20G(D)L-200MM	१५
१६	CVP Line Double Lumen	Disposable 4FR/22G(P)-22(D),L-200MM	१५
१७	Single lumen	Disposable 3FR/20G-150MM	१५
१८	Spinel needle no.25/26	0.50mmX90mm 25GX3.50IN Ref 405122 Qincketype point	५००
१९	Crepe bandage	Big Size	५००
२०	Machentosch Sheet	1 Mtr	१२०

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात "रुग्णालयीन इतर साहित्य खरेदी" या लेखाशिर्षाखाली रु.१०,००,००,०००/- इतकी तरतुद केलेली असून या तरतूदीमधून आवश्यक सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी येणारा खर्च भागविता येणे शक्य होणार आहे. यास लेखा विभाग व लेखा परिक्षण विभाग यांनी मान्यता देऊन शिफारस केली आहे. तरी यानुसार महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता वरील नमुद केलेले सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी दरपत्रक मागविणेस प्रशासकीय व वित्तिय मान्यतेची आवश्यकता आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकरिता आवश्यक सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी रक्कम रु.१० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि.०७ मे,२०२१ च्या शासन निर्णयानुसार व महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील ३.२.३ नुसार दरपत्रक प्रक्रिया करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

०७/०८

(अनिलकुमार पवार)
आयुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५

दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ४७२ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ९/६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- विरार (पू) ववि‌शम मुख्य कार्यालयीन इमारतीमधील मा.सर्वसाधारण सभागृहात दुरुस्ती तसेच विविध विभागांत किरकोळ कामे करणेकरीता मा.उप आयुक्त सा‌ो. बांधकाम विभाग हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- ववि‌शम मुख्य कार्यालयीन इमारतीमध्ये मा. सर्वसाधारण सभागृहात वेळोवेळी बैठका आयोजित होत असतात. सभागृहातील स्टेज व लाकडी टप्पे जीर्ण झाले असल्याने ठिकठिकाणी तुटले आहे. सबब अपघात होणेची शक्यता नाकाराता येत नाही. तसेच सदरचे नादुरुस्त टप्पे व स्टेजची दुरुस्ती करणेबाबत मा.सचिव हयांचे तोंडी आदेश प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणे मनपा इमारतीमधील विविध दालनांत किरकोळ कामे करुन मिळणेकामी अधिकाऱ्यांमार्फत तोंडी मागणी करणेत आली आहे.

त्या अनुषंगाने सदर कामी बांधकाम विभागामार्फत चालू राज्य दरसूची सन २०२१-२२ नुसार पुढीलप्रमाणे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. सदर कामी होणारा खर्च सन २०२२- २३ च्या कार्यालय व समिती सभागृह नूतनीकरण हया लेखाशिर्षकातून भागविणेत येणार आहे.

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम	अंतभूर्त बाब
१	विरार (पू) ववि‌शम मुख्य कार्यालयीन इमारतीमधील मा.सर्वसाधारण सभागृहात दुरुस्ती तसेच विविध विभागांत किरकोळ कामे करणे	रु.२,९८,०४३/-	स्टेज, लाकडी टप्पे दुरुस्ती, कार्पेट, पडदे, इलेक्ट्रीफीकेशन व इतर किरकोळ कामे

तरी विरार (पू) ववि‌शम मुख्य कार्यालयीन इमारतीमधील मा.सर्वसाधारण सभागृहात दुरुस्ती तसेच विविध विभागांत किरकोळ कामे करणे कामी होणाऱ्या रक्कम रु.२,९८,०४३/- अंदाजित खर्चास मा.उप आयुक्त सा‌ो. बांधकाम विभाग हयांची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- विरार (पू) ववि‌शम मुख्य कार्यालयीन इमारतीमधील मा. सर्वसाधारण सभागृहात दुरुस्ती तसेच विविध विभागांत किरकोळ कामे करणेकामी चालू दरसूची सन २१-२२ नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास तसेच दरसूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबींकरीता मान्यताप्राप्त दरपत्रकानुसार होणाऱ्या एकूण रक्कम रु.२,९७,३४४/- अंदाजित खर्चास मा.आयुक्त सा‌ो. हयांचेकडील दि. १०/०२/२०२२ रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म /आ.का /१३/२२ आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप आयुक्त
बांधकाम विभाग
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. 413

विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :- 9 / 6 /2022

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (सी) चंदनसार, बहुद्देशिय इमारती करिता 200 के.व्ही.ए क्षमतेचे डिझेल जनित्र बसविणें कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत

प्रस्तावाचा मजकुर :-

1. अंदाजपत्रकीय रक्कम :-18,53,741/- (सन 2021-22 सा.बां.वि विद्युत जिल्हा दरसुचीनुसार)

2. कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (सी), चंदनसार, कार्यक्षेत्रातील विरार (पुर्व), सर्वे नं.16 बहुद्देशिय इमारतीमध्ये प्रभाग समिती (सी) कार्यालय सोबतच मुख्यालयातील वैद्यकिय आरोग्य विभाग, लेखा विभाग, महिला व बालकल्याण विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग, वृक्ष प्राधिकरण विभाग, आरोग्य विभाग, भांडार विभाग व माहिती अधिकार इ. विभागांचे कामकाज चालते. सदर इमारतीत गत:वर्षी उप.आयुक्त दालन देखिल तयार करणेंत आले आहे.

सदर बहुद्देशिय इमारतीकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत वीज पुरवठा करणेंत येतो. इमारतीचे यापुर्वीचे मंजुर वीज भार 66 कि.वॅट होते. त्यानुसार सदर इमारतीचा वीज पुरवठा खंडीत झाल्यास कार्यालयीन कामकाजात वीजेअभावी खोळंबा निर्माण होऊ नये याकरिता, मुख्य कार्यलयातील महानगरपालिकेच्या स्थापनेदरम्यान बसविणेत आलेले 82.5 के.व्ही.ए क्षमतेचे जनित्राची तात्पुरत्या स्वरुपात सदर बहुद्देशिय इमारतीत बसवुन विद्युत (लायटनिंग) व्यवस्था करणेंत आली.

परंतु, सद्यस्थितीत प्रभाग समिती (सी) चंदनसार, बहुद्देशिय इमारती मध्ये विविध विभाग व अधिकारी दालनात विद्युतीय साहित्य व उपकरणे वाढले असल्याने सुमारे 180 कि.वॅट वीज भार वाढला आहे. त्यामुळे तेथे बसविण्यात आलेले 82.5 के.व्ही.ए क्षमतेचे जनित्र अपुरे पडत आहे. यास्तव सदर इमारतीकरिता नविन 200 के.व्ही.ए क्षमतेचे डिझेल जनित्र बसविणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत सदर इमारतीकरीता कार्यान्वीत असलेले 82.5 के.व्ही.ए क्षमतेचे डिझेल जनित्र मुख्यालयातील पटांगणात बसवुन त्याव्दारे मा.सर्वसाधारण / स्थायी सभागृहाकरिता स्वतंत्रपणे अखंडीत वीजपुरवठा देणे उचित राहील.

3. जागेची मालकी :- महानगरपालिका

4. कामाचे स्वरुप :- 200 KVA DG Set - 1 नग, डिसमेंन्टलिंग 82.5 KVA DG Set - 1 नग, इरेक्टींग 82.5 KVA DG Set - 1 नग, प्लिंथ - 2 नग, अर्थिंग - 14 नग, G.I. स्ट्रीप - 98kg, AMF पॅनल - 1 नग

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2022-23 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15 कोटी रुपये तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (सी) चंदनसार, बहुद्देशिय इमारती करिता 200 के.व्ही.ए क्षमतेचे डिझेल जनित्र बसविणें कामी येणाऱ्या रक्कम 18,53,741/- रुपये पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

09/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, **फॅक्स** -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४७४ **विभाग :** बांधकाम
दिनांक : ९/६/२०२२

प्रस्तावाचा विषयः- प्रभाग समिती 'ए' मध्ये कै.भास्कर वा.ठाकूर मंडई येथे नव्याने प्रभाग समिती कार्यालयाची इमारत बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ११,२३,४८,३८३ /-

प्रशासकीय मंजूरी :- मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचा ठराव क्र. ४१४
दि. २९/०७/२०२१

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/शअ /९५२/२१-२२
दि. ०२/०८/२०२१
शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि. ०३/०८/२०२२

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ३

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख :- दि. ०३/०८/२०२२ पासुन ते
(प्रिपरेशन व स्विकारण्याची) दि. २७/०८/२०२२ दु. ३.०० पर्यत

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) कार्यकारी अभियंता
२) शहर अभियंता

विहीत मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र. 2 मध्ये प्राप्त दर पुढील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१	मे.टेन कंनस्ट्रक्शन इंडिया प्रा.लि	(+) १०.१०% जास्त दराने	----	
२	मे.ओमकार इंजि ॲण्ड कॉन्ट्रक्टर	(+) ६.३९% जास्त दराने	----	
३	मे.सुमती सोल्युशन प्रा.लि.	(+) ४.५६% जास्त दराने	----	

सदर विषयाबाबत निविदा सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर कामी ३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. ३ पैकी ३ निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. प्राप्त ३ पैकी 3 निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदा धारक मे.सुमती सोल्युशन प्रा.लि.ह्यांची (+) ४.५६ % जास्त दराची निविदा [चालू सन 2021-22च्या दरसुचीने तुलना केली असता अंदाजपत्रकीय रक्कमेच्या (-) ७.०३% कमी] मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर, त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सादर. सोबत ठराव जोडला आहे

प्रस्तावचा निर्णय :- सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी मे.सुमती सोल्युशन प्रा.लि.ह्यांचा (+)४.५६ % हा दर तुलनात्मकरित्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये मा. आयुक्त तथा प्रशासक हे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

06/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

प/१११२

वसई -विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, **फॅक्स** -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

मुख्यप्रशासकीय ठराव क्र. ८७५ **विभाग :** बांधकाम
दिनांक : ९/६/२०२२

मुख्यप्रस्तावाचा विषय:- मौजे नारंगी येथील आरक्षण क्र. २३० प्ले ग्राऊंड विकसीत करणे.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ७४,७२,७७६/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचा ठराव क्र. ५८८ दि. ०९/०३/२०२१

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वंविशम/बांध/४९८/२०२०-२१ दि. १८/०३/२०२०
शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि. २०/०३/२०२१

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. महाराष्ट्र टाईम्स , दै. नवाकाळ,
दै. परशुराम समाचार, दै. फ्रि प्रेस जर्नल
दै. इकोनॉमीक टाईस्म, दै. हिंदमाता मिरर

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख :- दि. २२ /०३ /२०२१ दु. ३.००
(प्रिपरेशन व स्विकारण्याची) पासुन ते ०५/०४/२०२१ दु. ३.०० वा.

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ३

ई-टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. ०७/०४/२०२१ दु. ३.०० वा.

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) कार्यकारी अभियंता
२) शहर अभियंता

विहीत मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र. १ मध्ये मागणी प्रमाणे उपलब्ध कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.

अ.क्र.	निविदा धारकांचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१	मे मॅनदीप एन्टरप्रायजेस	(+) १३.००% जास्त	-	-
२	मे.राठोड भाग्यजीत ऍण्ड कंपनी	०.०० %	-	-
३	मे. श्री. सद्गुरु कंन्स्ट्रक्शन	(-) १०.५४% कमी	रक्कम रुपये :- रु. १,५०,०००/- पावती क्र. :- ३९४६ फी भरल्याची दि. :- १८/०६/२०२१	-

सदर विषयाबाबत निविदा सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर कामी 3 निविदा प्राप्त झालेल्या आहेत. 3 पैकी 3 निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. प्राप्त 3 पैकी 3 निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदा धारक मे. श्री. सद्गुरु कंन्स्ट्रक्शन त्यांची (-) १०.५४% कमी दराची निविदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराची निविदा मंजूरीस्तव सादर, त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदांपैकी मे. सद्गुरु कंन्स्ट्रक्शन ह्यांचा (-)१०.५४% कमी दर हा सकारात्मक दृष्ट्या कमी व योग्य आहे. या ठरावान्वये मा. प्रशासक हे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 416 **विभाग : बांधकाम विभाग**
दिनांक : 9 / 6 / **2022**

मुख्य प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पू) प्रभाग क्र. 30 मधील मेरू अपा. ते मुख्य् नाल्यापर्यंत आर.सी.सी नाला बांधणे. या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत

प्रस्तावाचा मजकूर :-

1)	अंदाजपत्रकिय रक्कम	:-	रू.74,33,859/-
2)	प्रशासकिय मंजुरी	:-	मा. स्थायी समिती सभा वि.क्र.15 दि.21/01/2020
3)	तांत्रिक मान्यता	:-	मा. शहर अभियंता पु.क्र. I/20/186 दि.21/01/2020
4)	तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकिय रू	:-	रू. 74,33,859/-
5)	ई-टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धि	:-	वविशम/बांध/शअ/1009/19-20 दि.11/02/2020 शहर अभियंता व.वि.श.म
6)	वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धि दि.	:-	दि.12/02/2020
7)	जाहिर ई निविदा सुचना	:-	1)दै.मुबई चौफेर 2) दै.प्रहार 3) दै.मिड डे 4)दै.द फ्रि प्रेस जर्नल 5)दै.प्रात:काल 6)दै.जागरूक टाईम्स् 7)दै.पूर्णविराम
8)	ई टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धि (फेरनिविदा)	:-	वविशम/बांध/295/2021/20-21 दि. 08/03/2021
9)	वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धि दि.	:-	दि. 16/03/2021
10)	जाहिर ई निविदा सुचना(फेरनिविदा)	:-	1)दै.वृत्तमानस 2)दै.नवराष्ट्र 3)दै.नवभारत 4)दै.प्रात:काल 5)दै.मिड्डे 6) दै.स्टँडर्ड पोस्ट् 7)दै.पूर्णविराम
11)	ई टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धि (मुदतवाढ)	:-	वविशम/बांध/799/20-21 दि.31/03/2021
12)	वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धि दि.	:-	दि. 01/04/2021
12)	जाहिर ई निविदा सुचना(मुदतवाढ)	:-	1)दै.वृत्तमानस 2)दै.नवराष्ट्र 3)दै.नवभारत 4)दै.प्रात:काल 5)दै.मिड डे 6)दै.स्टँडर्ड पोस्ट् 7)दै. पूर्णविराम
13)	ई-निविदा प्राप्त्	:-	03
14)	ई निविदा उघडल्या (प्रथम लखोटा)	:-	08/04/2021
15)	ई निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा)	:-	06/10/2021
16)	प्राप्त् निविदांची संख्या	:-	03
17)	प्राप्त् निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे	:-	

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
1	मे. निळकंठ एंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) 14.99 % कमी दराने		
2	मे. रोशन एंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) 14.00 % कमी दराने		
3	मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस	अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) 14.99 % कमी दराने		

उपरोक्त् निविदांची तुलना केली असता मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस व मे. निळकंठ एंटरप्रायजेस ह्या दोघांचे निविदेतील (-) 14.99 % दर हा तुलनात्म्करित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य् आहे.

सदर कामासाठी एकच कंत्राटदार/अभिकर्ता निश्चित करणे आवश्यक असल्याने दोन्ही कंत्राटदारांना दि.08/10/2021 रोजी पत्रान्वये त्यांचे सिलबंद दर दि. 18/10/2021 रोजी दु. 12.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात सादर करणेबाबत कळविले होते. सदर विषयाबाबत मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस व मे. निळकंठ एंटरप्रायजेस ह्यांनी सादर केलेल्या पत्रा बाबत शहर अभियंता व कार्यकारी अभियंता ह्यांनी चर्चा केली. मे. शुभलक्ष्मी एंटरप्रायजेस ह्यांनी दि.18/10/2021 रोजीच्या पत्रांन्वये त्यांचे दर (-) 14.99 % कमी असुन सदर दर कमी करण्यास शक्य नाही असे कळविले आहे. तसेच मे. निळकंठ एंटरप्रायजेस ह्यांनी सादर केलेले (-) 14.99 % ऐवजी (-) 15.00 % इतक्या कमी दरास काम करून देणेस तयार असल्याचे दि. 18/10/2021 रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सदर कामाचे दर हे अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) 15.00 % कमी दराने असल्याने परफार्मन्स सिक्युरीटी म्हणून रू.4,47,000/- इतक्या रक्कमेचा डी.डी/एफ.डी.आर सादर केलेला आहे.

तरी मे. निळकंठ एंटरप्रायजेस यांच्या अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) 15.00 % कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम (क) नुसार मान्यता देण्यास व त्यांचाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. आयुक्त यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव/निर्णय – उपरोक्त कामास स्थायी समिती सभा मंजूरी दि. 21/01/2020 अन्वये प्रशासकिय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहिर निविदा प्रसिद्ध करून सकारात्मक दृष्ट्या मे. निळकंठ एंटरप्रायजेस ह्यांचे अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) 15.00 % कमी दराने हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये मा. आयुक्त मे. निळकंठ एंटरप्रायजेस ह्यांना अंदाजपत्रकिय दरापेक्षा (-) 15.00 % कमी दराने काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

07.06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.पालघर,पिन नं.-४०१३०५

प्रशासकीय ठराव क्र. : ४७५ **विभाग :-DAY-NULM**

दिनांक :- ९ / ६ /२०२२

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता शहरी बेघरांना देखभाल व व्यवस्थापन करणेकामी नवीन सामाजिक संस्थेची (NGO) नेमणूक करणेस नवीन ई-निविदा प्रक्रिया करण्यास येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता व आपुलकी शहर बेघर स्वयंसहाय्यता गटास पूर्वलक्षी प्रभावाने मुदतवाढ देणेकामी वित्तीय व प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- संदर्भ क्र. १ अन्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील दि.२०/०२/२०१५ च्या पत्रान्वये केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान राज्यात अंमलबजावणी करणेबाबत शहरी बेघरांना निवारा या घटकाची अंमलबजावणी करणेबाबत मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ क्र.२ नुसार सदरचा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पातील शहरी बेघरांसाठी दैनंदिन महसूली खर्च या लेखाशिर्षांतर्गत असलेली तरतूद रक्कम रू. १ कोटी मधून भागविण्यात येणार आहे.

संदर्भ क्र.३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६(३६) नुसार निराश्रीत किंवा गृहहीन व्यक्तींसाठी आश्रयस्थानाची व कोणत्याही स्वरूपाची मदतीची तरतूद करणे, असे नमूद आहे.

त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये हद्दितील शहरी बेघरांना वालीव, वसई पूर्व व वालईपाडा, नालासोपारा पूर्व येथे अशी दोन बेघर केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. सदर बेघर केंद्रांमध्ये ११२ बेघर व्यक्ती राहत असून सदर बेघर व्यक्तींना दि.२०/०२/२०१५ च्या पत्रामधील मार्गदर्शक सूचनांनुसार त्यांच्या निवाऱ्याकरिता एक पूर्णवेळ व्यवस्थापक व तीन काळजीवाहक त्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्र.४ नुसार दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान, राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील दि.२४/०८/२०१८ च्या पत्रानुसार नागरी बेघरांना देखभाल व व्यवस्थापन प्रशासकीय मान्यतेचा आदेश देण्यात आलेला आहे. सदर आदेशामध्ये नमुद केल्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दितील निवारा केंद्रांना देखभाल,

विद्यूत देयके, स्टेशनरी, मनोरंजन खर्च, दूरध्वनी खर्च, धुलाई खर्च, अन्नपुरवठा खर्च, व्यवस्थापन मानधन, काळजीवाहक मानधन याबाबत स्वतंत्र प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्यात येईल. शासनाकडून सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यास निधी प्राप्त होईल. तत्पुर्वी सद्यस्थितीत उक्त परियोजना मनपाच्या स्वनिधीतून भागविणे आवश्यक आहे.

संदर्भ क्र.५ व ६ अन्वये सदर बेघर केंद्रामध्ये राहत असलेल्या बेघर व्यक्तींना रोज दैंनदिन अन्न पुरवठा करणेकामी मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने आपुलकी शहर बेघर स्वयंसहायता गट यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर बेघर व्यक्तींना दैनदिन दोन वेळेच्या आहारापोटी वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दितील आपुलकी शहर बेघर स्वयंसहायता गटामार्फत चहा (दोन वेळा), नाश्ता (एक वेळा), शाकाहारी थाळी (सोमवार ते रविवार दोन वेळा), मांसाहारी थाळी (बुधवार व रविवार) (एक वेळा) दिले जाते.

सदरचा दैनंदिन अन्न पुरवठा करणेकामी प्रती बेघर व्यक्ती प्रती दिन रू.७०/- प्रमाणे ११२ बेघर व्यक्तींना रू.७८४०/- प्रमाणे प्रती माह रू.२,३५,२००/- तसेच जेवण बनविणाऱ्या स्वयंपाक्यास प्रती व्यक्ती प्रती माह रू.५,०००/- प्रमाणे ८ व्यक्तींना रू.४०,०००/- मासिक मानधन देण्यात येते. तसेच बेघर लोकांची केस कटींग व इतर साहित्य (साबण, टॉवेल, तेल) याकरिता रू.३०,०००/- असा एकूण ३,०५,२००/- इतका मासिक खर्च सदर कामी होत आहे. सदरचा खर्च हा अर्थसंकल्पीय सन २०१९-२० पासून असून त्यामध्ये वाढ झाली नाही तदनंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेने आपुलकी शहरी बेघर स्वयंसहायता गट यांना मुदत वाढ देण्यात आली होती.

आपूलकी शहर बेघर स्वयंसहायता गट यांची सदर कामाची मुदत मार्च २०२२ अखेर संपुष्टात आलेली आहे.

संदर्भ क्र.७ अन्वये निवारा व्यवस्थापक आणि काळजीवाहक यांना अनुभवी सामाजिक संस्था (NGO) मार्फत नेमणूक करून त्यांच्या अंतर्गत देखभाल व संचलन करणे अत्यंत गरजेचे आहे. अनुभवी सामाजिक संस्था (NGO) मार्फत बेघर निवारा केंद्रास अन्नपुरवठा, आरोग्य व्यवस्था तसेच आपात्कालीन परिस्थिती डॉक्टर, पोलिस, इतर सामाजिक संस्था, मनपा अंतर्गत संबधित विभाग यांच्याशी समन्वय साधून बेघर निवाऱ्याचे देखभाल आणि संचलन योग्यरित्या अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. सदर निवारा देखभाल व संचालनासाठी सामाजिक संस्थेची मार्गदर्शक सुचनेमध्ये दिलेल्या निकषानुसार नेमणूक करणे आणि निवारा देखभाल व संचलन करण्याच्या जबाबदाऱ्या सोपविणे अत्यंत आवश्यक आहे.

सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता ११२ बेघर व्यक्तींना दैंनदिन अन्न पुरवठा (चहा, नाश्ता व जेवण) करणेकामी आणि अन्न पुरवठा अंतर्गत स्वयंपाकी यांचे मानधन, तसेच बेघर लोकांकरिता आवश्यक दैनंदिन इतर किरकोळ खर्च यामध्ये (केस कटींग व साबण, शॅम्पू, तेल इ.) या बाबीचा अंतर्भाव करून

ई-निविदा काढणे व तो पर्यंत आपुलकी स्वयंसहायता गटामार्फत देण्यात येणाऱ्या कार्याची मुदत वाढ देणे आणि याकरिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता आवश्यक आहे.

तसेच, निवारा देखभाल व व्यवस्थापन हे सामाजिक संस्थेमार्फत (NGO) करण्याकरिता या घटकांतर्गत खालील कामाचा तक्ता क्र.१ आणि २ तपशीलाप्रमाणे एकूण खर्चाचा अंतर्भाव करून निविदा काढणे शासन निर्देशांनुसार अभिप्रेत असून या नुसार ई-निविदा काढल्यास सामाजिक संस्थेव्दारे बेघरांचे देखभाल व निगा प्रभावीपणे करता येईल.

निवाऱ्याचे वार्षिक देखभाल व व्यवस्थापन प्रस्तावित खर्च (२०२२-२३)
वालीव निवारा केंद्र, वसई पूर्व.

तक्ता क्र.१

अ. क्र.	तपशिल	प्रस्तावित मासिक खर्च रू.	प्रस्ताविक वार्षिक खर्च रु.	अंदाजित खर्च काढण्यासाठी घेण्-यात आलेला आधार
१.	विद्युत देयक	-	-	-
२.	इमारत देखभाल	-	-	-
३.	स्टेशनरी	६००/-	७२००/-	-
४.	स्वच्छता उपकरणे / साफसफाई खर्च /	१२,०००/-	१,४४,०००/-	१) किराणा स्टोअर मधील वस्तूंच्या किंमती, (फिनाईल, साबण, तेल, शॅम्पू पाकीट, कोलगेट इ.) (रक्कम रू.२००० साहित्य खर्च) २) रुग्णांची काळजीवाहक (GNM) मानधन. (रक्कम रू.१०,०००/-)
५.	मनोरंजन खर्च	५००/-	६०००/-	-
६.	टेलिफोन खर्च	२,०००/-	२४०००/-	-
७.	धुलाई खर्च	६००/-	७२००/-	किराणा स्टोअर मधील वॉशीन मशीन पावडार किंमत / खर्च.
८.	मोफत अन्न पुरवठा खर्च (वृध्द, रुग्ण, दिव्यांग व मुले/मुली संख्या) ५७ व्यक्तींकरिता ७० प्रमाणे.	१,१५,०१०/-	१३,८०,१२०/-	बेघर निवारा केंद्रामार्फत प्राप्त माहे जानेवारी २०२२ चे जेवणाच्या देयकाचे चलन व बिल नुसार.
९.	१ व्यवस्थापक मानधन	२१,०००/-	२,५२,०००/-	-
१०.	३ काळजीवाहक मानधन	३६,०००/-	४,३२,०००/-	१२,००० X ३ (काळजी वाहक)
११.	इमारत भाडे (लागू असल्यास)	-	-	-
१२.	आस्कमित खर्च	६,०००/-	७२०००/-	वाहन पेट्रोल खर्चाचे बील आणि हॉस्पीटल मार्फत देण्यात आलेले पेशंटच्या CT Scan चे बील.(खाजगी लॅब)
	एकूण	**१,९३,७१०/-**	**२३,२४,५२०/-**	

निवाऱ्याचे वार्षिक देखभाल व व्यवस्थापन प्रस्तावित खर्च (२०२२-२३)
वालईपाडा निवारा केंद्र, नालासोपारा.

तक्ता क्र.२

अ. क्र.	तपशिल	प्रस्तावित मासिक खर्च रू.	प्रस्ताविक वार्षिक खर्च रु.	अंदाजित खर्च काढण्यासाठी घेण-यात आलेला आधार
१.	विद्युत देयक	-	-	-
२.	इमारत दे खभाल	-	-	-
३.	स्टेशनरी	६००/-	७,२००/-	-
४.	स्वच्छता उपकरणे / साफसफाई खर्च	१२,०००/-	१,४४,०००/-	१) किराणा स्टोअर मधील वस्तूंच्या किंमती, (फिनाईल, साबण, तेल, शॅम्पू पाकीट, कोलगेट इ.) (रक्कम रू.२००० साहित्य खर्च) २) रुग्णांची काळजीवाहक (GNM) मानधन. (रक्कम रू.१०,०००/-)
५.	मनोरंजन खर्च	५००/-	६,०००/-	-
६.	टेलिफोन खर्च	२,०००/-	२४,०००/-	-
७.	धुलाई खर्च	६००/-	७,२००/-	किराणा स्टोअर मधील वॉशीन मशीन पावडर किंमत / खर्च.
८.	मोफत अन्न पुरवठा खर्च (वृध्द, रुग्ण, दिव्यांग व मुले/मुली संख्या) ५५ व्यक्तींकरिता ७० प्रमाणे.	१,००,८७०/-	१२,१०,४४०/-	बेघर निवारा केंद्रामार्फत प्राप्त माहे जानेवारी २०२२ चे जेवणाच्या देयकाचे चलन व बिल नुसार.
९.	१ व्यवस्थापक मानधन	२१,०००/-	२,५२,०००/-	-
१०.	३ काळजीवाहक मानधन	३६,०००/-	४,३२,०००/-	१२,००० x ३ (काळजी वाहक)
११.	इमारत भाडे (लागू असल्यास)	-	-	-
१२.	आस्कमित खर्च	६,०००/-	७२,०००/-	वाहन पेट्रोल खर्चाचे बील आणि हॉस्पीटल मार्फत देण्यात आलेले पेशंटच्या CT Scan चे बील.(खाजगी लॅब)
	एकूण	**१,७९,५७०/-**	**२१,५४,८४०/-**	

अ. क्र.	निवारा केंद्रांचे नाव	वार्षीक खर्च	मोफत अन्न पुरवठा खर्च (वृध्द, रुग्ण, दिव्यांग व मुले/मुली संख्या) २० % वाढीव दर	एकूण खर्च
१.	वालीव बेघर निवारा केंद्र, वसई	२३,२४,५२०/-	२,७६,०२४/-	२६,००,५४४/-
२.	वालई पाडा बेघर निवारा केंद्र, नालासोपारा	२१,५४,८४०/-	२,४२,०८८/-	२३,९६,९२८/-
	एकूण खर्च	४४,७९,३६०/-	५,१८,११२/-	४९,९७,४७२/-

याकरिता तक्ता क्र.१ आणि २ तपशीलाप्रमाणे एकूण खर्चाचा अंदाजित वार्षिक खर्च रक्कम रूपये ५०,००,०००/- (अक्षरी पन्नास लक्ष रू. मात्र) इतका अपेक्षित आहे.

DAY-NULM शहर अभियान कक्षास एकूण ४ पदाधिकारीपैंकी सद्यस्थितीत केवळ २ शहर अभियान व्यवस्थापक माहे ऑक्टोंबर २०२१ पासून कार्यरत आहेत. उर्वरीत रिक्त पदांच्या कामाचा अतिरिक्त कार्यभार वार्षिक उद्दिष्ट पूर्ततेच्या दृष्टीने सांभळण्यात येत आहे. MIS Online प्रणालीमध्ये झालेल्या उद्दिष्ट पूर्ततेची सर्व माहिती अद्यावत करण्याची जबाबदारीही शहर अभियान व्यवस्थापक यांच्यावरच असल्याने सदर माहिती दि.३१ मार्च पर्यंत अद्यावत करण्यात आली नसती तर केंद्र व राज्य शासनाकडे वसई-विरार शहर महानगरपालिका अंतर्गत झालेल्या अभियान उद्दिष्ट पूर्ततांचा सन २०२१-२२ चा अहवाल ग्राहय धरला गेला नसता, तथापि, MIS Online प्रणालीमध्ये झालेल्या उद्दिष्ट पूर्ततेची सर्व माहिती माहे मार्च २०२२ पर्यंत अद्यावत करण्यात आलेली आहे.

सदर शहर अभियान व्यवस्थापन कक्षास (DAY-NULM) प्र. लेखापाल यांना सहाय्यक लिपिक नसल्यामुळे आपुलकी बेघर निवारा केंद्राची जेवणाची व इतर अनुषंगिक देयके (स्वयंपाकी मानधन, वाहन इंधन इत्यादी) वेळेवर सादर करणे व ती देयके पाठपुरावा करून पूर्ण करणे आवश्यक असल्याने शहर अभियान व्यवस्थापक ती जबाबदारी पार पाडतात, त्याचप्रमाणे नगर परिषद प्रशासन संचलनालया (DMA) मार्फत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनानुसार तात्काळ मागविलेली माहिती सादर करणे व मार्गदर्शक सुचनेनुसार घटक निहाय वार्षीक उदिदष्टांची पुर्तता करण्याकरीताचे व्यवस्थापन विहीत कालावधीमध्ये शहर अभियान व्यवस्थापकांमार्फत केले जाते.

तसेच दि.१८ एप्रिल, २०२२ ते दि.२० एप्रिल २०२२ दरम्यान "महिला व बालके हक्क समितीचा दौरा" पालघर जिल्हयामंध्ये असल्याने त्या संदर्भत अत्यावश्यक काम DAY-NULM कक्षाकडे सोपविण्यात आल्याने व दिनांक २७ एप्रिल २०२२ दरम्यान "अनुसूचित जाती - जमातीची समितीचा दौरा" पालघर जिल्हयामध्ये असल्याने त्या संदर्भात अत्यावश्यक कामे कक्षाकडे सोपविण्यात आल्याने सदर कामी ई-निविदा प्रक्रिया करणेस विलंब झालेला आहे. तरी प्रशासकीय व वित्तीय मान्यते अंती ई-निविदेची कार्यवाही त्वरीत पुर्ण करून सामाजिक संस्था (NGO) निश्चित केली जाईल.

करिता सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता बेघरांची देखभाल व व्यवस्था करण्याकरिता ई-निविदा व्दारे नवीन सामाजिक संस्था (NGO) यांची नेमणूक करून कार्यादेश देईपर्यंत पूर्वलक्षी प्रभावाने आपुलकी बेघर स्वयंसहायता गटास मुदत वाढ देणेस तसेच सन २०२२-२३ या वित्तीय वर्षामध्ये होणाऱ्या रक्कम रू.५०,००,०००/- इतक्या अंदाजीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शहरी बेघरांना चहा, नाश्ता व जेवण, पुरविण्याकामी आपुलकी शहर बेघर स्वयंसहायता गटास पूर्वलक्षी प्रभावाने माहे एप्रिल २०२२ पासून नवीन सामाजिक संस्थेची नेमणूक होईपर्यंत मुदतवाढ दि 31/04/2022 पावेतो देण्यात येत आहे. तसेच सदर कालावधीपर्यंतच्या होणाऱ्या खर्चास वित्तीय मान्यता देण्यात येत आहे व सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता शहरी बेघरांना देखभाल व व्यवस्थापन करणेकामी अभिव्यक्ती स्वारस्याव्दारे नवीन सामाजिक संस्था (NGO) यांची नेमणूक करणेस येणाऱ्या रक्कम रू.५० लक्ष इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

06/06

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पूर्व) जि. पालघर पिन नं. ४०१३०५

प्रशासकीय ठराव क्र. ४७८ **विभाग :- दिव्यांग कल्याण**

दिनांक :- ०९/ ०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींच्या शारीरिक व आर्थिक पुनर्वसनाच्या दृष्टिने जनजागृती करण्यासाठी महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग पुनर्वसन केंद्र विरार, जिल्हा-पालघर यांस निधी उपलब्ध करून देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींच्या शारिरीक व आर्थिक पुनर्वसनाच्या दृष्टीने जनजागृती करणेसाठी निधी उपलब्ध करून देणेकामी अभिप्रायास्तव व मंजुरीकरिताचा प्रस्ताव उप-आयुक्त, दिव्यांग कल्याण विभाग यांनी सादर केलेला आहे.

सदर कामी महानगरपालिकेकडे दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीतून रु. ५ लक्ष निधी उपलब्ध करून देणेकामी उप-आयुक्त तथा दिव्यांग पुनर्वसन अधिकारी, दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विरार यांनी दि. १० नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील दि.२८ ऑक्टो. २०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील बाब क्र.१७ मध्ये अपंगांच्या कल्याणार्थ राबविण्यात येणाऱ्या योजनांचा प्रचार प्रसार करणे, ही बाब नमूद आहे.

मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र.२५ दि.२०/०२/२०१७ अन्वये महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अपंगांसाठी १ ते १३ सेवा सुविधा उपलब्ध करून देणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यातील क्र. १० मध्ये अपंग व्यक्तींकरिता प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना अनुदान देणे, ही बाब नमूद आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील दि.१०/०५/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींसाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात येतो.

तसेच सदरचा खर्च हा दिव्यांग विशेष व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना व योजना राबवणाऱ्या संस्थांसाठी योजनांतर्गत वित्तीय सहाय्य या लेखाशिर्षांतर्गत सन २०२१-२२ च्या सुधारीत अर्थसंकल्पात रु.६ कोटी तरतूद केली असून सन २०२२-२३ या वित्तीय वर्षासाठी ८ कोटी ४९ लक्ष तरतूद करण्यात असल्याचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी शिफारस केली आहे.

सदर ५ टक्के राखीव निधीतून दिव्यांग पुर्नवसन अधिकारी, दिव्यांग पुर्नवसन केंद्र, विरार यांना रक्कम रु ५ लक्ष अदा केल्यानंतर सदर रक्कम रु. ५ लक्ष निधी खर्च केलेली प्रमाणके व उपयोगीता प्रमाणपत्रे मुख्य लेखा परिक्षक तपासणी करुन प्रमाणित करेल.

तरी दिव्यांग पुनर्वसन केंद्र विरार यांना ५% राखीव निधीतून रक्कम रूपये ५.०० लक्ष (अक्षरी रूपये पाच लक्ष मात्र) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विरार, जि. पालघर या केंद्रामार्फत सर्व प्रकारच्या दिव्यांग व्यक्तींच्या शारीरिक व मानसिक, सामाजिक व व्यवसायिकदृष्ट्या पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. तसेच या केंद्रामार्फत दिव्यांगत्व येऊ नये, यासाठी जनजागृती, दिव्यांगत्व प्रतिबंधात्मक उपाय, दिव्यांगत्वांचा शोध घेणे, पुनर्वसनात्मक कार्य, कृत्रिम अवयव व सहाय्यक साधने पुरविणे, व्यवसायिक मार्गदर्शन इत्यादी कामे करण्यात येतात.

करिता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात दिव्यांग पुनर्वसन कार्यक्रमाची जनजागृती करण्यासाठी दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विरार यांच्या मागणीनुसार त्यांना ५% राखीव निधीतून रक्कम रुपये ५.०० लक्ष (अक्षरी रुपये पाच लक्ष मात्र) इतकी रक्कम धनादेशाने अदा करणेस व सदर होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

०७/०६.

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पूर्व) जि. पालघर पिन नं. ४०१३०५

प्रशासकीय ठराव क्र. ६२९ **विभाग :- दिव्यांग कल्याण**

दिनांक :- ०९/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- दिव्यांगांना कृत्रिम अवयव व सहाय्यक साहित्य पुरविणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिव्यांग पुनर्वसन केंद्र विरार मधील दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम सहाय्यक साहित्य व साधने वाटप करणेसाठी निधी उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव उप-आयुक्त, दिव्यांग कल्याण विभाग यांनी सादर केलेला आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील दि.२८/१०/२०१५ च्या शासन निर्णयानुसार अपंग व्यक्तींसाठी राखीव ठेवण्यात आलेला ३ टक्के निधी नागरी भागातील अपंगांसाठी खर्च करण्याकरिता मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग दि.१०/०५/२०१८ अन्वये केंद्र शासनाच्या निःसमर्थ दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ मधील तरतूदींच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायती/नगरपरिषद क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींसाठी ५ टक्के निधी राखीव ठेवणे आवश्यक आहे.

तसेच अपंग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ मधील नियम २७.१ नुसार सुयोग्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांची आर्थिक क्षमता आणि विकास अंतर्गत सर्व अपंग व्यक्तींसाठी विशेषत: आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या क्षेत्रातील पुनर्वसन सेवा आणि कार्यक्रम आयोजित करतील किंवा करण्यास कारणीभूत होतील (प्रोत्साहन देतील).
२७.२ नुसार उपनियम १ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सुयोग्य शासने आणि स्थानिक स्वराज्य संस्था अशासकीय संस्थांना आर्थिक सहाय्य देऊ शकतील.

उपरोक्त नमूद बाबींनुसार प्रस्तावात नमूद केलेल्या २७५ लाभार्थ्यांपैकी १३४ लाभार्थ्यांना शैक्षणिक साहित्य खरेदीकामी रु.२,४९,२९८/-, ७५ लाभार्थ्यांना कानाचे मशीन देणेकामी रु.४,८०,९००/-, ९ लाभार्थ्यांना ब्लान्ड केन देणेकामी रु.३१५०/-, ५७ लाभार्थ्यांना व्हील चेअर खरेदीकामी रु.३,०४,९५७/- अशी एकूण रक्कम रु.१०,३८,३०५/- इतक्या खर्चाचे अंदाजपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिव्यांग पुनर्वसन केंद्र विरार यांनी सादर केले आहे.

सदरचा निधी देणेकामी होणारा खर्च सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पातील दिव्यांग विशेष व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना व योजना राबविणाऱ्या संस्थांसाठी योजनांतर्गत वित्तीय सहाय्य या लेखाशिर्षांतर्गत करण्यात येणार असल्याची शिफारस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केली आहे. करिता उप-आयुक्त, दिव्यांग कल्याण विभाग यांनी प्रस्तावित केल्यानुसार सदर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिव्यांग पुनर्वसन केंद्र विरार यांना दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम सहाय्यक साहित्य व साधने वाटप करणेसाठी रक्कम रु.१०,३८,३०५/- (अक्षरी दहा लक्ष अडतीस हजार तीनशे पाच मात्र) इतका निधी आदा करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणकामी मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- उप-आयुक्त, दिव्यांग कल्याण विभाग यांनी प्रस्तावित केल्यानुसार सदर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग दिव्यांग पुनर्वसन केंद्र विरार यांना दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम सहाय्यक साहित्य व साधने वाटप करणेसाठी रक्कम रु.१०,३८,३०५/- (अक्षरी दहा लक्ष अडतीस हजार तीनशे पाच मात्र) इतका निधी आदा करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

०६/०६
(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ४३-२०

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-०९/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता सात नग बोलेरो वाहने जी.ई.एम.पोर्टल वरुन खरेदी करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (प.) ३) तामतलाव अग्निशम केंद्र, वसई गाव ४) नवघर अग्निशमन केंद्र, वसई रोड (पूर्व) ५) श्रीप्रस्थ अग्निशमन अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ६) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ७) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) अशी एकुण मिळून ७ ठिकाणी अग्निशमन दले कार्यरत आहेत. या ठिकाणी २३२ अग्निशमन कर्मचारी २४X७ कार्यरत असतात.

आपल्या महापालिकेचे क्षेत्र अदमासे ३८० चौ.कि.मी. एवढे विस्तीर्ण असून यात सागरी, नागरी व डोंगरी प्रभाग आहेत शिवाय औद्योगिक वसाहती, नागरी वसाहती, गोदामे व दाटीवाटीच्या वस्तींचे प्रमाण हि मोठे आहे. तसेच शासन निर्णयाप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रापासून २० कि.मी. च्या परिसराची देखील आपल्या अग्निशमन दलास दखल घ्यावी लागते आणि बहुतांश वेळा आपत्ती प्रसंगी पालघर, बोईसर MIDC, तारापुर पर्यंत हि सेवा दयावी लागते.

मा. अतिरिक्त आयुक्त सो. यांचे आदेशानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील प्रभाग समिती नुसार अग्निशमन कर्मचारी यांची नियंत्रक / प्रभारी अग्निशमन केंद्र अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये शहराचा विकास झपाटयाने होत असल्याने लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. नवघर (पूर्व), वालीव, गोखिवरे, गौराईपाडा, पेल्हार, कामण, विरार व पापडी हया भागात मोठया औद्योगिक वसाहती आहेत.

सदर कर्मचा-यांकडून प्रभाग समिती मधील सार्वजनिक वापराच्या व लोकांची वर्दळ असणा-या खाजगी इमारती, रुग्णालये, सिनेमा हॉल, नाटयगृहे, व्यावसायिक / वाणिज्य इमारती, संकुले, मॉल्स, हॉटेल, मोठी व्यावसायिक कार्यालये, सर्व प्रकारचे गोडाऊन, उत्पादन / औद्यागिक कारखाने, पेट्रोल / सीएनजी पंप, शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, उंच रहिवाशी इमारती इत्यादी विविध आस्थापनांना नोटीस बजावणे तसचे सदर आस्थापनांकडून अग्निसुरक्षा परिक्षण करुन घेणे व त्याबाबचा अहवाल मा. आयुक्त सो. यांना सादर करणे आवश्यक आहे. हि सर्व ठिकाणे महापालिकेच्या अग्निशमन केंद्रा अंतर्गत येत असल्यामुळे या सर्व ठिकाणी अग्निशमन सेवा बजवावी लागते.

उपरोक्त नमूद आस्थापनांची प्रत्यक्ष पाहणी करणे, वाटप केलेल्या नोटींसीचा आढावा घेणे हे काम वाहन नसल्याअभावी शक्य होत नाही. तरी अग्निशमन विभागाकरीता सात नग बोलेरो वाहनाची आवश्यकता असून विभागीय कार्यालयास उपरोक्त उप-अग्निशमन केंद्र या ठिकाणी कार्यालयीन कामकाजाची पाहणी करणे, प्राप्त होणा-या तक्रार अर्जानुसार प्रत्यक्ष जागेची पाहणी करणे, महापालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी दुर्घटना तसेच अपघात होतात तेंव्हा अशा आपत्कालीन परिस्थितीत कार्यालयीन कर्मचारी यांची ने-आण करणे तसेच बंदोबस्ताची पाहणी करणे करीता वाहने लागणार आहेत. सदर कामकाजाकरीता अग्निशमन वाहनाचा वापर करु शकत नाहीत त्यामुळे अग्निशमन विभागाकडे सात बोलेरो वाहने असणे आवश्यक आहे.

तरी अग्निशमन व आणीबाणी सेवेसाठी सात नग बोलेरो वाहनांची आवश्यकता असून सदर वाहने जीईएम पोर्टलवरुन खरेदी करणे योग्य होईल. जीएम पोर्टलवर महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे बोलेरो वाहनाची प्रती वाहन किंमत रक्कम रु. ८,९३,७७१/ असून सात नग बोलेरो वाहनांसाठी रक्कम रु. ६२,५६,३९७/- खर्च अपेक्षित आहे. त्याबाबतचे दरपत्रक सोबत जोडले आहे.

सबब महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडून ७ (सात) नग बोलेरो वाहन खरेदी करणे करीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२१-२२ सह सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ५० वर ८ नंबरचे लेखाशिर्ष **विकास निधी अंतर्गत अग्निशमन वाहन, अग्निशमन यंत्रणा असलेली मोटरसायकल व उंच शिडीसह इतर साहित्य खरेदी** यामध्ये एकुण वार्षिक रुपये ४० कोटी तरतुद असून या तरतुदी मधून सदर खर्च करता येईल.

तरी अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता सात नग बोलेरो वाहने जीईएम पोर्टलवरुन ई-निविदा प्रक्रिया करुन खरेदी करणे करीता येणा-या अंदाजित रक्कम रुपये ६३,००,०००/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिकेचे क्षेत्र व लगतचा परिसर या ठिकाणी अग्निशमन विभागास सेवा बजवावी लागते तसेच कार्यालयीन कामकाजाची पाहणी करणे, प्राप्त होणा-या तक्रार अर्जानुसार प्रत्यक्ष जागेची पाहणी करणे, पावसाळ्यामध्ये महापालिकेच्या हद्दीत विविध ठिकाणी दुर्घटना तसेच अपघात होतात तेंव्हा आपत्कालीन परिस्थितीत कार्यालयीन कर्मचारी यांची ने-आण करणे तसेच बंदोबस्ताची पाहणी करणे करीता अग्निशमन वाहनांचा वापर करता येत नाही. याकरीता अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकरीता सात नग बोलेरो वाहने ई-निविदा प्रक्रियाव्दारे जी.ई.एम.पोर्टलवरुन खरेदी करणे कामी येणा-या अंदाजीत रक्कम रु. ६३,००,०००/- खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

09/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ४२७ विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-०९/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागाकडील वाहने सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता ठेका पध्दतीने साहित्यासह देखभाल दुरुस्ती वाहन विभागाने मंजूर केलेल्या निविदाकारामार्फत करणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई - विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागात १) मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ३) सनसिटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान ४) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ५) नवघर अग्निशमन केंद्र, वसई रोड (पूर्व) ६) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पूर्व) ७) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (प.) अशी मिळून एकुण ७ ठिकाणी अग्निशमन दले कार्यरत आहेत. अग्निशमन विभागाकडे सद्या एकुण ३२ वाहने कार्यरत आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	कंपनीचे नाव	अग्निशमन वाहनाचा प्रकार	मॉडेल नं.	वाहनांची संख्या
१	टाटा	वॉटर टेंडर	१६१२/१६१६	०६
२	टाटा	मिनी वॉटर टेंडर	LPT ९०९ / ४०७	०८
३	टाटा	फोम टेंडर	१६१२	०१
४	टाटा	रेस्क्यु व्हॅन	१६१६	०१
५	टाटा	वॉटर बाऊझर	२५१८	०२
६	टाटा	क्विक रिस्पॉन्स व्हेईकल	२०२	०१
७	मान	वॉटर बाऊझर विथ टॉवर मॉनिटर	CLA ३१.३०० BS IV	०१
८	भारतबेंझ	हॅझमॅट		०१
९	महिंद्रा ॲण्ड महिंद्रा	बोलेरो जीप	Bol ZNX २ wd BS४	०२
१०	रॉयल एन्फील्ड	टु व्हिलर बुलेट वाहन	इलेक्ट्रा रेड	०७
११	महिंद्रा पीकअप			०१
१२	फोर्स			०१
			एकुण	३२

वसई-विरार शहर महानगरपालिकेतील मनपा मालकीच्या एकुण वाहनांची देखभाल दुरुस्ती संदर्भाने A.M.C. (ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रक्ट) सन २०१८-१९ व २०१९-२० या वर्षाकरीता वाहन विभागामार्फत ई-निविदा कार्यप्रणालीने करण्यात आली होती. त्यातील मंजूर निविदाकारामार्फतच सर्व वाहनांची देखभाल दुरुस्ती करण्यात येत आहे कारणाने सद्या अग्निशमन विभागाकडील वाहनांची देखभाल दुरुस्तीचे काम महापालिकेच्या वाहन विभागाने मंजूर केलेल्या निविदाकारामार्फतच करण्यात येते. अग्निशमन वाहनांच्या देखभाल दुरुस्ती कामी सन २०२२-२३ या वित्तिय वर्षामध्ये अंदाजीत रक्कम रु. १ कोटी ५० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

वाहन विभागामार्फत महानगरपालिका मालकीच्या वाहनांची देखभाल दुरुस्ती करणे कामी सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या त्रैवार्षीक वर्षासाठी ई-निविदा प्रक्रिया मंजूर असून मा. प्रशासकीय ठराव क्रं. ४५४, दिनांक ०४/०२/२०२१ अन्वये संविदा करणेस मंजुरी प्राप्त झालेवरुन दिनांक १२/०२/२०२१ रोजी करारनामा करण्यात आलेला आहे. तसेच जा. क्रं. वविशम/वाहन/६१६/२०२१ दिनांक १५/०२/२०२१ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

वाहन विभागाने मंजुर केलेल्या वाहनांच्या देखभाल दुरुस्ती ई-निविदेमध्ये अग्निशमन विभागाचे वाहनांना लागणा-या वस्तू (वाहन दुरुस्तीच्या) चे दर मजूंर आहेत. त्यामुळे अग्निशमन विभागातील वाहनांचे दैनंदिन देखाभाल दुरुस्तीचे कामे सदर मंजूर ठेक्यातून करता येतात तसेच होणा-या अंदाजीत रक्कम रु. १ कोटी ५० लक्ष खर्चानुसार सदर मंजूर ठेकादाराकडून रक्कम रु. १४५००/- चे वाढीव मुद्रांक शुल्क भरुन घेण्यात आले आहे.

अग्निशमन वाहनांची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करणे करीता वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प २०२१-२२ सह सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात **अग्निशमन वाहन दुरुस्ती निगा / कटर मशिन दुरुस्ती निगा** या लेखाशिर्षामध्ये रक्कम रु. २ कोटी तरतुद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी अग्निशमन वाहने कार्यक्षम व सुस्थितीत ठेवण्याकरीता सन २०२२-२३ ह्या वित्तिय वर्षासाठी वार्षिक ठेका पध्दतीने दैनंदिन देखभाल व दुरुस्ती वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वाहन विभागाने मंजूर केलेल्या निविदाकारामार्फत करणे करीता व त्यासाठी येणा-या रक्कम रु. १ कोटी ५० लक्ष खर्चास मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील वाहनांची सन २०२२-२३ या वर्षाकरीता दैनंदिन देखभाल दुरुस्ती वाहन विभागाने मंजूर केलेल्या निविदाकारामार्फत करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. १ कोटी ५० लक्ष खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

०७/०८

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ४२२

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-०९/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागातील वाहनांकरीता हाय प्रेशर गन खरेदी केलेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे येथील अग्निशमन वाहन क्रं. एम एच ४८ जे ११७३ व वाहन क्रं. एम एच ४८ जे ११७२ या वाहनांमधील हाय प्रेशर गन खराब झाले बाबत अग्निशमन वाहनचालक यांनी अहवाल सादर केला होता. सदर हाय प्रेशर गन चा वापर आगीच्या वर्दीवर आग विझविण्यासाठी केला जातो.

सदर हाय प्रेशर गन सन २०१२ मध्ये खरेदी केल्या असून सदर हाय प्रेशर गनचा वॉरंटी कालावधी संपलेला आहे. तसेच हाय प्रेशर गन ची सर्व्हिसींग करण्यास दर मागविलेले नाहीत. सद्या देशामध्ये कोविड-१९ साथ सुरु असल्याने राज्यभरात लॉकडाऊनची परिस्थिती सुरु होती. अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने हाय प्रेशर गन दरपत्रक मागवून खरेदी प्रक्रिया केली असता विलंब झाला असता. त्यामुळे सदर हाय प्रेशर गनची खरेदी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण ५ (२) २ प्रमाणे करण्यात आली आहे. सदर २ नग हाय प्रेशर गन खरेदी करीता रक्कम रु. ३७,७६०/- खर्च झालेला आहे. सदर खर्च श्री. दिलीप पालव यांनी स्वत:हा रोखीने केलेला आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत अर्थसंकल्प सन २०२०-२१ सह सन २०२१-२२ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर ४ नंबरचे लेखाशिर्ष अग्निशमन व्यवस्था व साहित्य खरेदी यामध्ये एकुण वार्षीक रक्कम रु. ६० लक्ष तरतूद असून सदर खर्च या तरतुदी मधून करता येईल.

तरी सदर हाय प्रेशर गन ची खरेदी अत्यावश्यक बाब असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण ५ (२) २ अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना ई-निविदा तात्काळ खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ३७,७६०/- खर्चास मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे कार्योत्तर प्रशासकीय व वित्तिय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागातील वाहनांवर हाय प्रेशर गन ची आवश्यकता असते. परंतु देशामध्ये कोविड-१९ साथ सुरु असल्याने राज्यभरात लॉकडाऊनची परिस्थिती सुरु होती त्यामुळे हाय प्रेशर गन ची खरेदी प्रक्रिया दरपत्रक मागवून केली असता विलंब झाला असता. त्यामुळे सदर खरेदी तात्काळ करण्यात आली . तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण ५ (२) २ अन्वये मा. आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार विना ई-निविदा तात्काळ खरेदी करुन झालेल्या रक्कम रु. ३७,७६०/- खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

09/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर

पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१

फॅक्स : ०२५०-२५२५१०७

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ४२३ विभाग :- बांधकाम

दिनांक :- ०९/०६/ २०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहरमहानगरपालिका , प्रभाग समिती - एफ, पेल्हार कार्यालयातील विद्युत विभागातील अंतर्गत कामे करणेकामी प्रशासकीय वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर - सादर करण्यात येते ,वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातिल प्रभाग समिती एफ पेल्हार येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे खाजगी इमारती मध्ये तात्पुरत्या स्वरुपात कामकाज सुरु होते परंतु सदर जागा मालकाने त्याची स्व:ताची इमारत खाली करुन देणेबाबत सांगितले आहे सद्यस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्र हे विद्युत विभागामध्ये स्थलांतरीत करण्याकरीता व विद्युत विभाग हे पेल्हार येथिल जुन्या कोंडवाडा येथे स्थलांतरीत करावे या बाबत मा.उपायुक्त व सहा.आयुक्त यांनी सुचना केलेल्या आहेत .

त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र विद्युत विभागात स्थालांतर करायचे असल्यामुळे जुन्या कोंडवाड्यामधील विद्युत विभागासाठी ज्या सोई सुविधा लागणार आहेत त्या सदर ठिकाणी उपलब्ध करुन देणेसाठी कोंडवाडा दुरुस्ती करुन अंतर्गत कामे करावी लागणार आहेत जेणेकरुन विद्युत विभागाची कामे सुरळीत होतील.

तरी सदर कामे ही अति तातडीने करणे गरजेचे आहे तरी सदर कामांची निविदा सुचना स्थानिक फलकावर प्रसिध्द करुन निविदा मागविणे आवश्यक आहे.

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\18-04-2022 Dar manjuri.docx669

अ.क्र	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	प्रभाग समिती - एफ, पेल्हार कार्यालयातील विद्युत विभागातील अंतर्गत कामे करणे.	रू. २,९८,१६८/-

सोबत सदर विकास कामे करण्यासाठी होणा-या खर्चाचे अंदाजपत्रक जोडले आहे व त्याची अंदाजे रक्कम रू. २,९८,१६८/-इतका होणार आहे. सदर कामी मान्यता घेवुन अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्राप्त करुन निविदा मागवुन कार्यवाही करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

सदर कामाचा खर्च " प्रभाग समिती स्थरावर विकास कामासाठी राखीव तरतुद " या लेखाशिर्षक अंतर्गत भागविण्यात येणार आहे .

१.लेखाशिर्ष- प्रभाग समिती स्थरावर विकास कामासाठी राखीव तरतुद

२. मुळ तरतुद -५,००,००,०००/-

३. या प्रस्तावाचा खर्च -२,९८,१६८/-

४. उपलब्ध शिल्लक - ४,७२,१०४५७/-

वर नमुद केलेले काम तातडीने करणे आवश्यक आहे. याकरीता सदर कामाचे २०२०-२१ या वित्तीय वर्षाचे जिल्हा दर सुचिनुसार एकुण रक्कम रु- २,९८,१६८/-
रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

सबब उपरोक्त प्रभाग समिती एफ पेल्हार अखत्यारितीत येणा-या बांधकाम विभागा अंतर्गत कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्याता मिळावी .तसेच सदर कामांची निविदा सुचना स्थानिक फलकावर प्रसिध्द (ऑफलाईन) करण्यास मान्यता मिळावी ही विनंती .

सबब प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर .

ठराव - सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती - एफ, पेल्हार कार्यालयातील विद्युत विभागातील अंतर्गत कामे करणेकरीता महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ४९ व ६८(१),६९(१) व (२) जा.क्र.

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\18-04-2022 Dar manjuri.docx670

४७/२०२१ दि.२५/०६/२०२१ आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार करणेकामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,९८,१६८/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.तसेच त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची पुढील कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या खर्चास महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपायुक्त परिमंडळ -२

वसई विरार शहर महानगरपालिका

E:\Rohit pen drive_\data0\dar manjuri enlop 1 and 2\18-04-2022 Dar ma..juri.docx671

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर

पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१

फॅक्स : ०२५०-२५२५१०७

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची पुढील कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या खर्चास महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपायुक्त परिमंडळ -२
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर

पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१

फॅक्स : ०२५०-२५२५१०७

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ४३९ **विभाग :-** पाणीपुरवठा

दिनांक :- ०९/०६/२०२२

<u>प्रस्तावाचा विषय-</u> प्रभाग समिती एफ धानिव/ पेल्हार मधील वाकणपाडा येथील आयजी मसाला स्टोअर्स ते भारत नगर पर्यंत १५० मी.मी व्यासाची डी.आय. पाईप लाईन अंथरणे व जोडणी करणेकामी प्रशाकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

<u>प्रस्तावाचा मजकुर</u> :- सादर करण्यात येते, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती एफ- धानिव/ पेल्हार येथे एकुण १३ प्रभाग येत आहेत. तरी सदर प्रभागांची व्याप्ती व विस्तार हा मोठ्या प्रमाणात होत आहे. प्रभाग क्र. ४३ मध्ये सदर ठिकाणी पाईप लाईन टाकणेकामी तेथील नागरीक वारंवार सुचना व मागणी करत असतात.त्याचप्रमाणे सदर काम करणेबाबत मा. नगरसेवक यांनी सुचना व पत्र व्यवहार केलेले आहेत .

सदर प्रभागामध्ये अंतर्गत जलवाहीनी अंथरल्याने मुख्य जलवाहीनी वरील अधिकचा भार कमी होऊन सुरळीत पाणीपुरवठा करणे शक्य होईल. पाणीपुरवठा ही अत्यावश्यक बाब असल्याने खालील काम तातडीने करावे लागणार आहे.

	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	प्रभाग समिती एफ धानिव/ पेल्हार मधील वाकणपाडा येथील आयजी मसाला स्टोअर्स ते भारत नगर पर्यंत १५० मी.मी व्यासाची डी.आय. पाईप लाईन अंथरणे व जोडणी करणे.	रु. २,९७,३१५/-

सोबत पाईप लाईन अंथरणे सुरु करण्यासाठी होणा-या खर्चाचे अंदाजपत्रक जोडले आहे व त्याची अंदाजे रक्कम २,९७,३१५/- इतकी होणार आहे. सदर कामी मान्यता घेवुन अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्राप्त करुन निविदा मागवुन कार्यवाही करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

सदर कामाचा खर्च " प्रभाग समिती स्थरावर जल मल निधि विषयक कामे "या लेखाशिर्षक अंतर्गत भागविण्यात येणार आहे .

१.लेखाशिर्ष- प्रभाग समिती स्थरावर जल मल निधि विषयक कामे

२. मुळ तरतुद - २,००,००,०००/-

३. या प्रस्तावाचा खर्च - २,९७,३१५/-

४. उपलब्ध शिल्लक १,६५,११,१९५ /-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ४ अत्यावशक सेवा बाबीनुसार पाणीपुरवठा " अत्यावश्यक सेवा "वर्गात येत असलेले वर नमुद केलेले काम तातडीने करणे आवश्यक आहे. याकरीता सदर कामाचे २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण जिल्हा दर सुचिनुसार एकुण रक्कम रु. २,९७,३१५/- रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

सबब उपरोक्त प्रभाग समिती एफ - धानिव/पेल्हार अखत्यारितीत येणा-या पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्याता मिळावी .तसेच सदर कामांची ई निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता मिळावी ही विनंती .

सबब प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर .

<u>ठराव-</u> सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती एफ- धानिव / पेल्हार वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ धानिव/ पेल्हार मधील वाकणपाडा येथील आयजी मसाला स्टोअर्स ते भारत नगर पर्यंत १५० मी.मी व्यासाची डी.आय. पाईप लाईन अंथरणे व जोडणी करणे. करणेकरीता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१),६९ (१) व (२) जावक क्र.

४७/२०२१ दि.२५/०६/२०२१ आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार करणेकामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,९७,३१५/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.तसेच त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास

आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची पुढील कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या खर्चास महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपायुक्त परिमंडळ -२

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार ता.वसई, जि.पालघर

पिन - ४०१३०५ दुरध्वनी क्र.०२५०-२५२५१०१

फॅक्स : ०२५०-२५२५१०७

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र . ४४० **विभाग :-** पाणीपुरवठा

दिनांक :- ०९/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय- **प्रभाग समिती एफ धानिव/ पेल्हार मधील मेन रोड गणेश नगर येथील धानीबाई नगर ते चौव्हान चाळ पर्यंत १५० मी.मी व्यासाची डी.आय. पाईप लाईन अंथरणे व जोडणी करणेकामी प्रशाकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.**

प्रस्तावाचा मजकुर :- सादर करण्यात येते, वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती एफ- धानिव/ पेल्हार येथे एकुण १३ प्रभाग येत आहेत. तरी सदर प्रभागांची व्याप्ती व विस्तार हा मोठ्या प्रमाणात होत आहे. प्रभाग क्र. ४३ मध्ये सदर ठिकाणी पाईप लाईन टाकणेकामी तेथील नागरीक वारंवार सुचना व मागणी करत असतात.त्याचप्रमाणे सदर काम करणेबाबत मा. नगरसेवक यांनी सुचना व पत्र व्यवहार केलेले आहेत .

सदर प्रभागामध्ये अंतर्गत जलवाहीनी अंथरल्याने मुख्य जलवाहीनी वरील अधिकचा भार कमी होऊन सुरळीत पाणीपुरवठा करणे शक्य होईल. पाणीपुरवठा ही अत्यावश्यक बाब असल्याने खालील काम तातडीने करावे लागणार आहे.

	कामाचे नाव	अंदाजपत्रकीय रक्कम
१	प्रभाग समिती एफ धानिव/ पेल्हार मधील मेन रोड गणेश नगर येथील धानीबाई नगर ते चौव्हान चाळ पर्यंत १५० मी.मी व्यासाची डी.आय. पाईप लाईन अंथरणे व जोडणी करणे.	रु. २,९१,२६६/-

सोबत पाईप लाईन अंथरणे सुरु करण्यासाठी होणा-या खर्चाचे अंदाजपत्रक जोडले आहे व त्याची अंदाजे रक्कम २,९१,२६६/- इतकी होणार आहे. सदर कामी मान्यता घेवुन अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता प्राप्त करुन निविदा मागवुन कार्यवाही करणेस प्रस्ताव मान्यतेस्तव सादर

सदर कामाचा खर्च " प्रभाग समिती स्थरावर जल मल निधि विषयक कामे "या लेखाशिर्षक अंतर्गत भागविण्यात येणार आहे .

१.लेखाशिर्ष- प्रभाग समिती स्थरावर जल मल निधि विषयक कामे

२. मुळ तरतुद - २,००,००,०००/-

३. या प्रस्तावाचा खर्च - २,९१,२६६/-

४. उपलब्ध शिल्लक १,९२,१९,९२९ /-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ४ अत्यावशक सेवा बाबीनुसार पाणीपुरवठा " अत्यावश्यक सेवा "वर्गात येत असलेले वर नमुद केलेले काम तातडीने करणे आवश्यक आहे. याकरीता सदर कामाचे २०२१-२२ या वित्तीय वर्षाचे महाराष्ट्र जिवन प्राधिकरण जिल्हा दर सुचिनुसार एकुण रक्कम रु. २,९१,२६६/- रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे.

सबब उपरोक्त प्रभाग समिती एफ - धानिव/पेल्हार अखत्यारितीत येणा-या पाणी पुरवठा विभागा अंतर्गत कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्याता मिळावी .तसेच सदर कामांची ई निविदा सुचना प्रसिध्द करण्यास मान्यता मिळावी ही विनंती .

सबब प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर .

ठराव- सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती एफ- धानिव / पेल्हार वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती एफ धानिव/ पेल्हार मधील मेन रोड गणेश नगर येथील धानीबाई नगर ते चौव्हान चाळ पर्यंत १५० मी.मी व्यासाची डी.आय. पाईप लाईन अंथरणे व जोडणी करणे. करणेकरीता महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४९ व ६८ (१),६९ (१) व (२) जावक क्र.

४७/२०२१ दि.२५/०६/२०२१ आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार करणेकामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. २,९१,२६६/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.तसेच त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास

आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची पुढील कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या खर्चास महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) (क) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उपायुक्त परिमंडळ -२
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

P/27

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ६६७ **विभाग : बांधकाम विभाग**

दिनांक : ०९/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील यशवंत गौरव रिक्षा स्टॅण्ड ते आयन रेसिडेन्सी पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील यशवंत गौरव रिक्षा स्टॅण्ड ते आयन रेसिडेन्सी पर्यंत विकास करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत रस्त्याचा अर्धा पृष्ठभाग हा काँक्रीटचा असून या रस्त्यावरून रहदारी सुरू असते. सदरचा रस्ता हा विरार शहर ते नालासोपारा या शहरांना जोडणारा असल्यामुळे अस्तित्वातील काँक्रीटचा रस्ता हा अरूंद असल्यामुळे व वाहतूक वर्दळ मोठया प्रमाणात असल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे उर्वरीत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण केल्यास रहदारीचा प्रश्न कायमचा संपुष्टात येईल. त्याअनुषंगाने सदर कामाचे नकाशे व प्राकलने तयार करण्यात आलेली असून त्यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणे आवश्यक आहे.

अंदाजपत्रकीय रक्कम – :- रू. ७४,३०,४०५/-

दरसुची :- २०१९-२०

कामाचे स्वरूप :- रस्त्याची लांबी – १७५.०० मी.
रस्त्याची रूंदी – १७.५० मी.
Excavation , Soling, Grade-I Metal, Grade-II, MPM, B.M. & B.C

मालकी :- व.वि.श.म.

विकास आराखडयातील आरक्षण :- अ) लेखाशिर्ष –
ब) मुळतरतुद-
क) शिल्लक
ड) तरतुद नियंत्रण नोंदवही क्र. ~~पृष्ठ क्र.~~ ~~अं. क्र.~~

स्थावर मालमत्ता नोंदवही क्रमांक :- पृ .क्रमांक अ.क्रमांक वर नोंद

P/25

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67 (3) (क) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्त्व सविनय सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील यशवंत गौरव रिक्षा स्टॅण्ड ते आयन रेसिडेन्सी पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी रक्कम रू. 74,30,405/- - इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहेत. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देत आहे.

06/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६ , फॅक्स् – ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४४२ **विभाग : बांधकाम विभाग**
दिनांक : १४/०६/ **२०२२**

मुख्य प्रस्तावाचा विषय	:-	वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) मौजे- सोपारा सर्वे नं. ३२ खेळाचे मैदान विकसित करणे. (आमदार फंड-२०२०-२१) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.
अंदाजपत्रकीय रक्कम :	:-	रू. २५,८८,१८०/-
प्रशासकीय मंजूरी :-		मा. सर्वसाधारण सभा ठराव/ क्र. १२ दि. २०/०६/२०१९
तांत्रिक मंजूरी	:-	१३/१११/ २०१८-१९ Dt. ०५/०३/२०१९
ई-टेंडरींगद्वारे निविदा प्रसिद्धी :-	:-	वविशम/बांध/शअ/३७३/१९ दि. २३/०८/२०१९ मा. शहर अभियंता, वसई- विरार शहर महानगरपालिका
वृत्तपत्रातील ई- निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक	:-	दि. २४/०८/२०२०
वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक	:-	दै. फ्री प्रेस जर्नल, दै. प्रहार, दै. लोकमत
वृत्तपत्रातील फेर ई-निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक	:-	दि. ०५/०३/२०२१
वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक	:-	दै. फ्री प्रेस जर्नल, दै. हमार महानगर, दै. मुंबई केसरी टाईम्स, दै. आपल महानगर, दै. वृत्तमानस, दै. प्रहार, दै. मिड डे
ई-टेंडरींगद्वारे फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख	:-	दि. ०५/०३/२०२१ ते दि. १९/०३/२०२१ दु. ३.०० पर्यंत.
(प्रिपरेशन व स्विकारण्याची)	:-	
विहित मुदतीत ऑनलाईन प्राप्त निविदा	:-	०८
ई-टेंडरींगद्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. २२/०३/२०२१
ई-टेंडरींगद्वारे लखोटा क्र.०२ उघडण्याची तारीख	:-	दि. २३/०५/२०२२
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	१. कार्यकारी अभियंता २. शहर अभियंता

विहित मुदतीत खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून उघडण्यास लखोटा क्र.०२ मध्ये प्राप्त दर खालीलप्रमाणे आहेत.

अ. क्र.	निविदाधारकाचे नाव	निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा	निविदेचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरिटी बाबत धनाकर्ष तपशिल	शेरा
१.	मे. प्रिती एंटरप्रायजेस	७.०० % कमी दराने	--	
२.	मे. शाहरूख ईस्माईल	९.९९ % कमी दराने	--	
३.	मे. महेश विजय सातपुते	१३.०० % कमी दराने	--	
४.	मे. संजय कंन्स्ट्रक्शन	१३.९० % जादा दराने	--	
५.	मे. वर्तक ऍण्ड सन्स	११.०० % कमी दराने	--	
६.	मे. शशिकांत राजहंस	९.९९ % जादा दराने	--	
७.	मे. निलकंठ एंटरप्रायजेस	१३.६५ % कमी दराने	--	
८.	मे. ईरा एंटरप्रायजेस	१०.२५ % कमी दराने	--	

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा अभ्यास करता **मे. निलकंठ एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा **१३.६५ % कमी** दराची निविदा ही प्राप्त निविदाधारकांमधील लघुत्तम दराने आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. निलकंठ एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा **१३.६५ % कमी दराची निविदा तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.**

तरी **मे. निलकंठ एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा **१३.६५ % कमी** दराच्या निविदेस मा. निविदा समिती सभेने दि.२५/०५/२०२२ रोजी मान्यता दिली असून महाराष्ट्र महानरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(३) नुसार संविदा करणेसाठी मा.आयुक्त तथा प्रशासक सो. यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) मौजे- सोपारा सर्वे नं. ३२ खेळाचे मैदान विकसित करणे. (आमदार फंड-२०२०-२१) कामी **मे. निलकंठ एंटरप्रायजेस** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय दरापेक्षा **१३.६५ % कमी** दराची निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(३) अन्वये **अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.६५ % कमी** दराची निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देण्यात येत आहे व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

१९/०५

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.- पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४४३ विभाग:- माहिती तंत्रज्ञान

दिनांक:- १४/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या आपत्ती व्यवस्थापन केंद्रातील टेलिफोनसाठी १ वर्षाकरीता सिमकार्डचे रिचार्ज करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये आपत्ती व्यवस्थापन विभाग कार्यरत आहे. सदर विभागा अंतर्गत वसई विरार शहरात येणाऱ्या आपत्तीवर नियंत्रण ठेवणेकरिता विविध उपाय योजना केल्या जातात. तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळेस शहरातील नागरीकांना महापालिकेशी त्वरीत संपर्क साधणेकरीता महापालिकेतील ९ प्रभाग समिती अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन करुन सदर केंद्रा अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा सुरु करण्यात आलेले आहेत. जेणेकरुन नागरीक दुरध्वनी द्वारे संपर्क करुन आपत्ती बाबतची माहिती महापालिकेस देवू शकतात.

पंरतू सदर पुरविण्यात आलेल्या दुरध्वनीतील सिम कार्डचे रिचार्ज संपुष्टात आले असून व काही सिम कार्ड बंद (Suspend) झाले आहेत.आपत्तीच्यावेळी नागरीकांना महापालिकेशी संपर्क साधणेकामी अडथळे निर्माण होवू शकतात. तरी नागरीकांना अडथळे निर्माण होवू नये याकरीता आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत ९ प्रभाग समिती मध्ये नवीन सिम कार्ड १ वर्षाच्या रिचार्ज सह आवश्यक असून सदर रिचार्ज करणे कामी येणा-या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

प्रभाग समिती	पोस्ट पेड सिम दर (सर्व करांसहीत)	एकुण १ वर्षाकरिता दर (सर्व करांसहीत)
प्रभाग समिती 'ए'	३५४/-	४,२४८/-
प्रभाग समिती 'बी'	३५४/	४,२४८/
प्रभाग समिती 'सी'	३५४/	४,२४८/
प्रभाग समिती 'डी'	३५४/	४,२४८/
प्रभाग समिती 'ई'	३५४/	४,२४८/
प्रभाग समिती 'एफ'	३५४/	४,२४८/
प्रभाग समिती 'जी'	३५४/	४,२४८/
प्रभाग समिती 'एच'	३५४/	४,२४८/
प्रभाग समिती 'आय'	३५४/	४,२४८/
	एकूण	३८,२३२/-

उपरोक्त प्रमाणे सिमकार्ड रिचार्ज करणेकामी येणारा अंदाजित रक्कम रु. ३८,२३२/-इतका खर्च अपेक्षित असून सदर खर्च लेखासांकेतांक क्र. ९७३-२४७२, "माहिती तंत्रज्ञान विभाग संगणक व्यवस्थापन खर्च" या लेखाशिर्षा अंतर्गत भागवता येईल. तरी दुरध्वनी यंत्रणेतील नवीन सिम कार्ड १ वर्षाचे रिचार्ज करणेकामी व होणा-या रक्कम रु. ३८,२३२/- इतक्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी व विना निविदा अनुसुची ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मे. एअरटेल यांच्या कडुन सिम कार्ड रिचार्ज करणेकामी मान्यता मिळणेस्तव सादर.

ठराव/ निर्णय:- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील प्रभाग समिती अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या आपत्ती व्यवस्थापन केंद्रातील टेलिफोनसाठी १ वर्षाचे रिचार्ज करणेकामी व होणा-या रक्कम रु. ३८,२३२/- इतक्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये प्रशासकीय व वित्तीय मंजूरी व विना निविदा अनुसुची ड प्रकरण ५(२)(२) अन्वये मे. एअरटेल यांच्या कडुन सिम कार्ड रिचार्ज करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(समीर भूमकर)
उपायुक्त
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती "सी", विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 444

विभाग :- पाणीपुरवठा
दिनांक :- 14/06/2022

प्रस्तावाचा विषय :- विरार (पु.) प्रभाग क्र. ८ मध्ये पंप हाऊस अण्णापाडा ते जय जिवदानी एन्टरप्रायजेस पर्यंत १०० मी.मी. जी.आय. लाईन अंथरणे कामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	रु. ४,८५,७०५/-
प्रशासकीय मान्यता	:-	मा. प्रशासक ठराव क्र. ९३८ दि. २४/१२/२०२१
तांत्रिक मंजूरी	:-	कार्यकारी अभियंता दि. २४/१२/२०२१
निविदा सुचना प्रसिध्दि दिनांक	:-	जा.क्र. वविशम/पापु/८२/२०२२ दि. ०८/०२/२०२२ मा. उप आयुक्त, परिमंडळ-१, वसई विरार शहर महानगरपालिका
वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी	:-	दि. १२/०२/२०२२ दै. आपला महानगर, दै. चौफेर संघर्ष, दै. द फ्री. प्रेस जर्नल
निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. ०२/०५/२०२२
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०३
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	१) उप अभियंता २) प्र. लेखापरिक्षक ३) प्र. लेखापाल ४) प्र. सहा. आयुक्त
निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	:-	दि.
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार	:-	०३

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	मे. के. आर. कन्स्ट्रक्शन	०.५० % कमी दराने
२	मे. मानस कंन्स्ट्रक्शन	४.०० % जादा दराने
३	मे. नितिन म्हात्रे	४.६०% जादा दराने

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. के. आर. कन्स्ट्रक्शन यांचे ई-निविदेतील अंदाजपत्रकीय दारापेक्षा ०.५०% कमी दराची ई-निविदा इतर निविदाधारकाचे दरापेक्षा कमी दराची आहे.

तथापि मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२२ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा. उपआयुक्त यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) नुसार मे. के. आर. कन्स्ट्रक्शन यांची कमी दराची निविदेसोबत संविदा करणेकामी मा. उपआयुक्त परिमंडळ -१ यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. के. आर. कन्स्ट्रक्शन यांची ०.५०% कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२२ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा. उप आयुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

(तानाजी नरळे)
उप आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रदिपपांचगे
उप. अभिंपना

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती "सी", विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. 445 विभाग :- पाणीपुरवठा
दिनांक :- 14/06/2022

प्रस्तावाचा विषय :- विरार (पु.) प्रभाग क्र. ८ मध्ये संजय किराणा स्टोअर्स ते जिवदानी ट्रस्ट ऑफीस पर्यंत १०० मी.मी. जी.आय. लाईन अंथरणे कामी प्राप्त निविदापैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :-

अंदाजपत्रकीय रक्कम	:-	**रु. ४,४४,१३२/-**
प्रशासकीय मान्यता	:-	मा. प्रशासक ठराव क्र. ९३९ दि. २३/१२/२०२१
तांत्रिक मान्यता	:-	कार्यकारी अभियंता दि. २३/१२/२०२१
निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक	:-	जा.क्र. वविशम/पापु/८२/२०२२ दि. ०८/०२/२०२२ मा. उप आयुक्त, परिमंडळ-१, वसई विरार शहर महानगरपालिका
वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी	:-	दि. १२/०२/२०२२ दै. आपला महानगर, दै. चौफेर संघर्ष, दै. द फ्री. प्रेस जर्नल
निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)	:-	दि. ०२/०५/२०२२
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा	:-	०३
प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी	:-	१) उप अभियंता २) प्र. लेखापरिक्षक ३) प्र. लेखापाल ४) प्र. सहा. आयुक्त
निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा)	:-	दि.
विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार	:-	०३

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र	निविदा धारकाचे नाव	निविदा दर
१	मे. के. आर. कन्स्ट्रक्शन	०.५० % कमी दराने
२	मे. मानस कंन्स्ट्रक्शन	४.०० % जादा दराने
३	मे. नितिन म्हात्रे	४.६०% जादा दराने

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. के. आर. कन्स्ट्रक्शन यांचे ई-निविदेतील अंदाजपत्रकीय दारापेक्षा ०.५०% कमी दराची ई-निविदा इतर निविदाधारकाचे दरापेक्षा कमी दराची आहे.

तथापि मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२२ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा. उपआयुक्त यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) नुसार मे. के. आर. कन्स्ट्रक्शन यांची कमी दराची निविदेसोबत संविदा करणेकामी मा. उपआयुक्त परिमंडळ -१ यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. के. आर. कन्स्ट्रक्शन यांची ०.५०% कमी दराची निविदा सर्वात कमी व वाजवी आहे.त्याचप्रमाणे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी जा.क्र. वविशम/आका/४८/२०२२ दि.२८/०६/२०२१ रोजीने मा. उप आयुक्त परिमंडळ यांना अधिकार प्रदान केलेले आहेत. या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(अ) अन्वये या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास मान्यता देत आहे.

(तानाजी नरळे)
उप आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

प्र.उपायुक्त
उप आयुक्त

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ४४६ **विभाग :-घनकचरा व्यवस्थापन**
दिनांक :-२४/०६/**२०२२**

प्रस्तावाचा विषय :- स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६अंतर्गत घनकचरा खत निर्मिती प्रकल्प राबविणेकामी शहरातील उद्यानांसाठी Foldable Compost Bag (Size १२'x४'x२') खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सादर करण्यात येते की, केंद्र शासन स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या अनुषंगाने राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) अंमलबजावणी सुरु आहे. घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ मधील नियम १५P अंतर्गत उद्यानांमध्ये निर्माण होत असलेला पाला पाचोळा इत्यादी कचऱ्यातुन खत निर्मिती करणे अत्यावश्यक केले आहे. तसेच पुढील आठवडयाच्या सर्वेक्षणाच्या अनुषंगाने सदर कामाकरिता २७० गुण असल्याने महानगरपालिकेच्या मानांकन वाढीसाठी त्याची मदत होणार आहे. त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उद्यानांसाठी Foldable Compost Bag (Size १२'x४'x२') खरेदी करणे आवश्यक आहे.

उद्यान विभागाकडील माहिती प्रमाणे वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकुण १५२ उद्याने असून त्यामध्ये Foldable Compost Bag (Size १२'x४'x२') उपलब्ध करुन गरजे नुसार विविध ठिकाणी ठेऊन त्यामध्ये खत निर्मिती केली जाणार आहे तसेच, सदर कामी गुगल सर्चइंजिन मध्ये तपासले असता अंदाजे रक्कम रु. २०००/- प्रति नग प्रमाणे दर प्राप्त झाले आहे. त्यानुसार १५० कंपोस्ट बॅग करीता अंदाजीत रक्कम **रु. ३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रुपये मात्र.)** खर्च अपेक्षित आहे.

केंद्र शासन स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या अनुषंगाने राज्यामध्ये स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंमलबजावणी सुरु आहे. घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ मधील नियम १५P अंतर्गत उद्यानामध्ये निर्माण होत असलेला पालापाचोळा इत्यादी कचऱ्यातून खत निर्मिती करणे आवश्यक केले आहे. तसेच, स्वच्छ सर्वेक्षणाच्या Tool Kit मध्ये नमुद केल्यानुसार सदर कामाकरिता २५० गुण असल्याने महानगरपालिकेच्या मानांकन वाढीसाठी त्याची मदत होणार आहे (पृ.क्र. P/२१). त्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात उद्यांनासाठी Foldable Compost Bag (Size12' X 4' X 2') खरेदी करणे

आवश्यक आहे. सदरील बाब आवश्यक असल्याने सदरचा खर्च 'स्वच्छ भारत अभियान' या लेखाशिर्ष ३४०-२५७० या लेखा सांकेतांक क्र. तरतूद ८ कोटी मधुन भागविणे शक्य आहे.

ठरावाचा निर्णय :- स्वच्छ भारत अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ अंतर्गत घनकचरा खत निर्मिती प्रकल्प राबविणेकामी शहरातील उद्यानांसाठी Foldable Compost Bag (Size १२'x४'x२') खरेदी करणेकामी दरपत्रक मागवून होणाऱ्या अंदाजित खर्च रक्कम **रु. ३,००,०००/- (अक्षरी तीन लाख रुपये मात्र.)** इतक्या खर्चास महानगरपालिका अधिनयमाचे कलम ४९, ६७ आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उप-आयुक्त
घनकचरा व्यवस्थापन विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
दैनंदिन व आठवडे बाजार फी

प्रशासकीय ठराव क्र..४४७ दि.७५/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :-

दैनंदिन व आठवडे बाजार फी वसुली करणाऱ्या ठेकेदार/निविदाकार यांना सन २०२० व सन २०२१ या वर्षातील कोरोना / कोव्हिड-१९ लॉकडाऊन कालावधीची सुट देणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :-

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती "ए" ते "आय" असे एकूण ९ प्रभाग समिती कार्यालय असून त्यांच्या कार्यक्षेत्रात दैनंदिन व आठवडे बाजार भरत असल्याने सदर बाजारातील फेरीवाले/भाजी विक्रेते यांचेकडून बाजार फी वसुल करणे आवश्यक असल्याने व बाजार फी वसुली करीता महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने किमान देकार निश्चित करुन ई-निविदा मागवून व्यक्ती/ संस्था यांना करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

सन २०२० मध्ये कोरोनामुळे शासनाने दि. २२/०३/२०२० पासून लॉकडाऊन जाहिर केला त्यामुळे बाजार भरले नसल्याने विविध ठिकाणी दैनंदिन व आठवडे बाजार फीची वसुली ठेकेदारांना करता आलेली नाही. सबब त्यांनी कोरोना कालावधीत बाजार फीची वसुली न झाल्याने सुट मिळणेबाबत विनंती केली होती.

त्याअनूषंगाने सन २०२० मध्ये दि. ०१/०४/२०२० ते दि. ३०/०९/२०२० या ६ महिन्यांच्या लॉकडाऊन कालावधीकरीता प्रशासकीय ठराव क्र. १५६ दि. ०१/०६/२०२१ अन्वये तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी ३ महिन्यांची सुट देण्यास मान्यता दिलेली आहे.

तद्नंतर सन २०२१ मध्ये सुध्दा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने दि. १५/०३/२०२१ ते दि. १५/०६/२०२१ या ३ महिन्यांच्या लॉकडाऊन कालावधीकरीता प्रशासकीय ठराव क्र. ३६२ दि. १९/०७/२०२१ अन्वये तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी २ महिन्यांची सुट देण्यास मान्यता दिलेली आहे.

शासनाने दि. १६/०६/२०२१ पासून दि. १५/०८/२०२१ या २ महिन्यांच्या लॉकडाऊन कालावधीकरीता प्रशासकीय ठराव क्र. ८६९ दि. १०/१२/२०२१ अन्वये तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी दैनंदिन बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदार यांना १ महिन्याची सुट व आठवडे बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदारांना संपूर्ण २ महिन्यांची सुट देण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यामुळे सन २०२० मधील ३ महिने, सन २०२१ मध्ये १ महिना व फक्त दै. बाजार फी करीता १ महिन्याची सुट ठेकेदार यांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे दै.बा.फी वसुल करणारे विविध ठेकेदार यांना एकूण ११ महिन्यांपैकी ६ महिन्यांची सुट देण्यात आलेली नाही.

विविध ठेकेदार यांना दै.बाजार फी/ आठवडे बाजार फी वसुलीचा ठेका देण्यात आला होता. परंतू भारतभर कोव्हिड-१९ चा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव वाढल्याने सरकारने दि.२३ मार्च २०२० मध्ये संपूर्ण देशभर लॉकडाऊन जाहिर केल्याने दि. २३ मार्च २०२० ते माहे सप्टेंबर २०२० या ६ महिन्यामध्ये बाजार बंद असल्याने बाजार फी वसुली केलेली नाही. ६ महिने बाजार फी वसुली न झाल्याने मा. आयुक्त साहेब यांना ६ महिनेची बाजार फी वसुलीची सुट देण्याची विनंती केली होती. परंतू मा. आयुक्त साहेब यांनी ३ महिन्याची सुट

दिलेली होती व पुढील ३ महिने व ९ दिवस सुट प्रलंबित आहे. तरी ती ३ महिने ९ दिवस सुट मिळावी जेणेकरुन आम्हाला मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ नये. परंतू तरी महोदयांना नम्र विनंती आहे की, बाकी प्रलंबित ३ महिने बाजार फी वसुली मधुन सुट द्यावी अशी पत्र प्राप्त झालेली आहेत.

वास्तविक पाहता कोरोना लॉकडाऊन कालावधीत बाजारातील फेरीवाले/भाजी विक्रेते व्यवसाय करीत नव्हते व तद्नंतर टप्प्याटप्याने शासनाने लॉकडाऊन शिथिल केल्याने बाजारातील फेरीवाले/भाजी विक्रेते यांनी हळूहळू प्रमाणात पुर्वीप्रमाणेच व्यवसाय करण्यास सुरुवात केली. त्यामुळे ठेकेदार यांना पूर्ण क्षमतेने दै.बा.फी वसुली करता आलेली नाही ही वस्तूस्थिती आहे.

त्यामुळे वरील सर्व वस्तूस्थितीचा विचार करता दै.बा.फी वसुल करणारे विविध ठेकेदार यांना एकूण ११ महिन्यांपैकी ६ महिन्यांची सुट देण्यात आलेली नसल्याने त्यांनी पुनश्चः सुट मिळणेबाबत उक्त संदर्भिय पत्रे दिलेली आहेत.

सबब विविध ठेकेदार यांनी मागणी केलेनुसार त्यांना

१. सन २०२० मधील दि. ०१/०४/२०२० ते दि. ३०/०९/२०२० या ६ महिन्यांच्या लॉकडाऊन कालावधीकरीता ३ महिन्यांची सुट देण्यात आलेली असून व बाकी राहिलेल्या ३ महिन्यांपैकी २ महिन्यांची सुट व

२. सन २०२१ मधील दि. १५/०३/२०२१ ते दि. १५/०६/२०२१ या ३ महिन्यांच्या लॉकडाऊन कालावधीकरीता २ महिन्यांची सुट देण्यात आलेली असून व बाकी राहिलेल्या १ महिन्यापैकी १५ दिवसांची सुट देणे संयुक्तीक होईल असे मत आहे.

३. तसेच सन २०२१ मधील दि. १६/०६/२०२१ पासून दि. १५/०८/२०२१ या २ महिन्यांच्या लॉकडाऊन कालावधी करीता दैनंदिन बाजार फी करीता १ महिन्याची सुट देण्यात आलेली असून व [redacted] प्र.स. "एफ" मधील मांडवी, प्र.स. "जी" मधील सातिवली व कामण अणि प्र.स. "आय" मधील पापडी बाजार या फक्त ४ आठवडे बाजारांना तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी ठराव क्र.८६९ दि. १०/१२/२०२१ अन्वये संपूर्ण २ महिन्यांची सुट देण्यात आलेली आहे. या ४ आठवडे बाजारा व्यतिरीक्त इतर प्र.स. "ए", "बी", "सी", "ई", "एच" या ठिकाणच्या आठवडे बाजारास कोणत्याही प्रकारची सुट देण्यात आलेली नाही.

सबब दै. बा.फी/आठवडे बाजार फी वसुल करणारे सर्व ठेकेदार यांना वर नमुद प्रमाणे एकूण **२ महिने १५ दिवसांची सुट देणे** बाबत प्रस्तावित करण्यात आले असता मा.आयुक्त सो. यांनी दि. १०/०३/२०२२ रोजी त्यास मान्यता देऊन त्याबाबतचा प्रशासकीय ठराव क्र. १३२३ दि. २१/०३/२०२२ पारित केलेला आहे.

उक्त नमुद प्रमाणे दै.बा.फी. व आठवडे बाजार फी वसुल करणारे ठेकेदार यांना सुट देण्यात आलेली आहे. तथापि तरीसुध्दा विविध ठेकेदार हे सुट मिळणेबाबत वारंवार भेट घेऊन पाठपुरावा करीत आहेत. त्यामुळे खालीलप्रमाणे सविस्तर अहवाल सादर करण्यात येत आहे.

याचाच अर्थ **सन २०२०** मधील **दि. ०१/०४/२०२० ते दि. ३०/०९/२०२०** या **६ महिन्यांच्या** लॉकडाऊन कालावधीकरीता आत्तापर्यंत एकूण **५ महिन्यांची सुट देण्यात आलेली** असून १ महिन्याची सुट देण्यात आलेली नाही.

सन २०२१ मधील **दि. १५/०३/२०२१ ते दि. १५/०६/२०२१** या **३ महिन्यांच्या** लॉकडाऊन कालावधीकरीता आत्तापर्यंत एकूण **२ महिने १५ दिवसांची सुट देण्यात आलेली** असून १५ दिवसांची सुट देण्यात आलेली नाही.

सन २०२१ मधील दि. १६/०६/२०२१ पासून दि. १५/०८/२०२१ या २ महिन्यांच्या लॉकडाऊन कालावधी करीता दैनंदिन बाजार फी करीता १ महिन्याची सुट देण्यात आलेली असून व आठवडे बाजार फी करीता संपूर्ण २ महिन्यांची सुट देण्यात आलेली आहे त्यामुळे दैनंदिन बाजाराकरीता १ महिन्याची सुट देण्यात आलेली नाही आणि आठवडे बाजाराकरीता संपूर्ण २ महिन्याची सुट देण्यात आलेली असल्याने पुनश्च: सुट देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

सबब उक्त नमुद प्रमाणे दुसऱ्या टप्प्यातील लॉकडाऊन दै.बा.फी दि. १५/०३/२०२१ ते दि. १५/०६/२०२१ (३ महिने) २ महिने १५ दिवसांची सुट देण्यात आलेली असुन १५ दिवसांची सुट देण्यात आलेली नसल्याने सदर १५ दिवसांची सुट देता येईल.

तसेच उक्त नमुद प्रमाणे तिसऱ्या टप्प्यातील लॉकडाऊन दै.बा.फी दि. १६/०६/२०२१ पासून दि. १५/०८/२०२१ (२ महिने) फक्त १ महिना सुट देण्यात आली असुन १ महिन्याची सुट देण्यात आलेली नसल्याने त्या कालावधीकरीता १५ दिवसांची सुट देता येईल.

सबब प्रस्तावित प्रमाणे दै.बा.फी. वसुली करणारे ठेकेदार यांना प्रस्तावित केलेनुसार उक्त नमुद दुसऱ्या टप्प्यातील (शिल्लक १५ दिवसांची) लॉकडाऊन कालावधीची व तिसऱ्या टप्प्यातील (शिल्लक १ महिन्यापैकी) लॉकडाऊन कालावधीची १५ दिवसांची सुट अशी एकूण १ महिन्याची सुट देण्याच्या प्रस्ताव मान्यतेस्तव व त्याबाबतचा प्रशासकीय ठराव स्वाक्षरीस्तव सादर.

प्रस्तावाचा निर्णय :-

सबब प्रस्तांवित प्रमाणे दै.बा.फी. वसुली करणारे ठेकेदार यांना प्रस्तावित केलेनुसार उक्त नमुद दुसऱ्या टप्प्यातील (शिल्लक १५ दिवसांची) लॉकडाऊन कालावधीची व तिसऱ्या टप्प्यातील (शिल्लक १ महिन्यापैकी) लॉकडाऊन कालावधीची १५ दिवसांची सुट अशी एकूण **१ महिन्याची रक्कम मनपा फंडात जमा करणेबाबत सुट देण्यात यावी अथवा ठेकेदार यांनी त्यांच्या कालावधीची दै. बाजार फी/आठवडे बाजार फीची संपूर्ण रक्कम मनपा फंडात जमा केली असल्यास त्यांना १ महिन्याची मुदतवाढ विनामुल्य देण्यास मान्यता देण्यात येत आहे.**

15/06/22

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ४४८

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :७५/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत करण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण (Third Party Audit) करुन घेणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती ए,बी,सी,डी,ई,एफ,जी,एच,आय अंतर्गत बांधकाम, विद्युत व पाणीपुरवठा विभागामार्फत विविध विकास कामे करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत येणाऱ्या विकास कामांचा दर्जा अपेक्षित मानकाप्रमाणे नसणे व त्यात निकृष्ट सामानाचा वापर करणे इत्यादीबाबत तक्रारीमुळे महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण २००८/१३३८/प्र.क्र.१७१/०८/नवि-२०, मंत्रालय, मुंबई-३२ दि. ०२/०३/२००९ च्या शासन निर्णयानुसार वसई विरार शहर महानगरपालिका 'क' वर्गामध्ये येत असून 'क' वर्ग महानगरपालिकांना रु. १.०० कोटीपेक्षा अधिक किंमतीच्या सर्व कामांना त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण करणे अनिवार्य केले आहे. तसेच निर्णयातील मुद्दा क्र. ५ नुसार रु. १.०० कोटीपेक्षा कमी किंमतीच्या कामांना Random पध्दतीने किमान १०% कामांचे त्रयस्थ तांत्रिक लेखा परिक्षण करुन घेणे बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे.

सर्व महानगरपालिकांनी/नगरपालिकांनी त्याच्यातर्फे राबविण्यात येणाऱ्या विकास कामांची गुणवत्ता/दर्जा तपासणी त्यांच्या जिल्ह्यातील शासकिय अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/वास्तुशास्त्र महाविद्यालय/शासकिय तंत्रनिकेतन यांचे मार्फत व ते नसल्यास अथवा त्यांना सल्लागाराचे काम करणे शक्य नसल्यास आपल्या क्षेत्रातील अशासकिय अभियांत्रिकी/तंत्रज्ञान/वास्तुशास्त्र महाविद्यालय/ तंत्रनिकेतन अशा त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखापरिक्षण (Third Party Technical Audit) करुन घ्यावे आणि त्यासाठी संबंधित महाविद्यालयाच्या किंवा तंत्रनिकेतनाच्या प्राचार्यांशी संपर्क साधावा असे निर्देश शासन निर्णय क्र. १ अन्वये दिलेला आहे.

शासन निर्णयातील मुद्दा क्र. ६ नुसार त्रयस्थ तांत्रिक तपासणीवरील खर्च भागविण्यासाठी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या अर्थसंकल्पात आवश्यक ती तरतूद करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्यानूसार सदर कामाचा खर्च "त्रयस्थ पक्षीय तपासणी खर्च" या लेखाशिर्ष अंतर्गत खर्च करण्यात येणार आहे.

लेखाशिर्ष :- "त्रयस्थ पक्षीय तपासणी खर्च"

मुळ तरतूद :- रु. २,००,००,०००/-

प्रस्तावित खर्च :- रु. १,५०,००,०००/-

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रु. १.०० कोटीपेक्षा अधिक किंमतीच्या कामांना व रु. १.०० कोटीपेक्षा खालील किंमतीच्या कामांना Random पध्दतीने तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेणेकामी तांत्रिक संस्थांची/तज्ञ व्यक्तींची तांत्रिक लेखापरिक्षक म्हणून पॅनलवर नियुक्ती करणेसाठी व त्याकरीता होणाऱ्या अपेक्षित खर्च रक्कम रु. १,५०,००,०००/- इतक्या रक्कमेस आर्थिक, प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्याचे अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांना आहेत.

तरी सन २०२२-२३ ते सन २०२६-२७ या ५ वर्षा करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३) नुसार होणाऱ्या रक्कम रु. १,५०,००,०००/- इतक्या अपेक्षित खर्चास आर्थिक, प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकरीताचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- शासन निर्णयानुसार वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत कार्यक्षेत्रातील रु. १.०० कोटीपेक्षा अधिक किंमतीच्या सर्व कामांना व रु. १.०० कोटीपेक्षा खालील कामांचे Random पध्दतीने तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेणेकामी आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देण्यात येत असून १) विकास कामाची गुणवत्ता/दर्जा जिल्ह्यातील शासकिय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र महाविद्यालयाकडून तपासून घेण्यात यावी, नसल्यास शासन मान्यताप्राप्त अशासकिय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी/वास्तुशास्त्र महाविद्यालयाकडून तपासून घेण्यात यावी.

२) अनु.क्र.१ प्रमाणे शक्य नसल्यास निविदा प्रक्रियेतुन सुयोग्य तांत्रिक संस्थांची /तज्ञ व्यक्तिची नियुक्ती करण्यात यावी, त्यासाठी निविदा मागविण्यात याव्यात.

याकामी येणाऱ्या अनुषंगिक खर्च रक्कम रु. १,५०,००,०००/- इतक्या रक्कमेस मा. आयुक्त तथा प्रशासक या ठरावान्वये मंजूरी देत आहे.

१३/०८

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ४४९

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :- ७५/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- अग्निशमन विभागातील कर्मचारी ग्रुप विम्याचे नुतनीकरण करणे करीता येणा-या खर्चास प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागाचे १) मुख्य अग्निशमन केंद्र आचोळे २) श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र, नालासोपारा (प.) ३) फुलपाडा अग्निशमन केंद्र, विरार (पुर्व) ४) बोळींज अग्निशमन केंद्र, विरार (पश्चिम) ५) सनसीटी अग्निशमन केंद्र, दिवाणमान, वसई (पश्चिम) ६) तामतलाव अग्निशमन केंद्र, वसई गाव ७) नवघर अग्निशमन केंद्र, वसई अशी मिळुन एकुण ०७ अग्निशमन केंद्रे कार्यरत आहेत.

वसई -विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागात कायम व ठेका कर्मचारी असे एकुण २२८ कर्मचारी कार्यरत आहेत तसेच समुद्र किनारी पर्यटकांचा सुरक्षेकरीता ९ जीवरक्षक कार्यरत आहेत. असे एकुण २३७ कर्मचारी आपल्या जिवाची जोखीम पत्करुन कर्तव्य बजावत आहेत. सदर कर्मचारी संपूर्ण वसई तालुका, भिवंडी, पालघर, बोईसर, एम.आय.डी.सी, नॅशनल हायवे, डहाणू, तलासरी, ई. ठिकाणी रासायनिक व इतर कंपन्यांमध्ये लागणाऱ्या आगी तसेच रहीवाशी इमारती मध्ये लागणाऱ्या आगी विझवणे व त्या ठिकाणी आगीत सापडलेल्या व्यक्तीचे व त्यांचे मालमत्तेचे आगी पासुन संरक्षण करणे तसेच झाड पडणे, अतिवृष्टीमुळे पुर सदृश्य परिस्थिती निर्माण होणे अशा आणिबाणीच्या वेळी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात हे कर्मचारी सदरची कामे करत आहेत. अशा आणीबाणीच्या परिस्थितीत काम करत असतांना अग्निशमन जवानांना दुखापती सुध्दा होत असतात.

आग विझवित असतांना कर्मचा-यांना इजा, दुखापत अथवा दुर्देवी प्रसंग ओढावल्यास अपंगत्व अथवा मृत्यु आल्यास मृत जवानांचे कुटूंब उघडयावर पडू नये व त्यांच्या वारसांना सुरक्षा म्हणुन काही रक्कम मिळणे आवश्यक आहे. अशी रक्कम मिळणेसाठी अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांचा ग्रुप विमा उतरविणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागातील कर्मचारी यांचा वार्षिक ग्रुप विमा मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ८२१, दिनांक २८/०८/२०१४ रोजी मंजुरी घेऊन दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांचेकडून अग्निशमन विभागातील कायम व ठेका अशा एकुण १७९ कर्मचा-यांचा ग्रुप विमा दिनांक ०३/०२/२०१५ रोजी काढण्यात आला होता. तसेच मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ दिनांक २३/०३/२०१५ अन्वये दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. यांचे कडून अग्निशमन विभागाच्या उर्वरीत ५८ कर्मचा-यांचा अपघाती विमा दिनांक ३/०२/२०१५ रोजी काढण्यात आला होता. अशा एकुण २३७ अग्निशमन कर्मचा-यांचा विमा काढण्यात आला होता.

सदर विमा योजनेअंतर्गत विमाधारक कर्मचा-यास अपघात दुखापत झाल्यास संभाव्य वैद्यकिय खर्चाची रक्कम केलेल्या वैद्यकिय खर्चाची बिले सादर केल्यानंतर सदर रक्कम त्यास विमा कंपनीकडून प्राप्त होते. तसेच एखादा विमाधारक कर्मचारी याचा अपघाती मृत्यु झाल्यास त्याच्या वारसास निश्चित एक रक्कम विमा कंपनीकडून देण्यात येते.

सदरील विमा पॉलिसीची वार्षिक नुतनीकरणाची मुदत हि दिनांक १९/०६/२०२२ रोजी संपत आहे. या विमा योजने लाभा अंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची यादी दि न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी यांना दिनांक /०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये तपशीलवार कळविले होते त्या अनुषंगाने विमा रक्कमेबाबत विमा कंपनीने दिनांक ०९/०५/२०२२ रोजीचे पत्राव्दारे वार्षिक विमा हप्ताची एकुण रक्कम रु. २४,४९,६३२/- भरणे बाबत कळविलेले आहे.

तरी सदर पॉलिसीचे नुतनीकरण करणे करीता महानगरपालिकेचे सुधारित अर्थसंकल्प २०२१-२२ सह सन २०२२-२३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पान नं. ३० वर १३ नंबरच्या लेखाशिर्षा मध्ये **"अग्निशमन कर्मचारी विमा "** यामध्ये एकुण वार्षिक रुपये एक कोटी एवढी तरतुद आहे.

तरी अग्निशमन विभागातील कायम व ठेका पध्दतीवरील कर्मचारी यांचा अपघाती ग्रुप विमा पॉलिसी नुतनीकरण करण्यास व त्याबाबत येणाऱ्या रक्कम रु. २४,४९,६३२/- पर्यंतचे खर्चास मा. आयुक्त सो. तथा प्रशासक यांचे प्रशासकीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील कर्मचारी यांचा अपघाती ग्रुप विमा पॉलिसी नुतनीकरण करण्यास व त्याबाबत येणा-या रक्कम रु. २४,४९,६३२/- खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

15/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका.

सार्वजनिक वाचनालय,विरार.

प्रशासकीय ठराव क्र. ४५० दि. १५/०६/२०२२

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची ४ सार्वजनिक वाचनालय असुन त्यापैकी सार्वजनिक वाचनालय, विरार ,सार्वजनिक वाचनालय नालासोपारा ,डॉ.के.ब.हेडगेवार सार्वजनिक वाचनालय नवघर येथे अभ्यासिका असुन कै. डॉ.धोडो गोविंद अभ्यांकर स्मृती ग्रंथालय व वाचनालय वसई गाव येथे अभ्यासिका नाही.

वातानुकुलित अभ्यासिकेतील प्रति विद्यार्थी आकारण्यात येणाऱ्या मासिक फी बाबत मा.स्थायी समिती सभेच्या सभा सुचना क्र.७ ठराव क्र. २७३ दि.२६/०९/२०१८ अन्वये रु.१२०/- प्रति महिना बाबत ठराव पारित झालेला आहे. सद्यस्थितीत खालील तक्यात नमुदप्रमाणे फक्त अनु.क्र.२ सार्वजनिक वाचनालय, नालासोपारा येथील अभ्यासिका वातानुकूलित असल्याने मा.स्थायी समिती ठरावाप्रमाणे मासिक फी आकारण्यात येत आहे.

अ. क्र.	वाचनालयाचे नाव	अभ्यासिका विना वातानुकुलित मासिक फी रु.	अभ्यासिका वातानुकूलित मासिक फी रु.
१	सार्वजनिक वाचनालय , विरार	६०/-	-
२	सार्वजनिक वाचनालय नालासोपारा	-	१२०/-
३	डॉ.के.ब.हेडगेवार सार्वजनिक वाचनालय नवघर	१००/-	-

वर नमुद केल्याप्रमाणे सार्वजनिक वाचनालय,नालासोपारा येथे पुर्वी वातानुकुलित व्यवस्था होती . तेव्हा सदर अभ्यासिकेची मासिक फी रु.१२०/- करण्यात आली होती. सद्यस्थितीत इमारतीचे नुतनीकरण केले असुन वातानुकुलीत यंत्रणा बसविण्यात आलेली नाही .

तथापि सार्वजनिक वाचनालय , विरार येथील अभ्यासिकेमध्ये वातानुकूलित व्यवस्था कार्यान्वयीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे मा.स्थायी समिती ठरावाप्रमाणे प्रति विद्यार्थी मासिक फी मध्ये रु.१२०/-प्रमाणे फी आकारणे अभिप्रेत आहे.

तथापी मा.स्थायी समिती ठराव दि.२६/९/२०१८ रोजीचा असुन त्या ठरावास साधारणत: ४ वर्ष होत आली आहेत . सद्यास्थितीत वातावरणाच्या तापमानामध्ये दिवसेदिवस वाढ होत असल्याने विद्यार्थांचा वातानुकूलित अभ्यासिकेचा वापर करण्यामध्ये लक्षणिय वाढ झालेली आहे. त्यामुळे रु.१२०/- मध्ये रु.३० एवढी वाढ करुन एकुण रु.१५०/- एवढी प्रति विद्यार्थी मासिक फी वाढ करण्यास हरकत नाही असे मत आहे.

सबब वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सध्या अस्तित्वात असलेल्या व भविष्यात तयार करण्यात येणाऱ्या नविन सर्व वातानुकूलित अभ्यासिकेकरिता प्रति विद्यार्थी प्रति महिना रु.१५०/- याप्रमाणे फी आकारण्याबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

प्रस्तावाचा निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सध्या अस्तित्वात असलेल्या व भविष्यात तयार करण्यात येणाऱ्या नविन सर्व वातानुकूलित अभ्यासिकेकरिता प्रति विद्यार्थी प्रति महिना रु.१५०/- याप्रमाणे फी आकारण्याच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका.

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ४५७ विभाग : सार्व.बांधकाम

दिनांक :२५/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजनेमधील कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस व प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पालघर यांस सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शासन शुध्दीपत्रक क्रमांक नगरविकास विभाग-मनपा-२०२२/प्र.क्र. १३०(१३)/न.वि-१६ दि. ३१ मे, २०२२ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत खालील नमूद कामाला रु. ५०.०० लक्ष इतका निधी मंजूर झालेला आहे. शासन निर्णयानूसार २५% हिस्सा महानगरपालिका निधीतून खर्च करावयाचा आहे.

तरी मंजूर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	राज्य शासनाकडून मंजूर निधी (७५% हिस्सा)	महानगरपालिकेने खर्च करावयाची रक्कम (२५% पेक्षा जास्त हिस्सा)	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग समिती एफ पेल्हार क्षेत्रातील वैष्णव नगर येथे रस्ता व गटार बांधणे.	रु. ५०,००,०००/-	रु. १६,६२,७०८/-	रु. ६६,६२,७०८/-

सदर कामांची अंदाजपत्रके तयार करुन मा. कार्यकारी तथा प्र. शहर अभियंता यांची तांत्रिक मंजूरी घेण्यात आलेली आहे.

या कामी महानगरपालिका फंडात २५% पेक्षा जास्त रक्कम खर्च करायची असल्याने त्यास मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची प्रशासकिय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावांना मा. आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी व सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचे प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी सादर करणेकामी मंजूरीस्तव सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- महाराष्ट्र शासनाने शासन शुध्दीपत्रक क्रमांक नगरविकास विभाग-मनपा-२०२२/प्र.क्र. १३०(१३)/न.वि-१६ दि. ३१ मे, २०२२ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत खालील नमूद कामाला रु. ५०.०० लक्ष इतका निधी मंजूर झालेला आहे. शासन निर्णयानूसार २५% हिस्सा महानगरपालिका निधीतून खर्च करावयाचा आहे.

अ. क्र.	कामाचे नाव	राज्य शासनाकडून मंजूर निधी (७५% हिस्सा)	महानगरपालिकेने खर्च करावयाची रक्कम (२५% पेक्षा जास्त हिस्सा)	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	प्रभाग समिती एफ पेल्हार क्षेत्रातील वैष्णव नगर येथे रस्ता व गटार बांधणे.	रु. ५०,००,०००/-	रु. १६,६२,७०८/-	रु. ६६,६२,७०८/-

तरी सदर काम मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्राप्त निधीतून करणेस तसेच उर्वरित खर्च महानगरपालिका फंडातून (२५% पेक्षा जास्त हिस्सा) करणेसाठी महानगरपालिका अधिनियमाचे कलम (६७) क अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी यांना प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

15/06/22

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ४५२

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :३५/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने मधील कामांनाप्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस व प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पालघर यांस सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की , महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक नगरविकास विभाग - मनपा-२०२२/प्र.क्र.१(८) /न.वि.-१६ दि. १० मे २०२२ अन्वये वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत चार कामांना १००.०० लक्ष इतका निधी मंजुर झालेला आहे. शासन निर्णयानूसार २५% हिस्सा महानगरपालिका निधीतून खर्च करावयाचा आहे.

तरी मंजूर कामांची सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

अ.क्र	कामाचे नाव	राज्य शासनाकडून मंजूर निधी (७५%हिस्सा)	महानगरपालिकेने खर्च करावयाची रक्कम (२५% पेक्षा जास्त हिस्सा)	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	वसई तालुक्यातील चिंचोटी नाका ते विनोद गवळी यांच्या घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे.	रु. ६०,००,०००/-	रु. २५,३८,१०२/-	रु. ८५,३८,१०२/-
२.	वसई तालुक्यातील शांतीनगर नाका ते गोविंद पंधारा यांच्या घरापर्यंत अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे.	रु. ४०,००,०००/-	रु. ३६,४८,३७१/-	रु. ७६,४८,३७१/-
एकूण		रु. १,००,००,०००/-	रु. १,००,००,०००/-	रु. १,६१,८६,४७३/-

सदर कामांची अंदाजपत्रके तयार करुन संदर्भिय शासन निर्णयामधिल अट क्र ३ अन्वये मा.शहर अभियंता यांची तांत्रिक मंजुरी घेण्यात आलेली आहे.

याकामी मनपा फंडातून २५% पेक्षा जास्त रक्कम खर्च करायची असल्याने त्यास मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांची प्रशासकिय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावांना मा. आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेकामी व सदर प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांचे प्रशासकिय व वित्तीय मान्यतेसाठी सादर करणेकामी मंजूरीस्तव सादर.

प्रस्तावाचा निर्णय :- महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक नगरविकास विभाग - मनपा-२०२२/प्र.क्र.१(८) /न.वि.-१६ दि. १० मे २०२२ अन्वये अन्वये वसई - विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे चार कामांना रु. १००.०० लक्ष इतका निधी मंजुर केलेला आहे. २५% पेक्षा जास्त हिस्सा महानगरपालिका निधीतून खर्च करावयाचा आहे.

अ.क्र	कामाचे नाव	राज्य शासनाकडून मंजूर निधी (७५%हिस्सा)	महानगरपालिकेने खर्च करावयाची रक्कम (२५% पेक्षा जास्त हिस्सा)	अंदाजपत्रकीय रक्कम
१.	वसई तालुक्यातील चिंचोटी नाका ते विनोद गवळी यांच्या घरापर्यंत रस्त्याचे बांधकाम करणे.	रु. ६०,००,०००/-	रु. २५,३८,१०२/-	रु. ८५,३८,१०२/-
२.	वसई तालुक्यातील शांतीनगर नाका ते गोविंद पंधारा यांच्या घरापर्यंत अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे.	रु. ४०,००,०००/-	रु. ३६,४८,३७१/-	रु. ७६,४८,३७१/-
एकूण		रु. १,००,००,०००/-	रु. १,००,००,०००/-	रु. १,६१,८६,४७३/-

तरी २ कामे मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत प्राप्त निधीतून करणेस तसेच उर्वरित खर्च महानगरपालिका फंडातून (२५% पेक्षा जास्त हिस्सा) करणेसाठी महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ६७ (३) अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

15/06/22

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. ४५३ **विभाग :-घनकचरा व्यवस्थापन**
दिनांक :-२५/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्वच्छता उपद्रव नियंत्रण व सार्वजनिक ठिकाणी तंबाखु, तंबाखुमिश्रीत पान सिगारेट, गुटखा, तंबाखुजन्य इतर पदार्थ इत्यादी खाण्यास, विक्रीस अथवा साठवणूक करणाऱ्या नागरीकांवर दंडात्मक कारवाई करणेस सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या त्रैवार्षिक वर्षाकरिता ई-निविदा मागवून क्लिन अप मार्शलची नेमणूक करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानाच्या अंतर्गत राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची अंमलबजावणी सुरू आहे. या अभियानांतर्गत शहरांमधील ज्या कुटूंबाकडे शौचालयांची सुविधा नाही अशा कुंटूंबियांना शौचालयाची सुविधा (वैयक्तीक अथवा सामुदायीक) उपलब्ध करुन देऊन शहरे हागणदारी मुक्त करणे. तसेच शहरातील घनकचरा व्यवस्थापन करुन शहर स्वच्छ करणे या दोन्ही प्रमुख बाबींचा समावेश आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ नुसार निर्मितीच्या जागी कचरा विलगीकरण करण्याची जबाबदारी ही संबंधित कचरा निर्माणकर्त्यांची आहे. त्यानुसार घनकचरा व्यवस्थापनां अंतर्गत दिनांक १ मे २०१७ पासून राज्यातील प्रत्येक शहरामध्ये **"कचरा लाख मोलाचा"** या अंतर्गत निर्मितीच्या जागीच कचऱ्याचे विलगीकरण (ओला व सुका) करुन या विलगीकृत केलेल्या कचऱ्यावर केंद्रीत अथवा विकेंद्रीत पध्दतीने प्रक्रिया करण्याबाबत सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना सुचना देण्यात आल्या असून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या अनुषंगाने राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था शहरामधील नागरीकांना सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा प्रकारे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सेवा देत असताना नागरीकांकडूनही त्यास सहकार्य मिळणे अपेक्षीत आहे. परंतु जे नागरीक सहकार्य करीत नाहीत, त्यांना घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील कलम १५ (zf) नुसार व्यक्ती /संस्थांना दंड (spot fine) आकारणे आवश्यक आहे. तरी घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ च्या तरतुदीचे अनुपालन न करणाऱ्या व्यक्ती/संस्थाना प्रचलित बाब निहाय सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२ दिनांक १४/०८/२०१७ अन्वये दंडाची रक्कम पुढीलप्रमाणे आहेत.

तक्ता क्र.१

अ.क्र.	तपशिल	कायदेशरी तरतूद	वसुल करावयाची प्रती प्रकरणासाठी शुल्काची रक्कम
१	सार्वजनिक जागेत अस्वच्छता पसरविणे	घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २०१६ अन्वये	रु.२००/-
२	खाजगी मालमत्तेच्या जागी कचरा टाकणे		रु.२००/
३	वाहनांतून फेकला जाणारा कचरा		रु.२००/
४	वाहतुकीच्या वाहनांतुन फेकला जाणारा कचरा		रु.२००/
५	सार्वजनिक ठिकाणी आंघोळ करणे		रु.१००/-
६	सार्वजनिक ठिकाणी थुंकणे		रु.२००/-
७	सार्वजनिक ठिकाणी मलमूत्र विसर्जित करणे		रु.२००/-
८	सार्वजनिक ठिकाणी प्राणी किंवा पक्ष्यांना खाण्यास देणे		रु.५००/-
९	सार्वजनिक ठिकाणी वाहने, अन्य कोणत्याही वस्तू दुरुस्त करणे		रु.५००/-
१०	वर्गीकरण न केलेला व वेगवेगळा न साठविलेला घनकचरा प्रती व्यक्तीस		रु.१००/-
३) प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मध्ये विकास आराखडयातील ६० फुटी डी.पी. रस्त्यालगत संरक्षक भिंत बांधणेत आली आहे. सदर रस्त्यावर वसई कोर्ट, तहसील कार्यालय, पंचायत समिती इ. मुख्य कार्यालय असुन मोठया प्रमाणावर नागरीक या ठिकाणी येत असतात. तसेच इथुन जवळच वसई किल्ला असुन पर्यटनसाठी मोठया प्रमाणावर नागरीक किल्ल्यात येतात आणि सांयकाळी देखील सदर रस्त्यावर चालायला येणाऱ्या नागरीकांची वर्दळ असते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता पर्यटनाच्या दृष्टीकोनातुन सदर रस्त्यालगत असलेल्या भिंतीचे रंगकाम करणे, ग्रॅनाईट बसविणे तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जनजागृतीकरिता स्लोगन काढणे इ. कामे करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे :- कोपिंग, प्लास्टरींग, ग्रॅनाईट, रंगकाम, स्लोगन इ.
परिमाण :- लांबी १५०.००मी.

५) यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :- महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- विकास आराखडयातील २० मी. डी.पी. रस्ता

८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. १६ अ.क्र. १४४ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मध्ये ६० फुटी रस्त्यालगतच्या संरक्षक भिंतीचे सुशोभिकरण करणे (चेनेज १५० ते ३००) फेज-२ कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ८,९९,५४१/- इतक्या रक्कमेच्यां अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

23/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५९८ विभाग : बांधकाम

दिनांक :-२७/०६/२०२२

---

१) प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मध्ये ६० फुटी रस्त्यालगतच्या संरक्षक भिंतीचे सुशोभिकरण करणे (चेनेज ० ते १५०) फेज-१ कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकिय रक्कम :- रु. ८,९९,५४१/-

३) प्रस्तावाची गरज :- प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मध्ये विकास आराखडयातील ६० फुटी डी.पी. रस्त्यालगत संरक्षक भिंत बांधणेत आली आहे. सदर रस्त्यावर वसई कोर्ट, तहसील कार्यालय, पंचायत समिती इ. मुख्य कार्यालय असुन मोठया प्रमाणावर नागरीक या ठिकाणी येत असतात. तसेच इथुन जवळच वसई किल्ला असुन पर्यटनसाठी मोठया प्रमाणावर नागरीक किल्ल्यात येतात आणि सांयकाळी देखील सदर रस्त्यावर चालायला येणाऱ्या नागरीकांची वर्दळ असते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता पर्यटनाच्या दृष्टीकोनातुन सदर रस्त्यालगत असलेल्या भिंतीचे रंगकाम करणे, ग्रॅनाईट बसविणे तसेच स्वच्छ भारत अभियान अंतर्गत जनजागृतीकरिता स्लोगन काढणे इ. कामे करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंतर्गत कामे :- कोपिंग, प्लास्टरींग, ग्रॅनाईट, रंगकाम, स्लोगन इ.

परिमाण :- लांबी १५०.००मी.

५) यापूर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी :- महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- विकास आराखडयातील २० मी. डी.पी. रस्ता

८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखाशिर्ष

९) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. १६ अ.क्र. १४४ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मध्ये ६० फुटी रस्त्यालगतच्या संरक्षक भिंतीचे सुशोभिकरण करणे (चेनेज ० ते १५०) फेज-१ कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ८,९९,५४१/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

23/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,

ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ४९९ विभाग :- आस्थापना

दिनांक :-२७/०६/2022

प्रस्तावाचा विषय :- महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशी करणेकामी शासनाचे पॅनल मधिल सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे व देय अनुज्ञेय मानधन अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेची दिनांक ०३ जुलै, २००९ रोजी नव्याने स्थापना झाली असून तत्कालीन वसई,नालासोपारा,नवघर-माणिकपूर व विरार या चार नगरपारिषदा व ५३ गावांचा महानगरपालिकेत समावेश आहे. महानगरपालिकेचा सुधारीत आकृतीबंध ०९ सप्टेंबर २०१४ रोजी मंजूर झाली असून त्यात २८५२ पदाला मंजूरी दिलेली आहे. सध्या महानगरपालिकेत १००५ इतके कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशी सुरु आहेत व काही कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशा प्रलंबित आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सद्यस्थितीत वर्ग-३ संवर्गातील १० कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशीची प्रकरणे ACB लाचलुचपत विभागाशी सबंधित व तसेच इतर वर्ग ३ ची १० व वर्ग ४ ची २० प्रकरणे आहेत.

शासन निर्णय क्रमांक सामान्य प्रशासन विभाग क्र. एसपीओ-२८०८/प्र.क्र.११/२००४/११-अ, दिनांक २६/०५/२००६ अन्वये शासनाने प्रलंबित विभागीय चौकशीच्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी दिनांक ०१/०७/२००६ पासून कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या सेवानिवृत्त अधिका-यांकडे प्रकरण सोपवून निकाली काढण्याचा निर्णय घेतला आहे आणि त्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर नियुक्तीसाठी सेवानिवृत्ती कंत्राटी चौकशी अधिका-यांची सुधारीत सामायिक यादी (पॅनल) दिनांक १४ जानेवारी,२०२० व दिनांक ०४ मार्च, २०२० अन्वये (वर्ग क व ड करिता) शासनाने प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार खालील सेवानिवृत्त निवृत्त अधिकारी इच्छुक आहेत.

इच्छुक सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची सामायिक यादी (पॅनल) मधील (गट "क" व "ड" कर्मचाऱ्यांसाठी)

अ. क्र.	सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे नाव	सेवानिवृत्त होताना धारण केलेले पद	मोबाईल नंबर	पत्ता	तपशिल /शेरा
१.	श्री.एस.एन.जामोदे	सदस्य महाराष्ट्र विक्रीकर न्यायधिकरण, मुंबई	९८२१७६५६२६	बांद्रा, सरिता को.ऑप.हौ.सो.ब्लॉ.नं. २१,५ वा मजला प्लॉट नं.२४ रेक्लमेशन के.सी.मार्ग मुंबई-४०००५०	इच्छुक आहेत. ई-मेल व्दारे संमती दर्शविलेली आहे.

२.	श्री.बा.शि.गायकवाड	अवर सचिव	९८७०५४८९८८	संगम कॉम्प्लेक्स ए-५०१, छत्री बंगलो जवळ, चिकनघर कल्याण,मुंबई (प.)	इच्छुक आहेत. ई-मेल व्दारे संमती दर्शविलेली आहे.
३.	श्री.सुरेश शिवाजी कस्तुरे	अतिरिक्त सरकारी अभियोक्ता	९९६९३८८६३९	ए-४०३ गंगासागर को.ऑ.हौ. लि,म्हाडा एच.आय.जी.बिल्डींग नं.२, म्हाडा ग्रांऊडजवळ, पुनम क्लस्टर नं.२ च्या मागे सुर्या शॉपिंग सेंटर जवळ, शांती गार्डन सोसायटी, मिरा रोड (पू.)	इच्छुक आहेत. ई-मेल व्दारे संमती दर्शविलेली आहे.
४.	श्री.वसंत नारायण पाटील	प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जळगाव	९८२३५०८७४०	बंगला नं.१ निसर्ग कॉलनी,विद्यानगर, बरसोली, अलिबाग जि.रायगड- ४०२२०१.	इच्छुक आहेत. ई-मेल व्दारे संमती दर्शविलेली आहे.
५.	श्री.आशिष अनाक्लेत लोपीस	अवर सचिव	९९६९०१२७६८	मु.पो.वाघोली (माळी-आळी) पो.निर्मळ वसई-विरार शहर महानगरपालिका नालासोपारा (प.) ता.वसई, जि.पालघर, पिन.४०१३०१	इच्छुक आहेत. संमती अप्राप्त

नियुक्त कंत्राटी तत्वावरील सेवानिवृत्त चौकशी अधिका-यांस शासन निर्णय दिनांक १६ फेब्रुवारी, २०१५ नुसार खालीलप्रमाणे अटी-शर्तीस अधिन राहून मानधन अनुज्ञेय राहील

१. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या चौकशी अधिका-यांच्या प्रचलीत मानधनात बदल/वाढ करून एक अपचारी असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी रु. १२,०००/- इतके मानधन अदा केले जाईल. सदर मानधन या आदेशाच्या दिनांकापासून त्यांचेकडे प्रलंबित असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी व त्या पुढील प्रकरणाबाबत अनुज्ञेय राहणार आहे.

२. एका पेक्षा अधिक अपचारी असल्यास प्रत्येक अपचा-या मागे रु.१,५००/- इतके वाढीव मुळ मानधनाच्या रकमेत (रु.१२,०००/-) वाढवून देण्यात येईल. मात्र सदर मानधनाची कमाल मर्यादा रु. २४,०००/- इतकी सिमीत राहील.

३. चौकशीच्या कामासाठी चौकशी अधिकारी यांनी स्वत: लिपिक/टंकलेखक नियुक्त करावा व त्यासाठी त्यांना रु. २,०००/- एवढी अतिरिक्त ठोक रक्कम अदा करण्यात येईल.

४. चौकशी अधिकारी यांना प्रत्येक चौकशी प्रकरणी प्रवास भत्यापोटी रु.७५०/- इतकी रक्कम अदा करण्यात येईल.

५. चौकशी अधिका-यांकडे सोपविण्यात आलेली विभागीय चौकशीची प्रकरणे जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये निकाली काढणे बंधनकारक आहे. अशी कालमर्यादा पाळणे शक्य नसेल अशा प्रकरणी संबंधीत चौकशी अधिका-यांनी ही बाब मा. आयुक्त महोदय यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक राहिल.

६. प्रकरणाची सद्यस्थिती विचारात घेऊन कालमार्यादेस मा. आयुक्त महोदय यांची तीन महिन्यापर्यंत मुदत वाढविणेस अनूमती घेणे आवश्यक आहे.

७. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.२६ मे २००६ चे विवरण पत्र - अ मधील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यासाठीच्या अटी व शर्ती लागू राहतील.

वरील इच्छुक सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यास व त्याचे शासन निर्णयानुसार अनुज्ञेय मानधन अदा करणेस प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस मान्यतेस्तव सादर.

सन २०२२-२०२३ या वित्तीय वर्षासाठी "सामान्य प्रशासन विभागीय चौकशी या लेखा शिर्षाखाली रक्कम रु. ६,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आली आहे.

तरी विभागीय चौकशी प्रकरणी वरील प्रस्तावात नमुद प्रमाणे इच्छूक सेवानिवृत्त चौकशी अधिकारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करण्यास व त्याकरिता होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्याकडे सादर.

ठराव :-

१. वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांची विभागीय चौकशी प्रकरणी शासन निर्णयानुसार ईच्छुक ०५ सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची कंत्राटी तत्वावर चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. नियुक्त करण्यात येणाऱ्या ०५ सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांना प्रस्तावात नमुद प्रमाणे शासनाने निश्चित केलेले मानधन अदा करण्यास तसेच याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

20/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई- मेल vasaivirarcorporation@yahoo.com

विभाग :- बांधकाम

प्रशासकीय ठराव क्र. ५००

दिनांक :- २७/०६/२०२२

---

१) प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.०३ मध्ये युनिटेक मध्ये सेंट झेविअर शाळेसमोरील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.

२) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.२४,६८,५४९/-

३) प्रस्तावाची गरज :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प.) प्रभाग क्र.३ मध्ये युनिटेक मध्ये सेंट झेविअर शाळेसमोरचा रस्ता हा बहुतांश ठिकाणी नादुरुस्त अवस्थेत आहे. तसेच समोरील युनिटेक मधील रस्ता हा कॉक्रीटीकरण केलेला असल्या कारणामुळे सेंट झेविअर शाळेजवळ सखल भाग झाल्या कारणामुळे पाणी साचत असल्याने विद्यार्थ्यांना तसेच सदर नागरिकांना त्रास होत आहे. सदर रस्त्याची उंची वाढविल्यास नागरिकांचा आणि विद्यार्थ्यांना त्रास कमी होण्यास मदत होणार आहे.

सदर कामी रु.२४,६८,५४९/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

४) कामाचे स्वरुप :- अंर्तभूत काम :- खडीकरण व डांबरीकरण
परिमाण :- लांबी - १०० मी. रुंदी - १४.८० मी.

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :-

६) जागेची मालकी :- वसई - विरार शहर महानगरपालिका

७) विकास आराखडयातील आरक्षण :- --

८) अर्थसंकल्पीय तरतूद :- अ) लेखा शिर्ष :- रस्ता बांधकामे

ब) मुळ तरतूद :- रु. ७०,००,००,०००/-

क) शिल्लक :- रु. ३९,७५,३१,४५१/-

ड) तरतूद नियंत्रण नोदंवही क्र. ०१ पृष्ठ क्र.०१ अ.क्र. ०१

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

९) ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ए अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ए' मधील विरार (प.) प्रभाग क्र.०३ मध्ये युनिटेक मध्ये सेंट झेविअर शाळेसमोरील रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी रक्कम रु.२४,६८,५४९/- च्या इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६३ नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांनी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेऊन ई - निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

२५/०६

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई - विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय विरार, पुर्व जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी –०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स-०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५०७

विभाग :- जाहिरात विभाग
दिनांक :-२७/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका हद्दीमधील अनधिकृत व नियमबाहय जाहीरातीचे माध्यमे निष्कासित करण्यासाठी यंत्रसाम्रुगी, वाहन इत्यादी उपलब्ध करुन मिळणेकामीच्या ई-निविदेच्या दरास मंजुरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- वसई विरार शहर महानगरपालिका महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २४४,२४५, व ३८६ अन्वये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम (जाहिरात फलक व नियंत्रण) नियम २००३ नुसार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील आकाशचिन्ह व दृश्य भागातील जाहिराती यांचे नियंत्रण तसेच त्यांना जाहिरात परवाना फी लावणे यांचे अधिकार प्राप्त आहेत.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या जाहिरात विभाग मनपाच्या कार्यक्षेत्रात 'अे ते आय' प्रभाग समिती अंतर्गत येणा-या प्रभागनिहाय प्रभाग समिती स्तरावर परिसरात मनपाच्या जागेवरील अनधिकृत/धोकादायक होर्डिग्ज निष्कासित करण्याचे कामकाज प्रभाग समिती व जाहिरात मुख्यालय, यांचे संयुक्तपणे तातडीने नऊ प्रभाग समिती स्तरावर अनधिकृत/जाहिरात विभागामार्फत घेण्यात येते.

सदरील निष्कासनाच्या मोहीमेचे कामकाज सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरीता नऊ प्रभाग समिती मिळून अंदाजित रु.२७ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे तरी निष्काशित कारवाई दरम्यान यंत्रसामुग्री वाहन इत्यादी उपलब्ध होणे आवश्यक आहे तरी महानगरपालिकेकडे साधनसामुग्री उपलब्ध नसल्याकारणाने ती साधनसामुग्री भाडे तत्वावर घेण्यात येत असल्यामुळे महानगरपालिकेचा वेळ वाया जात आहे तरी नऊ प्रभाग समितीमधील अनधिकृत व नियमबाहय जाहिरातीचे माध्यमे इत्यादी वर कारवाई करणेकरीता ठेकेदाराची नेमणुक झाल्यास काम करणे सुलभ होईल त्याकरीता निष्कासनाची कारवाई करणेकामी ठेकेदाराकडून यंत्रसामुग्री, वाहन इत्यादी उपलब्ध करुन मिळणेकामी ई- निविदा मागविण्यात आली आहे.

मनपाने व शासकीय धोरणानुसार तसेच आखुन दिलेल्या नियमानुसार व व्यवस्थापन करण्याचे कामकाज पार पाडावयाचे आहे. महानगरपालिकने अनधिकृत व नियमबाहय जाहिरातीचे माध्यमे निष्कशित करणेकामी लागणारे यंत्रसामुग्री, वांहन उपलब्ध करुन मिळणेकामी प्रशासकीय ठराव क्र.१३२७ दि.२१/०३/२०२२ अन्वये मनपाच्या संकेतस्थळावर व वर्तमान पत्रात संदर्भ .१ नुसार ई- निविदा मागविण्यात आली होती परंतु निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीनपेक्षा कमी निविदाकाराने भाग घेतला असल्या कारणाने संदर्भ क्र.२ अन्वये जाहीर ई- निविदा प्रथम मुदतवाढ प्रसिध्दी देण्यात आली होती. त्या कालावधीमध्ये एकापेक्षा जास्त ई- निविदाकार प्राप्त झालेले नाहीत. संदर्भ १ व २ दोनवेळा ई- निविदा प्रसिध्दी कामी देण्यात आली असून सुध्दा एकच निविदाकारांनी भाग घेतल्या कारणाने संदर्भ ३ अन्वये दुस-यांदा एक

आठवडयाकरीता व्दितीय मुदतवाढ प्रसिध्दी नोटीस देणेत येवुन सुध्दा एकच ई- निविदा प्राप्त झाली आहे.

संविदेत विहीत मुदतीत एकूण एक निविदाधारकांनी सहभाग घेतला आहे. सहभागी निविदा धारकांपैकी एक खालील निविदाधारकांना आवश्यक ते कागदपत्रांची पुर्तता केली आहे.

ठेकेदाराचे नाव	मागणी केलेले कागदपत्रे					
	जी.एस.टी	ई.एम.डी	पॅनकार्ड	आधारकार्ड	अनुभवाचा दाखला	शेरा
साईराम ट्रान्सपोर्ट	√	√	√	√	√	पात्र

सुधारणा नियम पुस्तिका प्रकरण क्र.४.४.३.१. नुसार निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे परंतु एक निविदा प्राप्त ठरवून लखोटा क्र.१ दि.२९/०४/२०२२ रोजी मा. निविदा समितीपुढे उघडणेस आली.

उपरोक्त एक निविदाकार तांत्रिक बाबी पात्र ठरल्याने त्यांचा आर्थिक बाबींचा लिफाफा क्र.२ दि.२५/५/२०२२ रोजी उघडण्यात आला त्यानुषंगाने खालील निविदाधारकांचे दर प्राप्त झाले आहेत.

अ.क्र	वैदय निविदाकार	ई- निविदेत भरलेले दर
१	साईराम ट्रान्सपोर्ट	रु.१४०००/-(जी.एस.टी करासहित)

वरीलप्रमाणे प्राप्त निविदाकारापैकी तुलनात्मक न्युनतम दर मे. साईराम ट्रान्सपोर्ट यांचे दर योग्य व वाजवी असल्याने महानगरपालिकेच्या अनधिकृत होर्डिग्ज हटविणेकामी यंत्रसाम्रुगी, वाहन इ. पुरविणेकामी मे.साईराम ट्रान्सपोर्ट याचे न्युनतम दर मंजुर करणेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करुन आलेल्या दरास प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी पुढील मंजुरीस्त्व सविनय सादर.

प्रस्तावाचा ठराव :- महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'ए ते आय' कार्यक्षेत्रात प्रभाग निहाय अनधिकृत/नियमबाहय जाहिरातीचे माध्यमे इ. कारवाई करणेकामी यंत्रसाम्रुगी, वाहन इत्यादी उपलब्ध करुन काम करण्यास निविदेतील न्युनतम दराप्रमाणे मे. साईराम ट्रान्सपोर्ट यांची रक्कम रु.१४०००/- (जी.एस.टी करासहित) ही निविदा मंजुर करण्यात येत आहे. तरी सदरील निविदाधारकास करारनाम्यातील अटी व शर्तीस अधिन राहून पुढील निष्कासनाची अंमलबजावणी करीता सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

23/06

आयुक्त तथा प्रशासक

वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी – २०२०-२५२५११०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५०२ विभाग : नगररचना

दिनांक :२७/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- नगररचना विभागामधील इमारतीच्या मंजुरीकरिता सादर होणाऱ्या बांधकाम आराखडे/नकाशे व कागदपत्रांच्या झेरॉक्स काढणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर:- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या अंतर्भूत असलेल्या इमारती, प्रकल्प, औद्योगिक वसाहती व इतर बांधकामांच्या मंजुरीकरिता नस्ती, शासकीय पत्रव्यवहार नगररचना विभागाकडे सादर होतात. सदर सादर झालेल्या नस्तींची छाननी करून त्यांना बांधकाम परवानगी देण्यात येते. सदर दस्तऐवजाची मूळ संचिका नगररचना विभागात ठेवण्यात येतात. सदर संचिकांच्या छायांकित प्रती तातडीने करावयाच्या असल्याने महानगरपालिका नजीकच्या देवडा अँड देवडा झेरॉक्स सेंटर, विरार पूर्व यांचेकडून माहे ऑगस्ट २०१७ ते ऑक्टो.२०१८ या कालावधीत करून घेण्यात आल्या आहेत.

त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	दिनांक	बील नंबर	रक्कम रुपये
१	३१/०८/२०१७	००१	४०६६४
२	३०/०९/२०१७	०११	५६५५०
३	२२/१२/२०१७	०२२	११३६५६
४	३१/१२/२०१७	०२५	११९७४१
५	३१/०१/२०१८	०२८	५८९००
६	२७/०२/२०१८	०३०	९५५४२
७	१५/०३/२०१८	०४१	७२३३४
८	२८/०३/२०१८	०४२	४५३८५
९	३०/०४/२०१८	०५३	४४६१९
१०	३०/०५/२०१८	०५४	३९९८७
११	२८/०७/२०१८	०७२	७२०६७
१२	३०/०७/२०१८	०७५	६०६००
१३	३१/०८/२०१८	०८२	७१२५९
१४	३१/०८/२०१८	०९२	८२२१२
		एकूण	९७३५१६

तरी उपरोक्त देयक रक्कम रु.९,७३,५१६/- मे. देवडा अँड देवडा झेरॉक्स सेंटर यांना आदा करावयाचे आहे. सदरचा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील नगररचना विभाग छपाई व स्टेशनरी खर्च या लेखाशिर्षांतर्गत असलेल्या रु.१५ लक्ष तरतूदीतून भागविता येईल.

करिता माहे ऑगस्ट २०१७ ते माहे ऑक्टोबर २०१८ पर्यंतची रक्कम रु.९,७३,५१६/- (अक्षरी रक्कम रुपये नऊ लक्ष त्र्याहत्तर हजार पाचशे सोळा मात्र) मे. देवडा अँड देवडा झेरॉक्स सेंटर, विरार पूर्व यांना आदा करणे व सदर देयक आदा करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५.२.२ नुसार मे. देवडा अँड देवडा झेरॉक्स सेंटर, विरार पूर्व यांना कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन त्यांचेसोबत संविदा करणे व कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

निर्णय :-

माहे ऑगस्ट २०१७ ते माहे ऑक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये मे. देवडा अँड देवडा झेरॉक्स सेंटर, विरार पूर्व यांचेकडून काढलेल्या झेरॉक्स प्रतींचे देयक आदा करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरण ५.२.२ नुसार मे. देवडा अँड देवडा झेरॉक्स सेंटर, विरार पूर्व यांना कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. मे. देवडा अँड देवडा झेरॉक्स सेंटर, विरार पूर्व यांचेसोबत संविदा करुन त्यांना कार्यादेश देणेस व झेरॉक्सकामी झालेला खर्च एकूण रक्कम रु.९,७३,५१६/- आदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

23/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५०२

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : २७/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.११५ मध्ये करनालपाडा येथील जि.प.शाळा ते गावदेवी मंदिरापर्यंत रस्ता खडीकरण व डांवरीकरण करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.११५ मधील कारनालपाडा जि.प.शाळेपासून ते गावदेवी मंदिरापर्यंत येणाऱ्या रस्याचा पृष्ठभाग माती मुरूमाचा असून पावसाळयाच्या दिवसात सदर रस्त्यावर खड्डे पडून चिखल होत असल्याने स्थानिक नागरीकांना रहदारीस त्रास सहन करावा लागत आहे.

सदरच्या रस्त्या बाबतच्या तक्रारी स्थानिक नागरीक तसेच नगरसेवकांकडून महानगरपालिका कार्यालयात प्राप्त झाल्या आहेत. तरी सदरचा रस्ता हा खडीकरण व डांवरीकरणाने पक्का करणे आवश्यक आहे. त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.३९,३९,३३०/- चे सन २०२१-२२ च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र.११५ मध्ये करनालपाडा येथील जि.प.शाळा ते गावदेवी मंदिरापर्यंत रस्ता खडीकरण व डांवरीकरण करणे कामी रक्कम रू.३९,३९,३३०/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२६/०६

(अनिल कुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल:- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५०४ विभाग: बांधकाम विभाग

दिनांक: २७/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड क्र.११५ मधील बापाणे विभागीय कार्यालयाची दुरूस्ती करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.११५ मध्ये बापाणे येथे महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयाची इमारत आहे. सद्यस्थितीत सदर इमारतीचा वापर हा महानगरपालिका विद्युत विभाग व करवसूली विभाग करत आहेत. सदर ईमारत ग्रामपंचायत काळापासून अस्थित्वात असून जिर्ण अवस्थेत आहे. इमारतीचे प्लास्टर जागोजागी निघाले असून पावसाळया मध्ये इमारतीच्या भिंती व छता मधुन पाणी गळतीची समस्या होत आहे. तसेच सदरच्या इमारतीं मध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. तरी सदर ठिकाणी कामकाजाच्या व कर्मचाऱ्यांच्या सोईच्या दृष्टीने इमारतीचे दुरूस्तीचे काम करणे व इमारतीमध्ये २ सिटचे शौचालय बांधणे आवश्यक आहे.त्याकरीता जागेची पहाणी करून रक्कम रू.१४,७०,४९५/- चे सन २०१९-२० च्या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दर सुचिनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' क्षेत्रातील वॉर्ड क्र.११५ मधील बापाणे विभागीय कार्यालयाची दुरूस्ती करणे कामी रक्कम रू.१४,७०,४९५/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे तसेच अंदाजपत्रकास तांत्रीक मान्यता देऊन निविदा दर मागविणेस मंजुरी देण्यात येत आहे.

24/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

F/C.

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व जि. पालघर, पिन नं. ४०१ ३०५.
दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.
ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्रं. ५०५

विभाग :- अग्निशमन व आणीबाणी सेवा
दिनांक :-२८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये अत्याधुनिक स्वंयचलित **"फायर रिड"** अग्निशमन उपकरणे जी एम पोर्टलवरुन खरेदी करणे कामी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी मिळणे

प्रस्तावाचा मजकूर :- सविनय सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये अत्याधुनिक स्वयंचलित अग्शिमन उपकरण बसविणे कामी मे. ब्लूस्कोप ए.व्ही. टेक्नोलॉजीस प्रा.लि. यांचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर फायर रिड हे उपकरण आगीच्या ठिकाणी उपलब्ध असल्यास ते तत्काळ स्वयंप्रेरणेने कार्यान्वित होते व अग्निशमनाची कार्यवाही करते. सद्या अलिकडच्या काळामध्ये कार्यालये व रुग्णालयामध्ये मोठया प्रमाणात आगी लागण्याचे प्रमाण वाढत आहे व त्या आगीमध्ये रुग्ण व नागरीक यांना आपले प्राण गमवावे लागत असून मोठया प्रमाणात वित्त हानी होत आहे. सध्याच्या या महामारीच्या परिस्थितीत आगीमुळे होणारे नुकसान कमी करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. त्याअनुषंगाने फायर रिड अग्निशमन उपकरण हे फ्लॅमार्क लि. या आंतरराष्ट्रीय कंपनीचे वैशिष्टयपूर्ण उत्पादन आहे. फ्लॅमार्क लि. हि युरोप मधील अग्रगण्य जगप्रसिध्द कंपनी आहे. अग्निशमन साधने, सुविधा, यंत्रणा आणि व्यवस्थापन या संदर्भात संशोधन, प्रयोग, नियोजन आणि निर्मिती यात फ्लॅमार्क लि. कंपनी आघाडीवर आहे. भारतात मे. ब्लूस्कोप ए.व्ही. टेक्नोलॉजीस प्रा.लि. हि कंपनी फायर रिड या अग्निशमन उपकरणाची वितरक आहे.

आगी लागण्याच्या शक्यता असलेल्या ठिकाणी जर हे फायर रिड उपकरण बसविल्यास व प्रत्यक्ष आगीची दुर्घटना घडल्यास हे उपकरण स्वंयप्रेरणेने कार्यान्वित होऊन आग लवकर विझवते. हे अग्निशमन उपकरण सर्व प्रकारच्या आगीवर प्रभावी आहे. जेव्हा आग लागलेल्या क्षेत्रातील तापमान ८४ सेंटीग्रेडहून अधिक होते तेव्हा फायर रिड उपकरण आपोआप सक्रिय होते आणि आग तिच्या प्राथमिक अवस्थेत असतानाच विझवून टाकते. त्यामुळे फायर रिड हे मूल्यवान जीव, वस्तू आणि वास्तू यांना जास्त नुकसान होण्यापूर्वीच वाचवते. फायर रिड अग्निशमन यंत्र कोणत्याही निगराणी अथवा डागडुजी शिवाय सलग १० वर्ष प्रभावी राहते. तसेच हे यंत्र वापरण्यासाठी कोणत्याही मानवी हस्तक्षेपाची व प्रशिक्षाची आवश्यकता लागत नाही.

फायर रिड या अग्निशमन उपकरणाचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक महाराष्ट्र अग्निशमन संचालनालय, मुंबई फायर ब्रिगेड या शासकीय यंत्रणानी केलेले आहे व त्यांची मान्यता मिळवलेली आहे.

सद्यस्थितीत वसई विरार शहर महापालिकेच्या सर्व शासकीय इमारती व हॉस्पिटल या सर्व ठिकाणी अग्निशमन उपकरणे (Extinguisher) बसविलेली आहेत. या सर्व विभागातील अग्निशमन उपकरणे (Extinguisher) यांचा वापर आगीवर नियंत्रण मिळविण्याकरीता करतात. तसेच सदर इमारतींमध्ये बसविलेल्या अग्निशमन उपकरणे यांचे दरवर्षी नुतनीकरण (रिफलिंग) करणे आवश्यक असते. अग्निशमन उपकरणे यांचे वार्षिक नुतनीकरण (रिफलिंग) झाले नाही तर इलेक्ट्रिक, शॉटसर्किट, इलेक्ट्रॉनिक वस्तु, मशिनरी व इतर ठिकाणी दुर्घटना झाल्यास जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता असते.

तरी महानगरपालिकेच्या खालील शासकीय इमारती व रुग्णालये या ठिकाणी फायर रिड हे अग्निशमन उपकरण बसविणे करीता अग्निशमन विभागामार्फत अहवाल सादर केलेला आहे.

क्र.	अग्निशमन विभाग
१	मुख्य अग्निशमन केंद्र - आचोळे, वसई (पूर्व)
२	फुलपाडा अग्निशमन केंद्र- विरार (पुर्व)
३	विराटनगर अग्निशमन केंद्र - विरार (पश्चिम)
४	श्रीप्रस्थ अग्निशमन केंद्र - नालासोपारा (पश्चिम)
५	सनसिटी अग्निशमन केंद्र- दिवाणमान , वसई (प)
६	पारनाका अग्निशमन केंद्र- वसई गाव (प)
७	नवघर अगिशमन केंद्र, नवघर, वसई रोड (पुर्व)

हॉस्पिटल व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र	
क्र	इमारतीचे नाव /प्रभाग समीती
१	नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र , मनवेल पाडा विरार (पु)
२	नागरी प्राथमिकआरोग्य केंद्र , नारंगी बायपास रोड , विरार (पु)
३	नागरी प्राथमिकआरोग्य केंद्र, प्रभाग समीती (अ), विरार (प)
४	नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रभाग समीती (अ), विराट नगर , विरार (प)
५	जिजाई नगर दवाखाणा , मोरे गाव , जिजामाता नगर , नालासोपारा (पु)
६	नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, पाटणकर पार्क ,नालासोपारा (प)
७	नागरी प्राथमिकआरोग्य केंद्र , टाकी रोड ,आंबेडकर नगर , नालासोपारा (पु)
८	नागरी प्राथमिकआरोग्य केंद्र , सर्वोदय वसाहत , तुळींज , नालासोपारा (पु)
९	तुळींज हॉस्पीटल , नागीनदास पाडा ,नालासोपारा (पु)
१०	माता बाल संगोपन केंद्र, तुळींज , सर्वोदय वसाहत ,नालासोपारा (पु)
११	माता बाल संगोपन केंद्र , प्रभाग समिती (जी) , सातीवली , वसई (पु)
१२	माता बाल संगोपन केंद्र , प्रभाग समिती (जी) , जुचंद्र , नायगाव (पु)
१३	नागरी प्राथमीक आरोग्य केंद्र , रौंक गार्डन तलाव , मोरे गाव , नालासोपारा (पु)
१४	नागरी प्राथमीक आरोग्य केंद्र ,प्रभाग समिती (जी) ,नायगाव (पु)
१५	प्राथमीक आरोग्य केंद्र , प्रभाग समिती (जी), क्षेत्रीय कार्यालय, गोखिवरे, वसई (पु)
१६	आचोळे दवाखाना ,प्रभाग समिती (डी) , नालासोपारा (पु)
१७	सर डी.एा.पेटीट रुग्नालय , वसई (प)
१८	नागरी प्राथमिक आरोग्य कंद्र , नवघर , वसई (पु)
१९	नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ,दिवाणमान तलावा जवळ , दिवाणमान ,वसई (पु)
२०	नवघर दवाखाणा , वसई रोड (प)
२१	नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र , ब-हामपुर ,वसई (प)
२२	जि.प. माणिकपुर दवाखाणा , माणिकपुर , वसई (प)
२३	एव्हरशाईन दवाखाणा , ब्रोडवे ,नवघर (पु)
२४	ओम नगर दवाखाणा , वसई (प)
२५	नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ,पेल्हार
२६	नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ,धानिव , बिलालपाडा कार्यालय , नालासोपारा (पु)

वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय इमारत कार्यालय	
क्र	इमारतीचे नाव /प्रभाग समीती
१	वसई विरार शहर महानगरपालीका मुख्यालय ,जुनी इमारत , बाजार वॉर्ड , विरार (पु)
२	वसई विरार मुख्यालय , नविन इमारत , बाजार वॉर्ड , विरार (पु)
३	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (अे) , बोळींज , विरार (प)
४	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (ई) , वृदांवन गार्डन ,नालासोपारा (प)
५	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (ब),मच्छीमार्केट. नालासोपारा (प)
६	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (डी), आचोळे , नालासोपारा (पु)
७	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (एफ) , पेल्हार , वसई (पु)
८	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (जी), वालीव , वसई (पु)
९	वसई विरार शहर महानगरपालीका बहुउददेशिय इमारत ,प्रभाग समिती (एच), दिवाणमान
१०	नवघर , माणिकपुर , प्रभाग समिती (एच) वसई (पु)
११	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (आय) , डी एम पेटीट , वसई गाव

१३	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (सी) , चंदनसार
१४	नियर बस स्टोप , नवघर ,वसई (पु)
१५	वसई विरार शहर महानगरपालीका , प्रभाग समिती (आय) ,वसई गाव
१६	मेडीकल डीपार्टमेंट , आचोळे तलाव, नालासोपारा (पु)
१७	भाउसाहेब वर्तक हॉल , विरार (प)
१८	डिझास्टर मॅनेजमेंट बिल्डींग , दिवाणमान , वसई (प)
१९	डॉ. के व्ही. हेगडेवार लायब्ररी , ओम नगर , अंबाडी रोड , वसई (प)
२०	वाचनालय समाज मंदिर , विरार (पु)
२१	निदानकेंद्र , मनुभाई शाह , विरार (प)
२२	मुख्य अग्निशमन केंद्र , लिंक रोड , आचोळे रोड , नालासोपारा (पु)
२३	वॉटर डीपार्टमेंट ,माणिकपुर ,नवघर ,वसई
२४	डिव्हीजनल ऑफीस , गोखीवरे , वसई (पु)
२५	डिव्हीजनल ऑफीस ,वालीव , वसई (पु)
२६	डिव्हीजनल ऑफिस , सातीवली , वसई (पु)

सदर एक नग फायर रिड अग्निशमन उपकरण जी एम पोर्टल वरुन खरेदी करणे करीता रक्कम रु. ११२५०/- खर्च अपेक्षित असून उपरोक्त शासकीय इमारती व रुग्णालये या ठिकाणी एकुण ७०० नग फायर रिड अग्निशमन उपकरणे बसविण्या करीता रक्कम रु. ७८,७५,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी महानगरपालिकेच्या उपरोक्त शासकीय इमारती व रुणालयाकरीता फायर रिड अग्निशमन उपकरणे बसविल्यास महानगरपालिकेच्या फायदयाचे ठरेल तसेच आगीमुळे मोठया स्वरुपात होणारी जिवीत व वित्त हानी कमी प्रमाणात होईल.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ सह सन २०२२-२३ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात पानं नं. ३१ वर ०४ नंबर लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था साहित्य खरेदी** यामध्ये एकुण वार्षिक रुपये ३ कोटी तरतुद असून सदर खर्च यामधून करता येईल.

तरी महानगरपालिकेच्या शासकीय इमारती व रुणालयाकरीता फायर रिड अग्निशमन उपकरणे जी एम पोर्टल वरुन खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ७८,७५,०००/- खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या शासकीय इमारती व रुणालयाकरीता फायर रिड अग्निशमन उपकरणे जी एम पोर्टल वरुन खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या रक्कम रु. ७८,७५,०००/- खर्चास मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार सदर कामास प्रशासकीय व वित्तिय मान्यता देण्यात येत आहे.

28/06/22

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५०६ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील गोपचर पाडा कब्रस्तान मध्ये नवीन दिवाबत्ती व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावाचा मजकुर:-

१) अंदाजपत्रकीय रक्कम:- रु. ४, ९६,३८० /- (सन २०२१-२२ जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी'चंदनसार कार्यक्षेत्रातील गोपचर पाडा कब्रस्तान मध्ये दिवाबत्तीची पुरेशी सोय नसलेचे दि. ०९/०३/२०२२ आवक क्र.- २७६७ नुसार नवीन दिवाबत्ती ची व्यवस्था करणे कमी पत्र प्राप्त झाले आहे त्यानुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता नविन पोल उभारणे गरजेचे असल्याने सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- -

४) कामाचे स्वरुप :- ६ मी. जी.आय. पोल - १५ नग, ७५ वॅट एल.ई.डी. फिटींग- १५ नग, सिंगल ब्रॅकेट - १५ नग, ४ x २५ स्क्वे. एम. एम केबल - ४४२ मी, पाईप अर्थिंग - १६ नग

५) लेखाशिर्षक :- **" विकासनिधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था / टायमर व्यवस्था"**

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "विकासनिधी अंतर्गत नविन पोल उभारणे/ भुमिगत केबल व्यवस्था/ टायमर व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम रु.१५, ००, ००,०००/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी ' चंदनसार कार्यक्षेत्रातील गोपचर पाडा कब्रस्तान मध्ये नवीन दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रु. ४,९६,३८० /- पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५०७ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- २८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील भालचंद्र नगर फेज ३ ते आनंद नगर पर्यंत नव्याने दिवाबत्ती व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २, ९१,०१९ /- (सन २०२१-२२ जिल्हा दरसुची नुसार)

३) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील भालचंद्र नगर फेज ३ ते आनंद नगर येथील मुख्य रस्त्यावर अंधार पडत असल्याने दि. २६/०३/२०२२ आवक क्र. ३११९ नुसार पत्र प्राप्त झाले असून लहान मुले, महिला व नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदर ठिकाणी नविन पोल उभारणे गरजेचे असल्याने सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- -

४) कामाचे स्वरुप :- ६ मी. जी.आय. पोल - १० नग, ६० वॅट एल.ई.डी. फिटींग - १० नग, सिंगल ब्रॅकेट - १० नग, ४ x १६ स्क्वे. एम. एम वायर - २८३ मी, पाईप अर्थिंग - १० नग

५) लेखाशिर्षक :- **"इतर दिवाबत्ती व्यवस्था"**

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील **"इतर दिवाबत्ती व्यवस्था"** या लेखाशिर्षकातील रक्कम रु.१५, ००, ००,०००/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील भालचंद्र नगर फेज ३ ते आनंद नगर पर्यंत नव्याने दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.२, ९६,७८९ /- पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५०८ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (सी) चंदनसार कार्यक्षेत्रातील शर्मा सप्लायर्स बिल्डिंग वि. सा. मार्ग, गोपचरपाडा तरादीप बिल्डिंग दर्गा, बेगर्स होम म्हात्रे हाऊस, विरार इंडस्ट्रियल इस्टेट बापा सिताराम, जमादार कंपाऊंड, विठूरमाळी कंपाऊंड, जनकपूरधाम, मधु चौधरी चाळ, गुलमोहर उद्यान, शिरगाव येथे नविन थ्रीफेज टायमर व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

---

१. **अंदाजपत्रकीय रक्कम** :- रु. ४,९०,९५२/- (सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२. **कामाची आवश्यकता** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (सी) चंदनसार कार्यक्षेत्रातील शर्मा सप्लायर्स बिल्डिंग वि. सा. मार्ग, गोपचरपाडा तरादीप बिल्डिंग दर्गा, बेगर्स होम म्हात्रे हाऊस, विरार इंडस्ट्रियल इस्टेट बापा सिताराम, जमादार कंपाऊंड, विठूरमाळी कंपाऊंड, जनकपूरधाम, मधु चौधरी चाळ, गुलमोहर उद्यान, शिरगाव येथे सार्वजनिक रस्त्यावर महिलांच्या/बालकांच्या व नागरिंकांच्या सुविधेसाठी दिवाबत्ती पोलवर दिवे लावून दिवाबत्ती व्यवस्था करण्यात आली आहे.परंतू सदरील सार्वजनिक रस्त्यावर थ्रीफेज टायमर व्यवस्था नसल्याने मॅन्युअल पद्धतीने सार्वजनिक दिवाबत्ती चालु करावी लागत असल्याने सदरील ठिकाणी नविन स्वयंचलित टायमर पॅनल बसविणे गरजेचे असल्याने सोबत जोडलेले अंदाजपत्रकाप्रमाणे विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

३. **जागेची मालकी** :- -

४. **कामाचे स्वरुप** :- टायमर पॅनल -१० नग, पाईप अर्थिंग - १० नग, आर्मड केबल ४x२५ स्क्वे.एम.एम- २८० मी

५. **लेखाशिर्षक** :- **"विकासनिधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था "**

उपरोक्त नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "विकासनिधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था /टाईमर व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम रु.१५, ००, ००,०००/- तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी ' चंदनसार कार्यक्षेत्रातील शर्मा सप्लायर्स बिल्डिंग वि. सा. मार्ग, गोपचरपाडा तरादीप बिल्डिंग दर्गा, बेगर्स होम म्हात्रे हाऊस, विरार इंडस्ट्रियल इस्टेट बापा सिताराम, जमादार कंपाऊंड, विठूरमाळी कंपाऊंड, जनकपूरधाम, मधु चौधरी चाळ, गुलमोहर उद्यान, शिरगाव येथे नविन थ्रीफेज टायमर व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.४,९०,९५२/-पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५०९ **विभाग** :- विदयुत विभाग
दिनांक :-२८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी ' चंदनसार कार्यक्षेत्रातील मकवाना कॉम्प्लेक्स शेजारी नवीन हायमास्ट उभारून दिवाबत्ती व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावाचा मजकुर:-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. १, ४२,०३२/- (सन २०२१-२२ जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी चंदनसार कार्यक्षेत्रातील वीर सावरकर मार्ग येथील मकवाना कॉम्प्लॅक्स येथे मुख्य चौक तीन रस्ते एकत्र मिळत असुन रात्रीच्यावेळी सदर ठिकाणी अंधार पडत असल्याचे दि. २४/०२/२०२२ आवक क्र. २३०३ नुसार पत्र प्राप्त झाले असून सदर ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी केली असता सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- -

४) कामाचे स्वरुप :- ९ मी हायमास्ट - १ नग, १५० वॅट एल.ई.डी फ्लड लाईट - ४ नग, ४ x २५ स्क्वे. एम. एम केबल - ४० मी, जी आय पाईप - २० मी

५) लेखाशिर्षक :- **"विकासनिधी अंतर्गत नविन पोल उभारणे/भुमिगत केबल व्यवस्था / टायमर व्यवस्था"**

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "विकासनिधी अंतर्गत नविन पोल उभारणे/ भुमिगत केबल व्यवस्था/ टायमर व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम रु.१५, ००, ००,०००/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी ' चंदनसार कार्यक्षेत्रातील मकवाना कॉम्प्लेक्स शेजारी नवीन हायमास्ट उभारून दिवाबत्ती व्यवस्था करणे कामी येणाऱ्या रु. १, ४२,०३२/- पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५७०

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील स्वच्छ भारत सर्वेक्षण अंतर्गत सार्वजनिक शौचालय मध्ये विधुतीकरण करणे कामी कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावाचा मजकुर:-

१) अंदाजपत्रकीय रक्कम:- रु. ४, १४,७४२ /- (सन २०२१-२२ जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील स्वच्छ भारत सर्वेक्षण अंतर्गत सार्वजनिक शौचालय ठिकाणी नागरीकांची मोठया प्रमाणात गैरसोय होत असल्यामुळे सार्वजनिक शौचालय मध्ये विधुतीकारण व दुरुस्ती करणे गरजेचे असल्याने सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- -

४) कामाचे स्वरुप :- एक्सहॉस्ट फॅन - २४५ नग, पॉईंट वायरिंग - २४८ नग, DPMCB - ३३ नग, ४० वॅट, लॅम्प - २४५ नग, १०० वॅट लॅम्प - ६६ नग, लॅम्प होल्डर - ३११ नग

५) लेखाशिर्षक :- "इतर दिवाबत्ती व्यवस्था"

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम रु.१५, ००, ००,०००/- तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील स्वच्छ भारत सर्वेक्षण अंतर्गत सार्वजनिक शौचालय मध्ये विधुतीकरण करणे कामी येणाऱ्या रु. ४, १४,७४२ /- पर्यंतच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५७१ विभाग:- विदयुत विभाग
दिनांक :-२८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील वरद विनायक लेन वास्तुशिल्प टॉवर ते नेसले हाईट पर्यंत नवीन दिवाबत्ती व्यवस्था करणे कामास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत...

प्रस्तावाचा मजकुर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम:- रु. ४, ९२,६०८ /- (सन २०२१-२२ जिल्हा दरसुची नुसार)

२) कामाची आवश्यकता:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील वरद विनायक लेन वास्तुशिल्प टॉवर ते नेसले हाईट पर्यंत सार्वजनिक बांधकाम विभाग मार्फत ३०० मीटर रस्त्याचे काम करण्यात आले असून सदर रस्त्यावर रहदारी सुरु झाली असून अंधार पडत असल्याने सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता नविन पोल उभारणे गरजेचे असल्याने सोबत जोडलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

३) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

४) कामाचे स्वरुप :- ९ मी. पोल - ११ नग, ९० वॅट एल.ई.डी. फिटींग - ११ नग, सिंगल ब्रॅकेट - ११ नग, ४ x २५ स्क्वे. एम. एम वायर - ३९० मी, पाईप अर्थिंग - ११ नग

५) लेखाशिर्षक :- **"इतर दिवाबत्ती व्यवस्था"**

उपरोक्त वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील वरद विनायक लेन वास्तुशिल्प टॉवर ते नेसले हाईट पर्यंत नवीन दिवाबत्ती व्यवस्थाकरणे करणे करिता कामाच्या होणाऱ्या रक्कम रु. ४, ९२,६०८ /- अदांजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी.

प्रस्तावाचा ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील वरद विनायक लेन वास्तुशिल्प टॉवर ते नेसले हाईट पर्यंत नवीन दिवाबत्ती व्यवस्था करणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये रक्कम रु. ४,९२,६०८ /- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५७२ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार ग्रामीण घरपट्टी विभागासाठी इन्व्हर्टर व बॅटरी बसवून कार्यान्वित करणे.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **अंदाजपत्रकीय रक्कम:-** रु.४९, ६९२/-

२) **कामाची आवश्यकता:-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार ग्रामीण विभागात घरपट्टी विभागाचे कार्यालय आहे. सदर कार्यालयामध्ये घरपट्टी भरणा करणारे नागरिक येत असतात. तसेच कर्मचारी वर्ग या ठिकाणी कार्यरत आहेत. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विद्युत प्रवाह खंडित होत असल्याने घरपट्टी भरणा करण्या-या साठी येणा-या नागरिंकाची संगणक बंद झाल्याने गैरसोय होते. व वीज पुरवठा येईपर्यत तेथे तात्काळत उभे रहावे लागते याबाबतचा लेखी अर्ज दि.१५/१२/२०२२ रोजी ग्रामीण विभागातुन प्राप्त झाला असून सदर ठिकाणी इन्व्हर्टर व बॅटरी ची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

३) **जागेची मालकी** :- -

४) **कामाचे स्वरुप** :- १३५Ah बॅटरी - २ नग, १४०० V.A इन्व्हर्टर - १ नग,
२ x ४ स्क्वे. एम.एम वायर २० मी

५) **लेखाशिर्षक** :- **"इतर दिवाबत्ती व्यवस्था"**

उपरोक्त नमुद वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार ग्रामीण घरपट्टी विभागासाठी इन्व्हर्टर व बॅटरी बसवून कार्यान्वित करणे करिता कामाच्या होणाऱ्या रक्कम रु.४९, ६९२/-अदांजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी.

प्रस्तावाचा ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार ग्रामीण घरपट्टी विभागासाठी इन्व्हर्टर व बॅटरी बसवून कार्यान्वित करणे कामाकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये रक्कम रु.४९, ६९२/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५७३ विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-२८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी टायमर पॅनल दुरुस्ती करणे.

प्रस्तावाचा मजकुर :-

१) **अंदाजपत्रकीय रक्कम** :- रु. २,९९,०९८/- (सन २०२१-२२ चे जिल्हा दरसुची नुसार)

२) **कामाची आवश्यकत** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती सी चंदनसार कार्यक्षेत्रातील दिवाबत्ती देखभाल दुरुस्तीचे कामे विद्युत विभागामार्फत करणेत येतात. सार्वजनिक दिवाबत्ती वेळेत चालू व बंद करणेकरीता टायमर पॅनल लावण्यात आले आहेत. परंतु प्रभाग समिती सी कार्यक्षेत्रातील बहुतेकतयमर पॅनल हे खराब व नादुरुस्त झाले आहेत. त्यामुळे सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्था वेळेत चालू व बंद होत नाही. परिणामी नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत तसेच महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेतील सोडियम व्हेपर दिवे बदलून एल ई डी दिवे लावण्याची कार्यवाही उरू आहे. सादर निविदेमध्ये स्वयंचलित टायमर पॅनल दुरुस्ती काम समाविष्ट नसलेने महानगरपालिकेमार्फत टायमर पॅनल ची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक राहील.

३) **जागेची मालकी** :- वसई विरार शहर महानगरपालिका,

४) **कामाचे स्वरुप** :- इलेक्ट्रॉनिक टायमर स्विच - ३५ नग २ पोल पॉवर कॉन्टॅक्टर - ३५ नग HC पॅटर्न पोर्सलीन फ्युज १६ A - ३३ नग HC टाईप फ्युज लिंक १०० A - ३३ नग, HC टाईप फ्युज लिंक ६३ A - ७४ नग, SPMCB ४० A ते ६३ A - ३३ नग १ x २५ sq mm कॉपर कंडक्टर - १५० मी

५) **लेखाशिर्षक** :- "इतर दिवाबत्ती व्यवस्था"

उपरोक्त नमुद वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी टायमर पॅनल दुरुस्ती करणे करिता कामाच्या होणाऱ्या रक्कम रु. २,९९,०९८/- अदांजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी.

प्रस्तावाचा ठराव:- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी' चंदनसार कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी टायमर पॅनल दुरुस्ती करणे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अन्वये रक्कम रु. २,९९,०९८/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५७४ विभाग: भांडार विभाग
दिनांक :२५/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय:- कौलसिटी रुग्णालयात रक्त शुध्दीकरण करण्यास (डायलेसिस) आर.ओ.वॉटर फिल्टर बसविणे कामी येणाऱ्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका मध्ये कोविड-१९ या साथीचे रोगावर उपचार व प्रतिबंध करण्यांस शहरामध्ये खालील ठिकाणी कोविड-१९ उपचार केंद्र सुरु होती.

अ.क्र.	ठिकाण
१.	श्री. जीवदानी देवी रुग्णालय, चंदनसार
२.	कौलसिटी रुग्णालय

वरील ठिकाणी कोविड-१९ करीता तातडीने वैद्यकीय व्यवस्था निर्माण करण्यांत आली होती. कोविड-१९ मधील तिसऱ्या लाटेमध्ये म्युकर मायकोसिसची ची लक्षणे दिसून येत असल्याने व त्यावर उपचार करण्यांस रुग्णांना डायलेसीसची आवश्यकता लागत असल्याने महानगरपालिकेच्या कौल सिटी रुग्णालयात १० नग डायलेसीस मशिन बसविण्याबाबत तत्कालीन मा. आयुक्त तथा प्रशासक सो. यांनी वैद्यकीय आरोग्य विभागाला आदेश दिले होते व भांडार विभागाला डायलेसीस मशीनसाठी लागणारी शुध्द पाणी व अशुध्द पाणी मशिन मधून निचरा होण्यांस पाईप लाईनची व्यवस्था करणे, साधनसामग्री धूण्यांस विशेष नळांची व्यवस्था करण्यांस तोंडी आदेश दिले होते. कोविड-१९ च्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर आर.ओ.वॉटर फिल्टर बसविणे आवश्यक होते. त्यानुसार सदर यंत्रणेची GEM पोर्टलवरील दर तपासणी केली असता रक्कम रु. १६,११,९००/- इतकी दर्शविण्यात आली होती. त्यामुळे तत्कालीन मा. आयुक्त सो. यांनी बाजारभावातील दरपत्रके मागविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे ३ दरपत्रके मागविली असता न्युनतम दरपत्रकामध्ये रक्कम रु. १०,६०,४१०/- इतकी दर्शविण्यात आली होती. त्यानुसार बाजारातील न्यूनतम दरपत्रकदार मे. नाईक इंटरप्रायजेस यांच्याकडून सदर यंत्रणा बसविण्यात आली. सदर यंत्रणा खरेदी केल्यामुळे महानगरपालिकेची रक्कम रु. ५,५०,०००/- इतकी बचत झालेली आहे. तसेच मा. उप आयुक्त (भांडार) यांनी कर्मचाऱ्यांसोबत दि. ०९/०६/२०२२ रोजी कौलसिटी रुग्णालय येथे सदर यंत्रणेची प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असून तेथील वैद्यकीय अधिकारी स्वत: उपस्थित होते. तसेच सदर यंत्रणेबद्दल वैद्यकिय अधिकारी यांनी प्रमाणपत्र सादर केले असून सदर यंत्रणा सुस्थितीत चालु असल्याचे कळविले आहे.

कौलसिटी रुग्णालयात प्राप्त झालेल्या मशिन फिर्टींगसाठी कंपनीने त्यांचे कन्सलंट कडून वेळोवेळी दिलेल्या सूचनांप्रमाणे आर.ओ.वॉटर यंत्रणा व पाईप लाईन इत्यादी यंत्रणा फिर्टींग करणे याबाबी माहे डिसेंबर २०२१ मध्ये पूर्ण झाल्या परंतू सदर यंत्रणा बसविते वेळी कंपनीचे कन्सलंटद्वारे दिलेल्या सूचना व पाईप लाईन मध्ये दोन वेळा बदल केला असल्याने काम करण्यांस सुमारे ४० दिवसांच्या कालावधी गेला.

तत्कालीन मा. आयुक्त तथा प्रशासक साहेब यांचे सूचनेनूसार काम करण्यांत येत होते. परंतु आवश्यक यंत्रणा बसविणे कार्यान्वित करणे शुध्द पाणी लॅबमध्ये तपासणी करणे इ. बाबी अंदाज येत नसल्याने प्रस्ताव तयार करणे व आवश्यक मंजूरी घेऊन कार्यादेश देणे या बाबींसाठी वेळ गेला. दरम्यानच्या काळात ११ जानेवारी नंतर मा. तात्कालीन आयुक्त तथा प्रशासक सो. यांची बदली झाल्याने सदर झालेल्या खर्चास मंजूरीची प्रक्रिया अडकली.

आता सदर डायलेसीस मशिन साठी बसविण्यांत आलेली आर.ओ.वॉटर यंत्रणा डिसेंबर २०२१ पासून कार्यान्वित असून रुग्णांना डायलेसीस सेवा महानगरपालिके कडून दिली जात आहे. त्याबाबत आर.ओ. वॉटर यंत्रणा बाबत डॉक्टरांचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

तरी महानगरपालिकेच्या कौल सिटी रुग्णालयात कोविड-१९ करिता म्युकर मायकोसिसची लक्षणे असलेल्या रुग्णांवर उपचार करणेकामी डायलेसीस मशिन करीता लागणारी आर.ओ.वॉटर यंत्रणा, पाईप लाईन व नळ इत्यादी व्यवस्था बसविण्यांस खालील प्रमाणे खर्च झालेला आहे.

अ.क्र.	ठिकाण	बसविलेल्या यंत्रणेचा तपशिल	दर	आवश्यक नग	एकूण
१.	महानगरपालिका रुग्णालय कौल सिटी (डायलेसिस सेंटर)	१००० क्षमतेचा आर.ओ. युवी. वॉटर कमर्शिअल फ्लांट	६०००००	१ नग	६०००००
२.		एस.एस.टँक ७५० लिटर	७००००	१ नग	७००००
३.		बुस्टर मोटर १ एच.पी.	१८३००	३ नग	५४९००
४.		नोझल	२९००	२४ नग	६९६००
५.		पी.वी.सी. पाईप लाईन व फिटींग साहित्यासह	१०५०००	१ नग	१०५०००
				एकूण	८,९९,५००/-
				१८%GST	१,६१,९१०/-
				एकूण	१०,६१,४१०/-

सदर आर.ओ.वॉटर यंत्रणा बसविणेचे काम कोविड-१९ चे तिसऱ्या लोटसाठी करणे व अत्यावश्यक व तात्काळ असल्याने रक्कम रु. १०,६१,४१०/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क अन्वये मा. आयुक्त साहेब यांना असलेले अधिकारानुसार कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस व विना निविदा अनुसुची 'ड' प्रकरण ५(२)(२) अन्वये मे. नाईक इंटरप्रायझेस यांचेकडून तात्काळ थेट खरेदी कामी झालेल्या रक्कम रु. १०,६१,४१०/- खर्चास व ती रक्कम अदा करणेकामी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

ठराव :- कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाय योजनेकरिता उपरोक्त प्रस्तावा मधील वरील आर.ओ.वॉटर फिल्टर तात्काळ पूरवठादार मे. नाईक इंटरप्रायझेस हयाच्यांकडून विना ई-निविदा खरेदी करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अनुसुची 'ड' प्रकरण ५ (२) (२) व कलम ६७(३)(क) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार महानगरपालिका रुग्णालय कौल सिटी येथे आर.ओ.वॉटर फिल्टर खरेदी करुन झालेल्या रक्कम रू. १०,६१,४१०/- (अक्षरी रुपये दहा लक्ष एकसष्ट हजार चारशे दहा मात्र) खर्चास कार्योत्तर मंजुरी व ती रक्कम अदा करणेस मंजुरी देण्यात येत आहे.

२८/०६

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि.पालघर पिन नं.४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५० -२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स् - ०२५० -२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५७५ विभाग :- वृक्षप्राधिकरण/उद्यान
दिनांक :- २८ / ०६ /२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई-विरार शहर महानगरपालिका वृक्षप्राधिकरण विभागाकरीता वृक्षतोड व छाटणीसाठी आवश्यक साहित्य खरेदी करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका, वृक्षप्राधिकरण विभागामार्फत, संपूर्ण महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ता दुतर्फा, सार्वजनिक उद्याने तसेच इतर सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वृक्षांची छाटणी करणे व धोकादायक वृक्ष तोडणेचे काम केले जाते. सदर कामाकरीता महानगरपालिकेकडे ०३ मॅकलिफ्टन वाहने उपलब्ध आहेत. ज्या ठिकाणी मॅकलिफ्टव्दारे छाटणी करणे शक्य होत नाही त्याठिकाणी मॅकलिफ्टन न वापरता आपल्या मजुरांमार्फत झाडांवर चढून छाटणी करावी लागते आणि वृक्षांची छाटणी केल्यानंतर मोठया फांद्याचे छोटे भाग करणे आवश्यक असते. सदर पावसाळ्यात झालेल्या वादळामुळे काही ठिकाणी झाडे उन्मळून पडण्याच्या घटना घटत असतात त्यामुळे सदर उन्मळून पडलेली झाडे कापणेचे तसेच रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या झाडांचे छाटणीचे काम करणेस आवश्यक साधन सामुग्री अल्प प्रमाणात असल्याने सदर कामे जलद गतीने पुर्ण करण्यात विलंब होतो. त्यामुळे वृक्ष छाटणी/तोडणीचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना चैन-सॉ-कटर (पेट्रोल) व कटर मशिन चैन अत्यंत आवश्यक आहे.

सदर कार्यरत कर्मचाऱ्यांस वृक्षतोडीकरीता आवश्यक साहित्य उपलब्ध करुन देणेकामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय खर्चास मा.प्रशासकीय ठराव क्र. २१०, दि. ११/०६/२०२१ अन्वये प्रदान करणेत आलेल्या प्रशासकीय व वित्तीय मंजूरीनुसार जा.क्र./वविशम/वृक्षप्राधि./१४/२२-२३, दि. ०५/०४/२०२२ अन्वये दरपत्रक मागविण्यात आले होते. सदर मुदतीमध्ये प्राप्त **में. क्वालिटी सिड्स ॲण्ड नर्सरी** यांच्या निम्नत्तम दराच्या दरपत्रकास दि. / / रोजीच्या मंजूर टिपणीनुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे

अ.क्र.	साहित्याचा तपशील	परिणाम	में. क्वालिटी सिड्स ॲण्ड नर्सरी	नग	एकूण रक्कम
१.	चैन-सॉ-कटर (पेट्रोल)	२४" इंच फाटा	रु. ६९,०००/-	०३	२,०७,०००/-
२.	कटर मशीन चैन	२४" इंच	रु. १,९००/-	०६	११,४००/-
				एकूण रक्कम	२,१८,४००/-

सदर साहित्य खेरदी करणेकामी येणार एकूण खर्च २,१८,४००/- रु. (अक्षरी रु. दोन लाख अठरा हजार चारशे रुपये मात्र) इतका खर्च अपेक्षित असून सदरचा खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाचे अर्थसंकल्पीय तरतूद लेखाशिर्ष संयत्रे व साहित्य खरेदी या लेखाशिर्षका मधील तरतूद रक्कम ३० लक्ष मधून मागविता येईल, सदर कामी करारनाम्याच्या मसुदयाची तपासणी व पडताळणी झाल्यानंतर मंजूर दरपत्रकधारकांशी करारनामा करणेस व सदर वरील नमूद आवश्यक बाबींच्या संख्येनुसार कार्यादेश देणेस पुढील मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव निर्णय :- सदर उपरोक्त विषयानुसार पुर्व पावसाळी तसेच पावसाळ्यात धोकादायक वृक्षांची छाटणी व कापणी करण्याकरीता आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणेकामी में. क्वालिटी सिड्स ॲण्ड नर्सरी यांचे निमत्म दरास मंजूरी देण्यात येत असून सदर में. क्वालिटी सिड्स ॲण्ड नर्सरी यांच्या सोबत करारनामा करुन सविदा करण्यास तसेच कार्यादेश प्रदान करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

23/06

आयुक्त तथा प्रशासक

वसई-विरार शहर महानगरपालिका

वसई - विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि- पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७
ई-मेल - vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ५७६ **विभाग :- वाहन**

दिनांक :- २८/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- सार्वजनिक दिवाबत्ती देखभाल दुरुस्तीकरिता युटिलिटी वाहनावर हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी मंजूरी मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात सार्वजनिक रस्त्यावरील, उद्यान, तलाव, मैदान, स्मशानभुमी इ. सार्वजनिक ठिकाणी दिवाबत्ती व्यवस्था करणेत आली आहे व त्याची दैनंदिन देखभाल दुरुस्ती महानगरपालिका प्रभाग निहाय विद्युत विभागांमार्फत करण्यात येते.

सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थेतील शहरातील मनपा मालकिचे विविध उंचीचे विद्युत पोलवरील दिव्यांची देखभाल दुरुस्ती करणेकरीता प्रभाग समिती ए, ई, एफ, एच व आय करिता ५ नग १३ मी. व ११ मी. उंचीची हायड्रोलिक लॅडर वाहन उपलब्ध आहेत व प्रभाग समिती ए, बी ,डी, ई , एफ , जी, एच, आय करिता एकूण ६ युटिलिटी वाहन उपलब्ध आहेत. त्याचा वापर सार्वजनिक दिवाबत्ती देखभाल दुरुस्ती कामाकरीता होत असतो. प्रभाग समिती (बी) कार्यक्षेत्रात स्वतंत्र हायड्रोलिक लॅडर वाहन उपलब्ध नाही. याकरिता प्रभाग समिती (बी) कडील उपलब्ध असलेल्या एम एच ४८ बी एम ६८९० या युटिलिटी वाहनावर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेबाबत संदर्भ क्र. १ अन्वये दिवाबत्ती विभागाने मागणी केलेली आहे.

यापुर्वी दिवाबत्ती विभागाच्या कामकाजाच्या दृष्टने प्रभाग समिती ए, प्रभाग समिती डी व प्रभाग समिती जी मधील ३ युटिलिटी वाहनावर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेकामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन हायड्रोलिक लॅडर बसविणेत आलेले आहेत. त्याचप्रमाणे विद्युत विभागाच्या मागणीनुसार प्रभाग समिती बी कार्यालयाकडील वाहन क्र. एम एच ४८ बी एम ६८९० या वाहनावर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेकामाची नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. तसेच त्याकामी र.रु. १५,००,०००/- लक्ष पर्यंत खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च वाहन खरेदी / रोडरोलर खरेदी या लेखाशिर्षांतर्गत भागविणे शक्य होईल.

तरी प्रभाग समिती बी कार्यालयाडील १ नग युटिलिटी वाहन क्र. एम एच ४८ बी एम ६८९० वर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेकामाची ई-निविदा प्रकिया राबविणे तसेच सदरकामी होणाऱ्या अंदाजित र.रु.१५,००,०००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती बी कार्यालयाडील दिवाबत्ती विभागाकडे कार्यरत असलेल्या युटिलिटी वाहन क्र. एम एच ४८ बी एम ६८९० या वाहनावर ११ मीटर उंचीचे हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी ई-निविदा प्रकिया राबविणे तसेच त्याकामी होणाऱ्या अंदाजित र.रु.१५,००,०००/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे.

२३/०६.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ५७७ विभाग : सार्व.बांधकाम

दिनांक :२८/०६/-२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) प्रभाग क्र. ५९ मधील सोपारा जिल्हा परिषद शाळेजवळ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याकरीता मेघडंबरीची दुरुस्ती करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. २०,५२,८८२/-

प्रशासकीय मंजूरी :- मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचेकडील ठराव क्र. १०४३ दि. २४/०१/२०२२.

तांत्रिक मंजूरी :- मा. कार्यकारी अभियंता ह्यांच्याकडील दि. २४/०१/२०२२.

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/२११९/२०२२ दि. २४/०१/२०२२ शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी :- दि. २८/०१/२०२२

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. लोकमत, दै. पुढारी, दै. मिड-डे

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख :- दि. २८/०१/२०२२ दु. ३.०० पासुन ते दि. ०९/०२/२०२२ दु. ३.०० पर्यत

(प्रिपरेशन व स्विकारण्याची)

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ४

ई -टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि. ११/०२/२०२२ सांय. ४.०० वाजता

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) कार्यकारी अभियंता
२) शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

अ.क्र.	निविदाधारकांचे नाव	निविदा दर
१.	**मे.शाहरुख इस्माईल**	**अंदाजपत्रकीय दराने**
२.	मे. चिरंजीवी एंटरप्रायजेस	४.००% जास्त दराने
३.	मे. द्वारका कंन्स्ट्रक्शन	३.००% जास्त दराने

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. शाहरुख इस्माईल** यांच्या निविदेतील दर **अंदाजपत्रकीय दराने** असुन सदरचा दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी व वाजवी आहे. सदरच्या दरास **निविदा समितीने दि. ३१/०३/२०२२ रोजीच्या** बैठकीत मान्यता दिलेली आहे.

तरी **मे. शाहरुख इस्माईल** यांच्या अंदाजपत्रकीय दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून **मे. शाहरुख इस्माईल** ह्यांची निविदा **अंदाजपत्रकीय दराची** निविदा असल्याने मंजूरीस्तव सादर. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये संविदा करणेसाठी मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) प्रभाग क्र. ५९ मधील सोपारा जिल्हा परिषद शाळेजवळ छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याकरीता मेघडंबरीची दुरुस्ती करणेकामी **मे. शाहरुख इस्माईल** यांची **अंदाजपत्रकीय दराची** निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये **अंदाजपत्रकीय दराच्या** निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

24/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ५१८

विभाग : सार्व.बांधकाम
दिनांक :२९/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी स्वातंत्राचा अमृत महोत्सव अंतर्गत विभागनिहाय आयकॉनिक कार्यक्रम करणेकामी डिजीटल वॉल पेंटींग व नियॉन साईन बोर्ड द्वारे लोगो प्रदर्शित करणेकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- सादर करण्यात येते की, मा. सचिव सांस्कृतिक कार्य यांनी "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या उपक्रमांतर्गत विभागनिहाय आयकॉनिक कार्यक्रम/उपक्रम सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार दोन फ्लॅगशिप कार्यक्रम/उपक्रम सादर करणेबाबत सुचविण्यात आलेले आहे.

तसेच मा. मुख्य सचिवांनी "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" या उपक्रमांतर्गत प्रत्येक विभागाने राज्यस्तरावर काही रचनात्मक/लक्षवेधी/ नाविन्यपुर्ण/ संस्मरणीय असा त्यांच्या विभागाशी संबंधित एक आयकॉनिक प्रकल्प सांस्कृतिक कार्य विभागामार्फत अंमलबजावणी समितीस सादर करावा अशा सूचना दिल्या आहेत.

त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत विविध दर्शविणे जागेवर डिजीटल वॉल पेंटींगद्वारे "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" लोगो प्रदर्शित करणेकामी प्रत्यक्ष जागेची पाहणी करण्यात आली असून प्रभागनिहाय परिमाण पुढीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	प्रभाग समिती	परिमाण (चौ. फुट)
१	ए	१५०० चौ.फुट
२	बी	१५०० चौ.फुट

३	सी	१५०० चौ.फुट
४	डी	१५०० चौ.फुट
५	ई	१५०० चौ.फुट
६	एच	१५०० चौ.फुट
७	जी	१५०० चौ.फुट
८	एच	१५०० चौ.फुट
९	आय	१५०० चौ.फुट
एकूण		१३,५०० चौ.फुट

वरील नमूद ठिकाणी डिजीटल वॉल पेंटींग द्वारे "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" लोगो प्रदर्शित करणेकामी रक्कम रु. ३०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मुख्य कार्यालय विरार (पुर्व), प्रभाग समिती ए ते आय असे एकूण ९ प्रभाग समिती कार्यालये, मुख्य अग्निशमन केंद्र- आचोळे व विभागीय अग्निशमन केंद्रे, महानगरपालिकेचे वाचनालये या इमारतींवर "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" लोगो (नियॉन साईन बोर्ड) च्या माध्यामातून प्रदर्शित करुन नागरिकांमध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाबाबत जनजागृती करणेकामी सदर जागा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सदर जागेवर नियॉन साईन बोर्डच्या माध्यमातून "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" लोगो प्रदर्शित करणेकामी रक्कम रु. २५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर कामाचा खर्च "इतर विकास कामे" या लेखाशिर्षाअंतर्गत भागविण्यात/खर्च करण्यात येणार आहे.

१. लेखाशिर्ष :- "इतर विकास कामे"

२. मुळ तरतुद :- रु. ४०,००,००,०००/-

३. या प्रस्तावाचा खर्च :- रु. ५५,००,०००/-

४. यापुर्वीचा खर्च :- रु. १०,८५,३५,८७५/-

५. उपलब्ध शिल्लक :- रु.२८,६०,१४,१२५/-

नियंत्रण नोंदवही पृष्ठ क्र. २६ अ.क्र. ०९ वर नोंद घेण्यात आलेली आहे.

तरी सदर कामी एकूण रक्कम रु. ५५,००,०००/- इतक्या अपेक्षित खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांची प्रशासकिय व वित्तीय मंजूरी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमुद कामे करणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) अन्वये आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार सदर अंदाजित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकरीता सदरचा प्रस्ताव मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत विभागनिहाय आयकॉनिक कार्यक्रम करणेकामी डिजीटल वॉल पेंटींग द्वारे करणेकामी रक्कम रु. ३०,००,०००/- इतक्या अपेक्षित रक्कमेस व मुख्य कार्यालय विरार (पुर्व), प्रभाग समिती ए ते आय असे एकूण ९ प्रभाग समिती कार्यालये, मुख्य अग्निशमन केंद्र- आचोळे व विभागीय अग्निशमन केंद्रे, महानगरपालिकेचे वाचनालये या इमारतींवर नियॉन साईन बोर्ड द्वारे लोगो प्रदर्शित करणेकामी रक्कम रु. २५,००,०००/- असे एकूण रक्कम रु. ५५,००,०००/- इतक्या अपेक्षित खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७ (३) अन्वये आयुक्तांचे अधिकार व कर्तव्य नुसार प्रशासकिय व वित्तीय मंजूरी या ठरावान्वये मंजूर करण्यात येत आहे.

29/01/22

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. 401 305
दूरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५१९ विभाग :- बांधकाम

दिनांक : 29/06/2022

विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. 98 मध्ये आयुक्त निवासस्थानी रंगकाम, फ़्लॉरींग व इतर दुरूस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

1) प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. 98 मध्ये आयुक्त निवासस्थानी रंगकाम, फ़्लॉरींग व इतर दुरूस्ती करणे

2) प्रस्तावाची गरज - वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. 98 मध्ये दिनदयाळनगर येथे महानगर पालिकेचे आयुक्त निवासस्थान आहे. सदर निवासस्थान मधील फ़्लॉरींग नादुरूस्त झालेले आहे व दरवाजे व स्लायडींग विंडो सुध्दा खराब झालेले आहे. तसेच सदर निवासस्थानात इतरही दुरूस्ती करावयाची आहे.

या करिता वर नमूद ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबधीत कामांचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे सार्व.बांधकाम विभाग राज्य दर सुची नुसार कामाचे रू. 47,88,301/- चे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे.

3) अंदाजपत्रकिय रक्कम - रू. 47,88,301/-

4) दरसुची – 2021 – 22

5) कामाचे स्वरूप - टाईल्स – 178.76 घन मीटर पेटींग – 715.54 घन मी.

6) या पुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल – यापूर्वी काम केलेले नाही.

7) जागेची मालकी :- वसई विरार शहर महानगरपालिका

8) स्थावर मालमत्ता नोंदवही – नमुना नं. 128 पृष्ठ क्र. ८८ अ.क्र. ०१

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 67(3) क नुसार मा.आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव :- प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. 98 मध्ये आयुक्त निवासस्थानी रंगकाम, फ़्लॉरींग व इतर दुरूस्ती करणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू. 47,88,301/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणा-या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे.

29/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. 401 305
दूरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. S20 विभाग :- बांधकाम

दिनांक : 29/06/2022

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. 98 मध्ये आयुक्त निवासस्थानी रंगकाम, फ़्लोरींग व इतर दुरूस्ती करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे

प्रस्तावाचा मजकूर - वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. 98 मध्ये दिनदयाळनगर येथे महानगर पालिकेचे आयुक्त निवासस्थान आहे. सदर निवासस्थान मधील फ़्लोरींग नादुरूस्त झालेले आहे व दरवाजे व स्लायडींग विंडो सुध्दा खराब झालेले आहे. तसेच सदर निवासस्थानात इतरही दुरूस्ती करावयाची आहे.

तरी याबाबत अंदाजपत्रक तयार केलेले असून या कामी रक्कम रू. 47,88,301/- इतका खर्च अपेक्षित आहे.

अ.क्र.	कामाचे नांव	कामाचे स्वरूप/ अंदाजपत्रकिय रक्कम	ठेकेदाराचे नाव
1.	प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. 98 मध्ये आयुक्त निवासस्थानी रंगकाम, फ़्लोरींग व इतर दुरूस्ती करणे	टाईल्स – 178.76 घन मीटर पेंटींग – 715.54 घन मी. रु. 47,88,301/-	मे. एस. एस. एन्टरप्रायझेस

या करिता वर नमूद ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबधीत कामांचे सन 2021-22 या वित्तीय वर्षाचे सार्व.बांधकाम विभाग राज्य दर सुची नुसार कामाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. त्यानुसार या कामा मध्ये वर नमूद केलेल्या मान्यता प्राप्त ठेकेदाराने तातडीने काम करणे बाबत समर्थता दर्शविलेली आहे.

सबब, उपरोक्त नमूद ठिकाणी तातडीने काम करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता वर नमूद केलेले नोंदणीकृत ठेकेदार मे. एस.एस. एन्टरप्रायझेस यांच्या कडुन जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानूसार काम करुन घेण्यासाठी संविदा करण्यास व कार्यादेश देण्यास मा. आयुक्त सो. हयाचे मान्यतेस्तव सादर.

ठराव :-

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'एच' मध्ये वॉर्ड नं. 98 मध्ये आयुक्त निवासस्थानी रंगकाम, फ़्लॉरींग व इतर दुरूस्ती करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची 'ड' प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता नोंदणीकृत ठेकेदार मे. एस.एस. एन्टरप्रायझेस यांच्या कडुन राज्य दर सूची नुसार तयार केलेल्या रक्कम रु. 47,88,301/- अंदाजपत्रकानूसार अंदाजपत्रकिय दरात काम करुन घेण्यासाठी संविदा करून कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

28/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ५२१

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग
दिनांक : २९/०६/२०२२

मुख्य प्रस्तावाचा विषय :- विरार (प.) प्रभाग क्र.३५ मध्ये कोफराड तलावामध्ये संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. (फेर निविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.१४,६७,९८६/-
२) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती विषय क्र.३८५ दि.१३/११/२०१९
३) तांत्रिक मान्यता :- कार्यकारी अभियंता दि.१९/१२/२०१९
४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. :- रु.१६,०५,५७१/-
५) ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी :-वविशम/का.अ/बांध/१५६३/२०२१ दि.२८/१/२०२०कार्यकारी अभियंता, व.वि.श.म.
६) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक :- दि.३०/०१/२०२०
७) जाहिर निविदा सुचना :- १) दै.लोकमत २) दै.मिड-डे ३) दै.पूर्णविराम
८) ई- टेण्डरींग द्वारे निविदा प्रसिद्धी (फेर निविदा) :- वविशम/का.अ/बांध/४९६/२०२१ दि.१८/३/२०२१ कार्यकारी तथा शहर अभियंता, व.वि.श.म.
९) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिद्धी दिनांक :- दि.१९/०३/२०२१
१०) जाहिर निविदा सुचना :- १) दै.मुंबई चौफेर २) दै.सकाळ ३) दै.वृत्तमानस ४) दै.खबरें आज तक ५) दै.प्रात:काल ६) दै.स्टॅण्डर्ड पोस्ट ७) दै.इंडियन एक्सप्रेस
११) ई-निविदा प्राप्त :- ४
१२) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.८/४/२०२१
१३) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.२५/११/२०२१
१४) प्राप्त निविदांची संख्या :- ४
१५) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

अ.क्र.	निविदा धारकाचे नांव	निविदा दर	निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबत धनाकर्षाचा तपशील	शेरा
१.	मे.नितेश मोहन मलवाणी	अंदाजपत्रकापेक्षा ०.००% जास्त दराने	--	पात्र
२.	मे.आयुष कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा (-) १२.५१% कमी दराने	--	पात्र
३.	मे.अंजनी कन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा २.१०% जास्त दराने	--	पात्र
४.	मे.आर.डी. कंन्स्ट्रक्शन	अंदाजपत्रकापेक्षा (-) १५.००% कमी दराने	परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष सोबत सादर केला आहे.	पात्र

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.आर.डी. कंन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** ((-)१५.००%) कमी निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असून योग्य व वाजवी आहे.

ठराव / निर्णय :-

उपरोक्त कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३८५ दि.१३/११/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.आर.डी. कंन्स्ट्रक्शन** ह्यांचे **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १५.००% कमी दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.आर.डी. कंन्स्ट्रक्शन** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १५.००% कमी दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

२९/११

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. S 2 2

विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :-29/06/2022

<u>प्रस्तावाचा विषय</u> :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बहाडोली येथील सिग्नल यंत्रणेची तीन वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती करणे कामाचे संविदेबाबत...

<u>प्रस्तावाचा मजकुर :-</u>

1. अंदाजपत्रकिय रक्कम :- 3,59,496/-
2. प्रशासकिय मंजुरी :- मा.उप-आयुक्त (विद्युत) यांची दि.26/04/2022 रोजीचे ठराव क्र.100 अन्वये मंजुरी.
3. तांत्रिक मान्यता रक्कम :- 3,59,496/-
4. तांत्रिक मान्यता :- दि.09/05/2022
5. ऑफलाईन निविदा प्रसिध्दी :- जा.क्र./वविशम/विवि/134/2022-23, दि.13/05/2022
6. ऑफलाईन निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.17/05/2022 ते दि.31/05/2022
7. विहित मुदतीत ऑफलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा संख्या :- 03 (तीन)
8. निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि.01/06/2022
9. निविदा उघडल्याची तारीख (द्वितीय लखोटा) :- दि.16/06/2022

महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे दि.29/01/2019 रोजीच्या शासन परिपत्रक क्र.सीएटी-2017/प्र.क्र.8/इमा-2 अन्वये दि.16/06/2022 रोजी ऑफलाईन पध्दतीने 1) मे.अपना इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, मुंबई व 2) मे.संदेश इलेक्ट्रीकल इंजि.ॲन्ड वर्क, मुंबई या पात्र ठेकेदारांचा लखोटा क्र. 2 उघडला असता खालील नमुद केल्याप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

अ.क्र	निविदाकाराचे नाव	निविदा दर	शेरा
1.	मे.अपना इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, मुंबई	अंदाजपत्रकिय दराने	**<u>लघुत्तम निविदाधारक</u>**
2.	मे.संदेश इलेक्ट्रीकल इंजि.ॲन्ड वर्क, मुंबई	अंदाजपत्रकिय रक्कमेवर 12% जास्त दराने	-
3.	मे.शैलेश इंटरप्रायझेस, मुंबई	-	**अपात्र निविदाधारक**

उपरोक्त प्राप्त निविदाधारकांच्या दराची तुलना केली असता **मे.अपना इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, मुंबई** यांचे निविदेतील दर अंदाजपत्रकिय रक्कमेवर **अंदाजपत्रकिय दराने** असुन योग्य व वाजवी आहेत.

सदर कामी प्राप्त दरपत्रकानुसार **रक्कम 3,59,496/- रुपये** खर्च अपेक्षित असुन सदरचा खर्च **सन 2022-23 या वित्तीय वर्षातील "सिग्नल व्यवस्था देखभाल दुरुस्ती" या लेखाशिर्षकातील रक्कम 1,00,00,000/- रुपये** तरतुदीमधुन भागविण्यात येईल.

तरी वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बहाडोली येथील सिग्नल यंत्रणेची तीन वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती करणे कामाच्या लघुत्तम दराचे निविदाधारक **मे.अपना इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, मुंबई** यांचे सोबत संविदा करुन कामाचा कार्यादेश देणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार मान्यतेस्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बहाडोली येथील सिग्नल यंत्रणेची तीन वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती करणे कामी प्राप्त लघुत्तम दराचे निविदाधारक **मे.अपना इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, मुंबई** यांचे सोबत संविदा करुन कामाचा कार्यादेश देणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार मान्यता देण्यात येत आहे.

(तानाजी नरळे)
उप-आयुक्त (विद्युत)
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. पालघर, पिन नं. ४०१३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल-vasaivirarcorporation@yahoo.com

ठराव क्र. ५२३ विभाग : सार्व.बांधकाम

दिनांक :३०/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'आय' मधील गिरीज तलाव सुशोभिकरण करणेकामी (फेज-२) प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ६,५०,३८,९७१/-

सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. ७,२५,८२,७३५/-

प्रशासकिय मान्यता :- मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १० दि. ११/०९/२०१९.

सुधारित प्रशासकीय मंजूरी :- मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांचेकडील ठराव क्र. २८ दि. १२/०४/२०२२.

तांत्रिक मंजूरी :- मा. शहर अभियंता ह्यांच्याकडील दि. १०/१२/२०१९, रक्कम रु. ६,४९,५१,४४५/-

सुधारित तांत्रिक मंजूरी :- मा. शहर अभियंता ह्यांच्याकडील दि. २५/०४/२०२२, रक्कम रु. ७,२५,८२,७३५/-

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/शअ/८३९/२०२२ दि. २०/१२/२०१९
शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी :- दि. २१/१२/२०१९

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- १) दै. सकाळ २) दै.वार्ताहर३) दै. फ्रि प्रेस जर्नल ४) दै. खबरे आजतक ५) दै. मिड-डे ६) दै. जागरुक टाईम्स ७) दै. पुर्णविराम

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख (प्रिपरेशन व स्विकारण्याची) :- दि. २३/१२/२०२१ दु. ३.०० पासुन ते दि. १७/०१/२०२२ दु. ३.०० पर्यत

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ५

सुधारित रक्कमेनुसार ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/शअ/१४८-/२०२२ दि. २७/०४/२०२२
शहर अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी :- दि. २८/०४/२०२२

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- १) दै. महाराष्ट्र टाईम्स २) दै.लोकसत्ता ३) दै. वृत्तमानस ४) दै. हमारा महानगर ५) दै. यशोभुमी ६) दै. इंडियन एक्सप्रेस ७) दै. इकॉनॉमिक टाईम्स

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख (प्रिपरेशन व स्विकारण्याची) :- दि. २८/०४/२०२२ दु. ३.०० पासुन ते दि.२३/०५/२०२२ दु. ३.०० पर्यत

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेव्दारे प्राप्त निविदा :- ५

ई -टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि.०२/०६/२०२२ सांय. ३.०१ वाजता

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- कार्यकारी तथा प्र. शहर अभियंता

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

अ.क्र.	निविदाधारकांचे नाव	निविदा दर
१.	मे. संजय कंन्स्ट्रक्शन	११.००% जास्त दराने
२.	मे. हमीद शेख	११.५०% जास्त दराने
३.	**मे. ओमकार कंन्स्ट्रक्शन**	**४.९९% जास्त दराने**

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे. ओमकार कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील दर **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची** निविदा असुन सदरचा दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी व वाजवी आहे. सदरच्या दरास **निविदा समितीने दि.२९/ ०६ /२०२२ रोजीच्या** बैठकीत मान्यता दिलेली आहे.

तरी **मे. ओमकार कंन्स्ट्रक्शन** यांच्या अंदाजपत्रकीय दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून **मे. ओमकार कंन्स्ट्रक्शन** ह्यांची निविदा **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची** निविदा असल्याने मंजूरीस्तव सादर. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये संविदा करणेसाठी मा. आयुक्त तथा प्रशासक ह्यांच्या मंजूरीस्तव सादर.

ठराव :- प्रभाग समिती 'आय' मधील गिरीज तलाव सुशोभिकरण करणेकामी (फेज-२) **मे. ओमकार कंन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची** निविदा ही इतर निविदेच्या तुलनेत कमी, योग्य व वाजवी असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (३) अन्वये

अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराच्या निविदेस संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहे. तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास मान्यता देत आहे.

30/05/22

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती "सी"

दै. बाजार फी

प्रशासकीय ठराव क्र. ५२४ दि. ३०/०६/२०२२

प्रस्तावाचा विषय :- प्रभाग समिती 'सी' (चंदनसार) विरार (पूर्व) दैनंदिन बाजार फी वसुलीची ई-निविदा दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (३ वर्ष) प्रसिध्द करणेबाबत.

प्रस्तावाचा मजकुर :- दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२ (१ वर्ष) कालावधीकरीता किमान देकार रक्कम रु. १,१८,६०,३५९/- गृहीत धरुन ई-निविदा मागविण्यात आली असता श्री रामकैलास कालीचरण यादव यांची सर्वात जास्त दराची म्हणजेच रक्कम रु. १,६२,००,०००/- ची निविदा प्राप्त झाली असता त्यास मा.प्रशासकीय ठराव क्र. ४५९ दि.०४/०२/२०२१ अन्वये तत्कालिन मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

ठेकेदार श्री. रामकैलास यादव यांनी करारनाम्यामध्ये नमुद प्रमाणे मनपा फंडात जमा केलेल्या रक्कमेचा तपशिल व प्रशासकीय ठराव क्र. १३२३ दि. २१/०३/२०२२ नुसार फक्त १५ दिवसांची सुट ठेकेदार यांना देता येईल याबाबतची टिपणी स्वतंत्रपणे सादर करण्यात येत आहे.

तथापि सदरच्या ई-निविदेचा कालावधी दि. ३१/०३/२०२२ रोजी संपुष्टात येत असल्याने अतितातडीने त्यापुढील कालावधीची ई-निविदा मागविणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ मध्ये मा. स्थायी समितीने ठराव क्र. ०२ दि. ०२/०५/२०२० रोजी महानगरपालिका हद्दीतील बाजार कर वसुलीबाबत ठराव पारित केलेला असुन तो खालीलप्रमाणे आहे.

"बाजार फी वसुली संदर्भातील दर वाढीबाबत प्रशासनाने केलेल्या शिफारसीनूसार महानगरपालिकेच्या संपूर्ण कार्यक्षेत्रात बाजार फी वसुलीचे दरांचे समानीकरण करुन नविन दर प्रस्तावित केलेले आहेत, त्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच बाजार नियंत्रण व होणाऱ्या वर्दळीस अटकाव येणेकामी प्रशासनाने केलेल्या शिफारसी यांची देखिल संबंधित प्रभाग समितीच्या सहाय्यक आयुक्त यांनी अंमलबजावणी करावयाची आहे. सदर बाजाराचे वाढीव दर सन २०२०-२१ या वर्षापासून अंमलात येतील. उपरोक्त बाजारांचे वाढीव दर हे पुढील ३ वर्षासाठी असून ३ वर्षानंतर प्रत्येक बाजाराचे पून:विलोकन करुन दराबाबत प्रस्तावित करावे. तसेच यासंदर्भात प्रभाग समितीच्या सर्व सहाय्यक आयुक्त यांनी आठवडे व दैनंदिन बाजाराबाबत सुचविलेल्य धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणेस ही सभा सर्वानूमते मंजुरी देत आहे."

मा. स्थायी समितीच्या वरील ठरावाची अंमलबजावणी करावयाची असल्याने प्रभाग समिती "सी" (चंदनसार) विरार पूर्व दै. व आठवडे बाजाराची ई-निविदा सन २०२२-२३ पर्यंतच करता येईल कारण सन २०२१-२२ मध्ये दि. ०१/०४/२०२१ ते दि. ३१/०३/२०२२ (१ वर्ष) कालावधीची ई-निविदा यापुर्वीच प्रसिध्द करुन ठेकेदारा समवेत करारनामा करुन कार्यादेश देण्यात आलेला आहे.

त्यामुळे दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२३ (१ वर्ष) कालावधीची ई-निविदा मा. स्थायी समिती ठराव क्र. ०२ दि. ०२/०५/२०२० अनूषंगाने किमान देकार प्रति वर्ष १०% वाढ न करता सन २०२१-२२ मधील ठेक्याची वार्षिक रक्कम रु. १,६२,००,०००/- ही किमान देकार रक्कम गृहीत धरुन फक्त १ वर्ष कालावधीची ई-निविदा प्रसिध्द करता येणार आहे. तसेच त्यापुढील २ वर्ष कालावधीची ई - निविदा प्रति वर्ष १०% वाढ करुन एकूण ३ वर्ष कालावधी करीताची ई-निविदा प्रसिध्द करता येईल त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

मा. स्थायी समिती ठराव क्र.०२ दि.०२/०५/२०२० नूसार १०% वाढ न करता सन २०२२-२३ वार्षिक किमान देकार रक्कम रु. १,६२,००,०००/- एवढीच असणार आहे.

सन २०२३-२४ वार्षिक किमान देकार रक्कम रु. १,७८,२०,०००/-

सन २०२४-२५ वार्षिक किमान देकार रक्कम रु. १,९६,०२,०००/- याप्रमाणे ३ वर्षाची किमान देकाराची एकूण रक्कम रु.५,३६,२२,०००/- होत आहे.

<u>सबब वर नमुद केलेप्रमाणे दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (३ वर्ष) या कालावधीची एकुण किमान देकार रक्कम रु. ५,३६,२२,०००/- गृहीत धरुन ई-निविदा मसुदा तयार करण्यात आलेला असुन प्रशासकीय व आर्थिक मान्यतेस्तव व त्याबाबतच्या प्रशासकीय ठरावावर स्वाक्षरी होणेस विनंती आणि सदरची ई-निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याचा मान्यतेकरीता सविनय सादर.</u>

निर्णय :- <u>प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे दि. ०१/०४/२०२२ ते दि. ३१/०३/२०२५ (३ वर्ष) या कालावधीची एकुण किमान देकार रक्कम रु. ५,३६,२२,०००/- गृहीत धरुन ई-निविदा मसुदा तसेच ई-निविदा मनपा संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्याकरीता प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.</u>

30/06/22

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर पिन नं.401305
दुरध्वनी :- 0250-2525101/02/03/04/05/06 फॅक्स :- 0250-2525107
ई-मेल :- vasaivirarcorpoation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. :- ५२५

विभाग :- क्रीडा विभाग
दिनांक :- 30/06/2022

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका मार्फत 284 वा वसई विजयदिनाचे आयोजनाकामी झालेल्या सुधारित खर्चास आर्थीक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने सन 2022 यावर्षी दिनांक. 14/05/2022 ते 16/05/2022 या कालावधीत " 284 वसई विजयदिन" आयोजन करण्यांत आले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन करणेकामी संदर्भ क्र. 1 व संदर्भिय क्र.2 अन्वये रक्कम रुपये.28.50 लक्ष इतक्या खर्चास मान्यता आहे. 284 वा वसई विजय दिनाचे आयोजन यशस्वीपणे होणेसाठी महानगरपालिकेने संबंधीत कामाचे निविदाधारक यांना दिलेल्या कार्यादेशा प्रमाणे खालील प्रमाणे देयके होत आहे.

बाब क्र.	वसई विजयदिनाचे आयोजनाकामी झालेला खर्च	आयोजनासाठी झालेला खर्च	झालेला खर्च व तपशील
1	किल्ला बांधणी स्पर्धा व त्यांची पारितोषिके,चित्र प्रदर्शन,शस्त्रप्रदर्शन, श्री.वजेश्वरी मंदिर ते वसई किल्ला मशाल वाहन रॅली,शोभायात्रा, पारंपारिक खाद्य पदार्थ जत्रा, पाहुणे कलाकार, व्याख्याते, परिक्षक यांना निवास व्यवस्था आणि मानधन, मशाल यात्रा व शोभा यात्रेत सहभागी होणारी मंडळे,रथ सजावट,मशाल, रांगोळी, चित्ररथ वाहन भाडे, शाल, श्रीफळ, गुच्छ-हार,फटाके, ढोलताशा वादक मानधन, किल्लासफर मानधन,सुत्रसंचालक मानधन,बालजत्रा व इतर आवश्यक व अनिवार्य असलेला अनुषंगीक खर्च.	550000	अग्रीम स्वरुपात खर्च . **मानधन देयक पुर्ण अदा केली आहे. उर्वरीत शिल्लक रक्कम 86/-**
2	अमृतलता सांस्कृतीक कार्यक्रम (मे.चौरंग)	826000	**देयक पुर्ण अदा केले आहे.**
3	खानपान खर्च (मे.एच आर एन्टरप्रायजेस)	88814	देयक प्रस्तावीत.
4	टिशर्ट व टोपी (मे.माय सॉफ्ट)	74308	देयक प्रस्तावीत.
5	फोटोग्राफी व व्हिडिओग्राफी (मे. डी.डी.क्रिएशन)	159300	देयक प्रस्तावीत.
6	मंडप,साऊंड,विद्युत व्यवस्था,आसनव्यवस्था,जनरेटर, (मे.हार्टबीट्स साऊंड ऑन् लाईट्स)	1585993	देयक प्रस्तावीत.
7	(मे.महारानी प्रीन्टर्स)	105007	देयक प्रस्तावीत.

284 वा वसई विजय दिनाचे आयोजन यशस्वीपणे होणेसाठी मा.प्रशासकीय मान्यता व आवश्यक सुधारित तरतुद यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

तपशील	मुळ प्रशासकीय मान्यता	कार्यादेशा अन्वये होणारा खर्च	सुधारित आर्थिक व प्रशासकीय मान्यता आवश्यक रक्कम	सुधारीत रक्कम व मुळ प्रशासकीय मान्यता रक्कम मिळून एकुण रक्कम
मा.प्रशासकीय ठराव क्र. 112 दिनांक. 27/04/2022 अन्वये	रु.2850000	रु.3389422	रु. 539422	रु.3389422

सन 2022-23 च्या अर्थसंकल्पात सत्कार व इतर समारंभ व्याख्यानमाला, वकृत्वस्पर्धा, ग्रंथ संमेलन, गुणवंत शिक्षक सत्कार, व्यक्ती/संस्थासाठी महानगरपालिका भुषण पुरस्कार, महापौर चषक स्पर्धा व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा कार्यक्रम या लेखाशिर्षा अंतर्गत 2,75,00,000 इतकी तरतूद केली असून कार्यक्रमासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 66 मधील पोटकलम 9 अन्वये तरतूद आहे. सदरचा खर्च नमुद लेखाशिर्षका मधुन भागविणे शक्य आहे.

प्रस्तावात नमुद बाब क्र. 3,4,5,6 व 7 याकामी झालेल्या खर्चाची देयके या कामाचे मंजुर निविदाकार यांना देणे प्रलंबीत आहेत. संबंधीत कामाचे ठेकेदार यांनी कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे होणेसाठी दिलेल्या कार्यादेशानुसार व करारनान्यातील अटी व शर्ती नुसार काम वेळेत व सुस्थीतीत केलेले आहे. त्यामुळे संबंधीतांना त्यांनी केलेल्या कामाची देयके अदा करणेकामी रु. 539422 इतक्या सुधारित खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

सबब 284 वा वसई विजय दिनाचे आयोजन यशस्वीपणे होणेसाठी रक्कम रुपये 2850000 प्रथम मंजुरी प्रस्ताव अनुलक्षुन कार्यक्रमासाठी प्रत्यक्षात झालेला खर्च रु.3389422 वजा जाता रु. 539422 इतका खर्च अतिरिक्त होत असल्याने सुधारित रक्कमेसह एकुण रु.3389422 इतक्या रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे अंतीम मान्यतेसाठी ठेवणेस आदेशास्तव सादर.

प्रस्तावाचा ठराव :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने सन 2022 यावर्षी दिनांक. 14/05/2022 ते 16/05/2022 या कालावधीत " 284 वसई विजयदिन " आयोजन करण्यांत आले होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन करणेकामी मा.प्रशासकीय ठराव 112 दिनांक. 27/04/2022 अन्वये रक्कम रुपये.28.50 लक्ष इतक्या खर्चास मान्यता आहे.

तीन दिवस आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे होणेसाठी मंजुर निविदाधारक व इतर आवश्यक व अनुषंगीक कामांकरिता महापालिका मार्फत विहित प्रक्रीया पुर्ण करुन मंजुर केलेली

दरपत्रक धारक यांना दिलेल्या कार्यादेशानुसार या आयोजनासाठी एकुण रु. 3389422 इतका खर्च होत आहे. म्हणजेच या कार्यक्रमासाठी एकुण रु. 539422 इतका खर्च अतिरिक्त होत आहे.

सबब 284 वा वसई विजय दिनाचे आयोजन यशस्वीपणे होणेसाठी रक्कम रुपये 2850000 प्रथम मंजुरी प्रस्ताव अनुलक्षुन कार्यक्रमासाठी प्रत्यक्षात झालेला खर्च रु.3389422 वजा जाता रु. 539422 इतका खर्च अतिरिक्त होत असल्याने सुधारित रु. 539422 या रक्कमेसह एकुण रु.3389422 इतक्या खर्चास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.

29/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पूर्व, जि. पालघर, पिन नं – ४०१३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई-मेल –vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५२६

विभाग : बांधकाम
दिनांक :३०/०६/२०२२

---

१) प्रस्तावाचा विषय : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील साठ फुटी रस्त्यावरील ट्री हाऊस शाळा ते नाना-नानी पार्क पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

२) अंदाजपत्रकीय रक्कम : रु. ६,६३,५६७/-

३) कामाची आवश्यकता : प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रतील वॉर्ड क्र. ११२ मध्ये साठ फुटी रस्त्यावर ट्री हाऊस शाळा ते नाना-नानी पार्क पर्यंत गटाराची व्यवस्था नसल्याने शाळेचे तसेच आजुबाजुचा परिसरातील वस्तीचे पाणी रस्त्यात साचुन राहते. तसेच शाळा सुरु होणार असल्याने लहान मुलांना पावसाळयात रोगराई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सद्यस्थित सदर ठिकाणी पाईप गटार बांधल्यास पावसाळी तसेच सांडपाण्याचा निचरा योग्यप्रमाणे होईल. सदर कामासाठी मा. महापौर यांनी मौखिक मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने पाहणी करुन अंदाजपत्रक तयार केले आहे.

४) कामाचे स्वरुप : अंतर्गत कामे : खोदाई, सोलिंग, पी.सी.सी., ९०० मीमी NP-२ पाईप, परदी, स्ट्रक्चरल स्टीलचा अंतर्भाव आहे.

परिमाण : खोदाई लांबी – ५५ मी., रुंदी – १.५०मी., उंची – १.५०मी.

सोलिंग लांबी – ५५ मी., रुंदी – १.५०मी., ०.१५ मी. जाडी

पी.सी.सी. लांबी – ५५ मी., रुंदी – १.५०मी., ०.१० मी. जाडी

लोखंडी चेंबर्स – ११ नग

५) यापुर्वी सदर जागेवर झालेल्या कामाचा तपशिल :- निरंक

६) जागेची मालकी : व.वि.श.म

७) विकास आराखडयातील आरक्षण : १२ M DP Road

८) स्थावर मालमत्ता नोंदवही क्र. १२८ पृष्ठ क्र. १५ अ.क्र. १४२ वर नोंद

तरी सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७(३) नुसार मा. आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

ठराव : वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती आय कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. ११२ मधील साठ फुटी रस्त्यावरील ट्री हाऊस शाळा ते नाना-नानी पार्क पर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ६,६३,५६७/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहेत. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजुरी घेऊन निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.

30/06

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. 401 305
दुरध्वनी - 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स - 0250-2525107,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ५२७ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ३० /०6/ 2022

प्रस्तावाचा विषय :- सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पाणीपुरवठा विभागासाठीच्या तरतूदींच्या पूर्नविनियोजनास मान्यता मिळणेबाबत.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती "ई" कार्यक्षेत्रातील १. दिप पॅराडाईस ए व बी विंग २. मे दिप प्राईड अपा. ए ते ई विंग, श्रीप्रस्थ परिसर, निळेमोरे, नालासोपारा पश्चिम या दोन गृहनिर्माण संस्थांनी नळजोडणी मंजूरी अनुषंगाने जादा भरणा केलेली नळजोडणी आकार रक्कम परत मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

सदर दोन्ही संस्थांनी अनुक्रमे रू.१५१२७५०/- व रु. १९१००००/- इतकी रक्कम नळजोडणी आकारापोटी जादा भरणा केल्याची खात्री झालेली आहे व सदर रक्कम दोन्ही संस्थांना परत करण्याच्या दृष्टीने सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात " नळजोडणी आकार परतावा" या लेखाशिर्षावर रू.२५,०००/- इतकीच तरतुद असल्याने सदर लेखाशिर्षावर तरतुद पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात " पेल्हार पा.पु. योजना (विद्युत, जनित्र, पंपींग व इतर) " या लेखाशिर्षावर रू.४०० लक्ष इतकी तरतूद असून आजपर्यंत रू.२८,९४,६३१/- इतका खर्च झालेला आहे. सदर लेखाशिर्षावर माहे मार्च २०२३ पर्यंत मोठा खर्च अपेक्षित नाही करीता सदर लेखाशिर्षातून रू.३५ लक्ष " नळजोडणी आकार परतावा " या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन केल्यास नळजोडणी आकार परातावा देयक अदा करणे शक्य होणार आहे.

तरी वरिल प्रमाणे सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "पेल्हार पाणी पुरवठा योजना " या लेखाशिर्षावरून रू.३५ लक्ष " नळजोडणी आकार परतावा " या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ नुसार नमुना नं. १० मध्ये विवरणपत्र सोबत जोडून सादर करण्यात येत असून प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

ठराव :- सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील "पेल्हार पाणी पुरवठा योजना " या लेखाशिर्षावरून रू.३५ लक्ष "नळजोडणी आकार परतावा" या लेखाशिर्षावर तरतूद पुर्नविनियोजन करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०१ नुसार सोबत जोडलेला नमुना नं. १० प्रमाणे पुर्नविनियोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३०/०६

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका